।। श्री योगिराज संत सोहिरोबाकृत ।।

# सिध्दान्तसंहिता



## ।। सम वय से समाधि ।।


www.vch-india.com

**Vinayanand Charitable Home India 416203**

'Kaivalya', 924/30, Vishalnagar, **HUPARI.** Dist. Kolhapur.(MS)

Phone : 0230-2450365 Mob. 0-932500-5525

Email : vchindia@yahoo.com


**शुध्द, स्थिर, व्यापक आणि परिपूर्ण म्हणजे परमार्थ.**



श्री सद्‌गुरु निरंजन महाराज

।। श्री सद्‌गुरु प्रसन्न ।।

**श्री सद्‌गुरु निरंजन महाराज यांचे नववे पुण्यतिथी निमित्त आश्रमामध्ये**
**श्री योगिराज संत सोहिरोबाकृत**

# सिध्दांतसहिंता

या योग व वेदांतयुक्त पुरातन आणि दुर्मिळ अशा श्रेष्ठ ग्रंथाचे सार्थ प्रकाशन करताना आनंद होत आहे. महाराष्ट्रातील आम जनतेला सुपरिचीत नसलेले एक थोर योगी व संत सोहिरोबा यांचा जन्म सन १७१४ साली बांधा (सावंतवाडी पासुन १२ कि.मि.) येथे एका सुसंस्कृत सारस्वत ब्राह्मण कुटूंबात झाला.त्यांचे मुळ नांव अच्युत व आडनांव आंबिये असे आहे. कोंकणी,मराठी व संस्कृत आणि हिंदुस्थानीचे शिक्षणानंतर १६ व्या वर्षी त्यांचा विवाह झाला. वडलोपार्जित कुलकर्णी (गांकामगार तलाठी) म्हणून १८ वर्षाहून अधिककाल उत्तमप्रकारे नोकरी केली. सोहिरोबाना त्याकाळचे राजाने काहीं महत्वाचे कामा निमित्त बोलावणे केले असता सोहिरोबा गावचावडीतील दप्तरासह सावंतवाडीस निघाले. परंतु सुदैवाने वाटेतच त्याना एका अज्ञात तेजस्वी महापुरुषाची भेट झाली व त्यांचेकडून दिव्य शक्तिचे संक्रमण होवून अनुग्रह प्राप्त झाला. त्यामुळे त्यांचे अध्यात्मीक जीवन उजाळून निघाले. त्यानी तत्काळ नोकरीचा राजीनामा देवून लौकीक बंधनातून मुक्तता करुन घेतली. त्याना प्राप्त झालेल्या दिव्य अनुभूती अनेक ग्रंथातून व पदातून प्रकट झाल्या आहेत. **सिध्दांतसहिंता** हा ग्रंथ वयाचे ३४ व्या वर्षी म्हणजे सन १७४८ साली लिहिला गेला आहे. वयाचे साठावे वर्षी घरी नातवंडे वगैरे असताना स्वतःचे दोन मुलगे व काही निवडक गावक-यासह तिर्थयात्रेस निघाले, प्रथम घाटमाथ्यावर येवून नंतर पंढरपूर, अक्कलकोट येथे वास्तव्य केले. पुढे सुरत,गिरनार,सोमाथ,मथुरा इत्यादी तिर्थे करुन ग्वाल्हेर येथे आलेनंतर, राजे महादजी शिंदे यांची भेट झाली. त्यावेळी सोहिरोबांची योग्यता ओळखून महादजी शिंदे व अनेक भक्त, सोहिरोबांचे शिष्य बनले. शिंदे यानी सोहिरोबांना उज्जैनी (अवंतीका) येथे मठ बांधून दिला. तेथे काहीकाल वास्तव्य करुन, सोहिरोबा क्षिप्रा नदीकाठी सन १७९२ साली (शके १७१४), मधुमास (चैत्र) रामनवमी या पवित्रदिनी ते गुप्त झाले व त्यांचा जड देह कोणासही दृष्टोत्पतीस आला नाही. आमचे आश्रमाची परंपरा उज्जैनी येथून सुरु झाली असलेने त्यासमंधी माहिती घेणे कामी दोनदा उज्जैनी येथे जाणे झाले. त्यावेळी मुद्दाम संतसाहित्याचे जेष्ठ उपासक श्रीयुत पागे काका यांचेशी संपर्क करुन सोहिरोबांचा मठ व त्यांचेसाहित्याची चौकशी केली परंतु तेथे सोहिरोबांचा काहीही मागमूस राहीलेला नाही याची सर्वानाच खंत वाटते. असो

श्री सद्‌गुरु निरंजन महाराज हे नेहमी शांभवी मुद्रा व वेदांत आणि सर्वधर्माचे सारभूत विचार

यासमंधी सुलभ व सारभूत मार्गदर्शन करीत असत. तसेच विविध संतांचे अभंग, एकतारी भजनी मंडळाकडून गाईले जात आणि त्यावरती प्रवचन व निरुपण केले जात असे. खासकरुन **सोहिरोबांचे अभंग** गाण्याबद्दल आग्रह असायचा. सन १९७३ ते १९७६ या कालावधीत मांगूर जि.बेळगांव येथे झालेल्या एकतारी भजन आणि प्रवचन कार्यक्रमाचे रेकॉर्डींग सुदैवाने उपलब्ध आहे. निरंजन महाराजासोबतचे एकतारी भजनी मंडळाचा उपलब्ध फोटो या ग्रंथाचे मलपृष्ठावरती मुद्दाम छापला आहे. महाराजाना सिध्दांतसहिंता या ग्रंथाची ओवीबध्द प्राकृत प्रत सन १९१८चे दरम्यान उपलब्ध झाली होती त्यामधील सहावा अध्याय आश्रमाचे वतीने दिनांक १९.१२.१९९९ रोजी प्रकाशीत केला आहे. या ग्रंथामध्ये सहाव्या अध्यायाचे शेवटी प्राकृत मध्ये

**बुध्दीचें बोद्धव्य । मनाचे मंतव्य । चित्ताचे चेतव्य । मुरालें जेथ ।। ६-२६।।**
**ऐसा शांभवीमुद्रा प्रसाद । प्राप्त झाला जया विशद । तोचि भगवंतासि प्रसिद्ध । प्रिय झाला ।। ६-२७।।**

असा शांभवीमुद्रे समंधी महत्व विशद करुन यथोचित् गौरव केला आहे. तरी सर्व साधकानी या सार्थ ग्रंथाचाही सखोल अभ्यास व चिंतन करुन जीवनात सार्थकता प्राप्त करुन घ्यावी, ही सद्‌गुरु चरणी विनम्र प्रार्थना !

**मार्गशिर्ष कृ।।७ शके १९२८, शारदामाता जयंती,**
सोमवार दिनांक ११ डिसेंबर २००६

**• विनयानंद •**
**स्थळः- श्री सद्‌गुरु निरंजन महाराज आश्रम, मौजे वडगांव जिल्हा कोल्हापूर**
**फोन नं ०२३०-२३५७११८**

**समन्वय से समाधि**

**शुद्ध, स्थिर, व्यापक आणि परिपूर्ण म्हणजे परमार्थ**

# अनुक्रमणिका


| अध्याय क्रमांक | विषय | ओवी संख्या | पान नं |
|---|---|---|---|
| ०१ | सदात्मस्वरूपयोग | ३८ | ०१ |
| ०२ | भूतकर्दमसंगम | ४० | ०७ |
| ०३ | त्रिविधतापकथन | ३८ | १२ |
| ०४ | आर्तजिज्ञास्वर्थार्थीमुमुक्षुलक्षणकथन | ३८ | १६ |
| ०५ | शमदमाभ्यासयोग | ४७ | २१ |
| ०६ | जिज्ञासुज्ञानप्राप्तियोग | ३९ | २७ |
| ०७ | अर्थार्थीज्ञानयोगकथन | ४० | ३१ |
| ०८ | ज्ञानज्ञसंगफलयोग | ३६ | ३६ |
| ०९ | विहंगमीनमार्गसाधनयोग | ४० | ४० |
| १० | पिपीलिकाकपिमार्गयोगकथन | २८ | ४५ |
| ११ | षष्ठावतारतत्त्वकथन | २३ | ४८ |
| १२ | ज्ञानस्वरूप-श्रीरामावतारकथन | ४२ | ५१ |
| १३ | ज्ञानस्वरूप-श्रीकृष्णावतारकथन | ३३ | ५६ |
| १४ | बौध्दकल्किज्ञानकलाअवतारयोग | ३४ | ६० |
| १५ | शुध्दव्यतिरेकयोग | ६८ | ६५ |
| १६ | जन्मदुःखकथन | ३२ | ७३ |
| १७ | नैष्कर्म्यसिध्दियोग | २९ | ७६ |
| १८ | पूर्णसमाधियोग | ८४ | ८० |
| | एकूण | ७२९ | |




# अध्याय पहिला

## सदात्मस्वरूपयोग

**नमोऽस्त्वनंताय सहस्त्रमूर्तये सहस्त्रपादाक्षिशिरोरुबाहवे ।**
**सहस्त्रनाम्ने पुरुषाय शाश्वते सहस्त्रकोटीयुगधारिणे नमः ।।**

ज्याला अंत नाही, ज्याची रूपे हजारो आहेत, ज्याला हजारो पाय, डोळे, मस्तके, मांड्या आणि हात आहेत, ज्याला हजारो नामाभिधाने आहेत, जो चिरंतन आहे आणि ज्याने हजारो कोटी युगे धारण केली आहेत, अशा पुरुषाला नमस्कार असो.

**निःसंगं निर्मलं शांतं निराकारं निरंजनम् ।**
**नित्यतृप्तं निरावर्तं निगमातीतनिर्गुणम् ।।१।।**

ब्रह्म संपर्करहित, मलरहित, शांत, निराकार, निष्कलंक, सदैव संतुष्ट, (अविद्यारूपी) भोव-याच्या पलीकडे, वेदातीत, तिन्ही गुणांच्या पलीकडे असे आहे.

**अच्युतमादिमध्यांतमनंतं परमेश्वरम् ।**
**प्रकाशं दिव्यमानं च शाश्वतं चाचलं ध्रुवम् ।।२।।**

ते परब्रह्म विश्वाचा आदि, मध्य आणि अंत यांनी युक्त, अनंत, परमेश्वर, प्रकाशरूप, स्वतेजाने तळपणारे चिरंतन अढळ व स्थिर आहे.

**व्यापकं सर्वसाक्षित्वं सत्यत्वमजरामरम् ।**
**नियतं नित्यसत्त्वस्थं सच्चिदानंदनिष्कलम् ।।३।।**

ते परब्रह्म सर्वव्यापी, सर्वसाक्षी, सत्यसंपन्न, अजर, अमर, नित्य, सदैव सत्त्वगुणस्थित, सच्चिदानंद आणि कलारहित आहे.

**विशिष्टं पूर्णसज्ज्ञानमज्ञानांशविनाशनम् ।**
**अतीतमर्थरूपाणामीशमदृश्यतत्पदम् ।।४।।**

ते परब्रह्म वैविध्यपूर्ण, सम्यक ज्ञानाने परिपूर्ण, अज्ञानलेशांचाही नाश करणारे, पंचज्ञानेंद्रियें आणि त्यांचे विषय यांच्या पलीकडे असलेले, ऐश्वर्यसंपन्न, इंद्रियांना अगम्य आणि ('तत्त्वमसि' या महावाक्यात असलेले) 'तत्पद'रूप आहे.

**त्वंपदं भाषितं सर्वं रज्जुसर्पनिराश्रयम् ।**
**संतुष्टं निर्जितश्रांतं त्रैलोक्यभुवनोद्भवम् ।।५।।**

('तत्त्वमसि' या महावाक्यामध्ये 'त्वं'पदाने उल्लेखिलेले जीव, जगत् वगैरे) सर्व रज्जूवरील सापाप्रमाणे निराधार (मिथ्या) होय. याउलट त्रिलोक आणि भुवने यांचे उत्पत्तिकारण असणारे (तत्पदभाषित) परब्रह्म त्रिविध तापांनी गांजलेल्या आणि थकलेल्या (त्वंपदभाषित) जीवाला आत्मबोधाने तृप्त करते.

**अव्ययं श्रीनिधानं यत्सुलभं दैविसंपदम् ।**
**ज्ञानांजनसुकृताप्तमभ्यासाद्योगसंज्ञितात् ।।६।।**

दैवी संपत्तीने युक्त (असे जे त्वंपद भाषित सर्व) त्याला अष्टांगयोगातील असंप्रज्ञात

समाधिमुळे, अविनाशी विश्वबीजाचा ठेवा असलेले (तत्पद), ब्रह्मज्ञानरूपी अंजन घालण्याच्या सत्कर्मामुळे सुलभपणे प्राप्त होते.

**यच्चराचरयोः स्थानं पवित्रं यत्परात्परम् ।**
**निर्वाणं निर्भरं धिरं विस्तृतं सहजस्थिरम् ।।७।।**

ते ब्रह्म स्थावर जंगम विश्वाचे उत्पत्तिस्थान, अत्यंत पावन (वाणी चतुष्ट्यातील) परावाणीहून श्रेष्ठ, कल्पांती निर्वात प्रदेशातील ज्योतीप्रमाणे निश्चल असणारे, विश्वामध्ये भरून असणारे, धैर्यसंपन्न, आकाशाप्रमाणे सर्वव्यापी (ते आहे म्हणजे सर्व आहे, हा अन्वय, ते नाही म्हणजे काही नाही, हा व्यतिरेक अशा) अन्वय-व्यतिरेक न्यायाने सहज आणि स्थिर असे आहे.

**अभयं सत्त्वसान्निध्यं नियतं फलनिर्मलम् ।**
**दृश्यतन्मात्रविगतं चिन्मयं भवतारकम् ।।८।।**

(त्वंपदभाषित सर्वांच्या अंतर्यामी) दृश्यमान अशा विषय-विश्वाचे भान संपल्यानंतर ज्याला सात्त्विक बुध्दीचे सांनिध्य आहे (असे 'अहं ब्रह्मास्मि' हे विशुध्द फलरूप असे चैतन्ययुक्त) संसारसागरातून तारून नेणारे अभयप्रद ब्रह्म (वास करीत असते.)

**बीजं यत्सर्वलोकानां स्थितिप्रभवयोस्तथा ।**
**सर्वाणां लयबीजं यत्पुनरुद्भवकारणम् ।।९।।**

जे सर्व लोकांचे मूलकारण आहे, तसेच सर्व लोकांच्या उत्पत्ति, स्थिती, लय आणि पुनरुत्पत्ती या चारी अवस्थांचे कारण आहे (ते ब्रह्म होय.)

**अनादिसिद्धशुध्दोऽयं व्योमांतस्यावकाशकः ।**
**सर्वं प्रकाशकं ब्रह्म परमात्मा परात्परः ।।१०।।**

हा अनादिसिद्ध, शुद्ध (पृथ्वीपासून) आकाशापर्यंत असलेल्या पांचभौतिक विश्वाला सामावून घेणारा सर्वश्रेष्ठ विश्वात्मा म्हणजेच सर्वाला प्रकाशित करणारे ब्रह्म होय.

**परवृध्दिकरं सूक्ष्मं सर्वस्याधिष्ठितं हृदि ।**
**निमग्नं नित्यकालेन संतुष्टं सततं सुखम् ।।११।।**

सर्वांच्या हृदयामध्ये सूक्ष्मपणे वास करणारे आणि आत्मसत्तेने अन्य सर्वांची वृध्दी करणारे परब्रह्म (योगाभ्यासाद्वारे आपल्यामध्ये नित्य एकरूप होणा-या त्वंपदभाषित सर्वाला) तृप्ती आणि अखंड सुखाचा (लाभ करून) देते.

**चिरंजीवं चिदाकाशं चिदानंदं पराशयम् ।**
**सदैव संस्थितं शीघ्रमनिर्देश्यं सनातनम् ।।१२।।**

(पूर्व संदर्भात तत्पदाने अभिप्रेत असलेले परब्रह्म) हे चिरंजीव म्हणजे मरणातीत, चिदाकाश अर्थात ब्रह्मसाक्षात्काराने दृश्यविश्वाअभावी केवळ द्रष्टा या रूपाने असणारे ब्रह्मानंदरूप, परावाणीचा आधार असे (त्वंपदाने अभिप्रेत असलेल्या जीवाच्या अंतर्यामी नेहमीच चिरंतन वास्तव करणारे, मन आणि वाणी अशा इंद्रियांनी) अनिर्वाच्य (तथापि अविद्या निवृत्ती होताच) तत्काळ प्राप्त होणारे असते.

**अवस्थितमनाश्रितमचुंबितमनागमम् ।**
**सदसच्च विजातीनां विगतस्पृहनिःस्पृहम् ।।१३।।**

(परब्रह्म हे) अवस्थित अर्थात स्वभावरहित, अनाश्रित म्हणजेच निराधार, अचुंबित म्हणजे अस्पर्श, अनागम म्हणजे गतीरहित, तसेच सत् आणि असत् या परस्परविरुद्ध प्रकारांनीही अनिर्वाच्य आणि आप्तकाम असल्यामुळे निरिच्छ आहे.

**ज्ञप्तिमात्रकलातीतं शुध्दावस्थोन्मनिस्थितम् ।**
**विमर्षं सर्वनिष्कर्षं वासनातीतवत्स्थितम् ।।१४।।**

(परब्रह्म हे साक्षात्काराच्या अवस्थेत ज्ञाता, ज्ञेय आणि ज्ञप्ति म्हणजेच) साक्षात् ज्ञान यांच्या पलीकडे असते. (त्या अवस्थेत म्हणजे) शुध्दावस्थेत अथवा उन्मनी अवस्थेत ते सदैव असते. या अवस्थेत मृषाभाव म्हणजेच संसाराचा मिथ्याभाव संपलेला असतो, म्हणून ते सर्व वेदांताच्या निष्कर्षरूप, वासनातीत शाश्वत अवस्थेमध्ये असते.

**शृणोति सर्वमश्रोता सर्वं स्पृशति चात्वचा ।**
**पश्यत्यचक्षुषा सर्वं रसं गृह्यात्यजिव्हया ।।१५।।**

(त्वंपदामध्ये अभिप्रेत असलेल्या जीवात्म्याचे ठिकाणी पंच ज्ञानेंद्रिये आणि त्यांचे शब्द, स्पर्श इ. पाच विषय यांच्या ज्ञानाची प्रेरणा तत्पदाने अभिप्रेत असलेले ब्रह्मच असल्यामुळे आणि ते इंद्रियातीत असल्यामुळे) ते श्रवणेंद्रियाशिवाय सर्व ऐकते, त्वक् इंद्रियाशिवाय सर्वांना स्पर्श करते, चक्षु इंद्रियाशिवाय सर्व रूपे पाहते आणि रसना, जिव्हा या इंद्रियाशिवाय सर्व रसांचा आस्वाद घेते.

**घ्रात्वापि सर्वमघ्राता मूको बहुवचोऽपि यः ।**
**अकरः सर्वकर्तापि पादहीनोऽपि सर्वगः ।।१६।।**

तसेच ते घ्राणेंद्रियाशिवाय सर्वांचा गंध घेते. (तत्त्वमसि या महावाक्यातील ऐक्याला अनुसरून तत्पदाने अभिप्रेत असलेले ब्रह्म अतिंद्रिय असल्यामुळे वाक् इंद्रियाअभावी मूकच होय. (तथापि त्वंपाने अभिप्रेत असलेल्या असंख्य जीवांद्वारे) तेच बहुभाषक आहे. तसेच स्वतः अकर्ता असूनही सर्व काही करणारे आहे, पाय नसतानाही सर्वसंचारी आहे.

**उपस्थे मन्मथश्चैव पायुः सर्वविवर्जितः ।**
**गुणातीतमसंभाव्यं सर्वेंद्रियविवर्जितम् ।।१७।।**

जननेंद्रियाच्या ठिकाणी ते कामदेवच आहे, तर गुद इंद्रियाच्या ठिकाणी सर्वांचे विसर्जन करण्याचे सामर्थ्य असलेले असे ते आहे. तसेच ते (प्रकृतीच्या पलीकडील असल्यामुळे सत्त्व, रज, तम या त्रि-) गुणातीत, अज आणि इंद्रियविरहित आहे.

**नांतःकरणरूपं तन्न संकल्पं न मानसम् ।**
**बुध्दिबोधश्च तन्नैव चित्स्मरणं न चैव तत् ।।१८।।**

(मानवी व्यक्तिमत्त्वातील ज्ञानप्रक्रियेमधील शरीर, इंद्रिय, मन, बुध्दी, अहंकार ही यंत्रणा लक्षात घेता) परब्रह्म अंतःकरणरूप नाही, संकल्परूप नाही, बुध्दीने होणा-या ज्ञानाच्या स्वरूपाचेही ते नाही, तसेच चित्ताच्या स्मरणरूपाचेही ते नाही.

**उदानो नैव प्राणोऽयमपानो नैव निश्चितम् ।**
**न च व्यानः समानश्चः देहाहंता हि नैव सः ।।१९।।**

(जीवाची धारणा ज्या पंचप्राणांवर अवलंबून असते त्या प्राण, अपान इत्यादीहूनही ब्रह्म

वेगळे ते) उदान नव्हे, प्राण अपान नव्हे आणि समानही नव्हे. इतकेच काय तर पंचप्राणांनी युक्त असलेल्या या देहातील अहंकार भावही ते नव्हे.

**गृहस्थो नैव संन्यासी भोक्ता त्यक्ता न चैव सः ।**
**न वक्ता न हि मूकश्च न ग्राह्यो ग्राहको न सः ।।२०।।**

(आश्रमधर्माच्या पार्श्वभूमीवर त्वंपदाने अभिप्रेत असलेल्या ब्रह्मचर्य, गृहस्थ, इ. वेगवेगळ्या अवस्था येतात. त्यांना अनुसरून परब्रह्म या अवस्थातील) गृहस्थही नाही, सन्यासीही नाही, ते कसला उपभोग घेत नाही आणि त्यागही करीत नाही. ते वक्ताही नाही आणि मूकही नाही. ते ज्ञेयही नाही आणि ज्ञापकही नाही.

**नैव नाम न धामं च न चोष्णं शीतमेव च ।**
**न तिमिरं प्रकाशश्च रात्रिर्नैव दिनो न च ।।२१।।**

(त्वंपदाने अभिप्रेत असलेल्या जीवात्म्याच्या नामरूप, शीतोष्ण, अंधार-प्रकाश, रात्र-दिवस या उपाधि आहेत). परब्रह्म निरुपाधिक असल्यामुळे ते नामही नव्हे, धामही नव्हे, उष्णही नव्हे, शीतही नव्हे, अंधारही नव्हे, प्रकाशही नव्हे, रात्रही नव्हे आणि दिवसही नव्हे.

**नायं पुमान्न नारी च क्लीबो नैव न मानवः ।**
**नैनं रूपं न चाकारो न कुक्ष्युदरपृष्ठयः ।।२२।।**

(निराकार प्रबह्म कोणत्याही अर्थाने साकार होऊ शकत नाही, हा तात्त्विक मुद्दा विचारात घेऊन) ते परब्रह्म (परमात्मा) पुरूष नाही, स्त्री नाही, नपुंसक मानवरूप नाही, रूप आणि आकार यांच्या अभावी हा मानवरूपात कूस, उदर आणि पाठही नव्हे.

**न भक्षन्न रक्षन्न चेक्षन्न साक्षी परोक्षापरोक्षे न दृश्यं न लक्ष्यम् ।**
**न वेद्यं न भेद्यं ह्यखेदंस्त्वमोदमबाधं न च स्वादमेतन्न सर्वम् ।।२३।।**

(बाधाभावः सत्यम् अशी सत्याची व्याख्या केली जाते, तिला अनुसरून परमात्मा सत्य आहे, जगत् मिथ्या आहे विशद करताना सोहिरोबा म्हणतात) भक्षण करणे, रक्षण करणे, पाहणे या क्रिया तो (परमात्मा) करीत नाही, तो कशाचा साक्षी नाही, तो परोक्ष नाही आणि प्रत्यक्षही नाही. तो दृश्यरूप नाही, अनुमेय नाही, जाणणे आणि भेद करणे या क्रयांचा तो विषय नाही. त्याला खेद नाही, आनंद नाही, बाधा नाही, रूची नाही, इतकेच काय हे दृश्यमान जगत् ही तो नाही.

**न जातिर्न तथा ज्योतिर्न शुध्दिश्च प्रशंसनम् ।**
**न गानं नैव च ध्यानं प्रीतिर्न च रीतयः ।।२४।।**

(परब्रह्म अज म्हणजे जन्मरहित असल्यामुळे) ते जाती नव्हे, तसेच ते अक्रिय असल्यामुळे (क्रियेच्या अधिन असलेली) ते ज्योति नव्हे, (ते निरंजन असल्यामुळे) शुध्दी नव्हे, (अनिर्वचनीय असल्यामुळे) ते स्तुत्यही नव्हे, (ते मंत्र नसल्यामुळे) गायन नव्हे, (ध्याता, ध्येय या स्वरूपात ते व्दैत नसल्यामुळे) ध्यान नव्हे, (एकमेवाव्दितीय) ते प्रीती नव्हे आणि परंपराही नव्हे.

**न छेद्यं न बध्यं न गंध्यं न सुगंध्यं न निंद्यं न वंद्यं न वश्यं न व्यक्तम् ।**
**न चांगं न संगं न चांतं च भंगं अनंगं ह्यसंगं त्वनंतं ह्यभंगम् ।।२५।।**

(परब्रह्म नित्यशुद्ध, मुक्त, बुद्धस्वरूप असल्यामुळे) तोडणे, बांधणे, गंधयुक्त करणे, सुगंधित असणे या लौकिक क्रियांचा ते विषय होऊ शकत नाही. (स्वतंत्र म्हणजेच मायेच्या प्रभावापलीकडचे असल्यामुळे) ते स्तुती वा निंदा यांचा विषय होत नाही, ते पराधिन असू शकत नाही, (एकमेवाव्दितीय असल्यामुळे) ते व्याकृत स्वरूप नाही, (अनादि मायेचा म्हणजेच अविद्येचा त्याला संपर्क नसल्यामुळे) ते सावयव नाही, त्याला संपर्क नाही, अंत नाही आणि म्हणून ते अनंग (कामरहित), असंग (संगरहित), अनंत (अंतरहित) अभंग (भंगरहित) आहे.

**नास्ति वायोर्गतिर्यत्र शशिभान्वोर्न चालयम् ।**
**तत्पदं निर्मलं यांति योगिनः सुकृतात्परात् ।।२६।।**

(एकमेवाव्दितीय अशा परब्रह्माच्या संकल्पामुळे आकाशादी सृष्टी निर्माण झाली, ती लक्षात घेता त्या सृष्टीच्या पाशर्वभूमीवर परब्रह्म हे महाकाशच असल्यामुळे) त्याच्या ठिकाणी वायू या पांचभौतिक तत्त्वाची गती नाही, त्याचप्रमाणे सूर्य आणि चंद्र या पांचभौतिक तेजांचीही गती नाही, ते कशाचाही आलय (आधार) नाही, अशा त्या (तत्पदाने अभिप्रेत असलेल्या) मलरहित परब्रह्माप्रत केवळ योगीच आपल्या योगसाधनेने (सत्कर्मामुळे) जातात.

**तमो नास्ति रजो नास्ति नास्तिसत्त्वं स्वसत्कृतम् ।**
**न जीवशिवभेदश्च शबलं शुद्धकल्पितम् ।।२७।।**

(ब्रह्म सत्यं जगत् मिथ्या या तत्त्वाला अनुसरून सत्त्व, रज आणि तम असे त्रिगुणात्मक जग मिथ्या असल्यामुळे) परब्रह्म तमोगुण नाही, रजोगुण नाही आणि स्वतःच्या पुण्यकर्मावर आधारलेला सत्त्वगुणही नाही. तसेच (जीवो ब्रह्मैव नापरः या तत्त्वानुसार) परब्रह्म मायेच्या उपाधिवर अवलंबून असलेला ईश्वर नाही, तसेच अविघेच्या उपाधिवर असलेला जीवही नाही. ते कारणरूप सोन्याप्रमाणे असल्यामुळे त्यावर (अलंकारांचे) वैविध्य नाही आणि उपाधिकल्पित शुद्धही नाही.

**न व्योम न च भूमिर्नानलं न जलमारुतौ ।**
**ब्रह्मांडं नैव पिंडश्च न प्रचंडमुदंडितम् ।।२८।।**

(सदेव सोम्य इदमग्र आसीत् एकमेवाव्दितीयम् या तत्वानुसार परब्रह्म हे सृष्ट्युत्तरकालीं अस्तित्वात आलेले पांचभौतिक) आकाश नव्हे, पृथ्वी नव्हे, तेज नव्हे, (त्यामुळे) ते अनंतकोटी ब्रह्मांड मुळींच नाही, ते व्यष्टिरूप पिंडही नाही. ते केवळ विशाल आणि उदंड ब्रह्म होय.

**सप्तद्वीपानि खंडानि पर्वताः सागरास्तथा ।**
**आवरणानि सर्वाणि प्रलये नश्वराणि वै ।।२९।।**

(पूर्व संदर्भातील विश्व आणि पिंड ब्रह्मांड यांचे नित्यत्व स्पष्ट करून पार्थिव सृष्टी म्हणजेच पृथ्वीलोक मिथ्या कसा हे स्पष्ट करताना सोहिरोबा म्हणतातः सप्तव्दीपा वसुमती अशा पृथ्वीवरील ) सात व्दीपे, नऊ खंडे, सगळे पर्वत, त्याचप्रमाणे पार्थिव विश्वाबरोबर आपविश्व, तेजोविश्व, वायुविश्व आणि ही सर्व आवरणें कल्पांती नाश पावणारीच आहेत.

**न च स्थूलो न सूक्ष्मश्च महाकारणकारणे ।**
**सर्वं चराचरं नास्ति कैवल्यमेव शाश्वतम् ।।३०।।**

(वरील पाश्वभुमीवर ब्रह्मांडात्मक सर्व स्थावर जंगम सृष्टी नश्वर आहे त्यामुळे परब्रह्म हे या सृष्टीच्या स्वरूपातील) स्थूलदेह नव्हे, लिंगदेह नव्हे, त्यापलीकडेअसलेला कारणदेहही ते नव्हे आणि आनंदस्वरूप महाकारणही ते नव्हे, त्यामुळे केवळ परब्रह्मच चिरंतन होय.

**देवो भक्तो न यत्रैव बद्धमुक्तौ तथा न तु ।**
**न च स्नानं न संध्या च स्थानमानादि नैव तत् ।।३१।।**

(विश्व हा मायेचा पसारा असल्यामुळे व मायेपलीकडील परब्रह्म जीवस्वरूप नसल्यामुळे) त्याच्या ठायीं देव, देवाचा उपासक तसेच बद्धजीव किंवा मुक्तजीव या संकल्पना नसतात. (जीवभावाच्या अभावी जीवाला उद्देशून असलेली) स्नान, संध्या, मान वगैरेही शाश्वत ब्रह्माला मुळीच नसते.

**ऋध्दिर्नैव न सिध्दिश्च न प्रबुध्दिर्न वेदनम् ।**
**न च ज्ञानं न चाज्ञानं न शिष्यो नैव सद्गुरुः ।।३२।।**

(योगाभ्यासाने जीवाला परब्रह्म प्राप्ती होते, या अवस्थेत) या ब्रह्मभावाला अणिमा, महिमा, इ. अष्टसिध्दी नसतात. (तो ब्रह्मभाव म्हणजे बुध्दीचा प्रकर्ष नव्हे, इंद्रियज्ञान नव्हे आणि अज्ञानही नव्हे. (एकमेवाव्दितीय अशा स्वरूपामुळे) येथे शिष्यही नाही आणि गुरूही नाही.

**नैव सौख्यं न दुःखं च न च कामो न कल्पिता ।**
**भावाभावौ न विद्येते तस्मिन्ब्रह्मनिरंजने ।।३३।।**

(परब्रह्मभाव हा असा आहे की तेथे विषयसंगजन्य) सुख नाही तसेच (विषयवियोगजन्य) दुःखही नाही. (ब्रह्म हे स्वरूपतः आप्तकाम असल्यामुळे) तेथे कामही नाही आणि कामावर आधारलेल्या कोणत्या कल्पनाही नाहीत. तसेच (निष्कलंक शुद्ध अशा त्या परब्रह्माच्या ठिकाणी विश्वसापेक्ष) भावही नाही आणि अभावही नाही.

**न निद्राजागरौ यत्र नैव मुद्रा न धारणम् ।**
**नैव त्यागो न भोगश्च तस्मिन्ब्रह्मनिरंजने ।।३४।।**

(त्वंपदामध्ये अभिप्रेत असलेल्या जीवाच्या निद्रा आणि जागृति या दोन अवथ्या निरंजन परब्रह्मामध्ये नसतात. (योग्याला अभिप्रेत असलेल्या) मुद्रा, धारणादी अंगेही तेथे नसतात आणि (जीवसापेक्ष) त्याग वा भोगही तेथे नसतात.

**रुद्रो नैव च विष्णुर्न नैव ब्रह्मा तु निर्मिताः ।**
**नैव मंत्रो न तंत्रं च तस्मिन्ब्रह्मनिरंजने ।।३५।।**

(परब्रह्मप्राप्ती ही योगमार्गातील अंतिमावस्था असल्यामुळे त्या निरंजन परब्रह्माच्या ठिकाणी मायाधिष्ठित अपरब्रह्यावर आधारलेला विश्वउत्पत्तिकर्ता) ब्रह्मा तेथे नाही, (विश्वपालनकर्ता) विष्णू तेथे नाही आणि (विश्वसंहारकर्ता) रूद्रही तेथे नाही. (सर्वातीत अशी ही अवस्था असल्यामुळे परब्रह्म प्राप्तीचा साधना असलेला) मंत्रही तेथे नाही आणि तंत्रही त्या परब्रह्माच्या ठिकाणी नाही.

**नैव विप्रो न राजन्यो न च वैश्यो न शूद्रता ।**
**देवेऽजे सर्वजाते तु तस्मिन्ब्रह्मनिरंजने ।।३६।।**

(जीवो ब्रह्मैव नापरः या तत्त्वाला अनुसरून योगाभ्याससाध्य ब्रह्मभावाच्या ठिकाणी

म्हणजेच) दिव्य जन्मरहित आणि सर्वांतर्यामी अशा त्या निरंजन परब्रह्माच्या ठिकाणी (जीव सापेक्ष) ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र हे वर्णभावही नाहीत.

**नैवावरणवर्णौ त्वप्रसरणमसंज्ञितम् ।**
**ज्ञानमयं च सर्वज्ञं दिव्यं ब्रह्म निरंजनम् ।।३७।।**

ज्ञान हेच ज्याचे रूप आहे असे हे निरंजन, दिव्य परब्रह्म (हे काष्ठातील अग्नीप्रमाणे) आवरणयुक्त नाही, वर्णयुक्त नाही, प्रसरणशील नाही आणि कोणत्याही संज्ञेने ज्ञात होणारेही नाही.

**नियामकं दुराधर्षं निराकर्षं निषूदनम् ।**
**न च लिप्तमलिप्तत्वात्तच्च ब्रह्म निरंजनम् ।।३८।।**

(संसारी जीव हा मायोपाधिक असल्यामुळे तो विश्वनियमानी बद्ध, परवश कर्मफलाकृष्ट, परतंत्र आणि कर्मभोगलिप्त असल्यामुळे त्याच्या विरूध्दावस्थेत असलेले) निरंजन परब्रह्म हे सृष्टिनियामक, कष्टसाध्य, सर्वसत्ताधिश, शासनधर्मरहित आणि अकर्ता असल्यामुळे कर्माच्या दोषाने लिप्त न झालेले असते.

**।। इति श्रीसिध्दान्तसंहितायां सोहिराविरचितायां सदात्मस्वरूपयोगो नाम प्रथमोऽध्यायः संपूर्णः ।।**

# अध्याय दुसरा

## भूतकर्दमसंगम

**अस्मिन्ब्रह्यनिराकारे जातो मायासमुद्धवः।**
**अंह ब्रह्यास्मि तस्माच्च महत्तत्त्वं तु कारणम् ।।१।।**

निराकार ब्रह्माला अहं ब्रह्मास्मि (मी ब्रह्म आहे) असा अहंकार निर्माण झाला त्यांतून मायेची उत्पत्ती झाली आणि त्या मायेतूनच महत्तत्त्व बाहेर पडले.

**तत्रैव शबलांशात्त्वादौ रुद्रस्य समुद्धवः ।**
**तद्योगाद्दव्यशक्तिश्च तस्यां विष्णोः सुसंभवः ।।२।।**

(महत्तत्वापासून ज्या शक्ती निर्माण झाल्या. त्यांतील मलिनसत्त्वप्रधान) शबलशक्ती मधून प्रथम रुद्र निर्माण झाला. त्याच्या द्रव्यशक्तीच्या संयोगामुळे विष्णूची निर्मिती झाली.

**अहंकाराच्च सत्त्वात्तु ज्ञानशक्तेः सुसंभवः ।**
**तदुत्पन्नविधाता च जायते त्र क्रिया ननु ।।३।।**

(विष्णूच्या) सात्त्विक अहंकारातून ज्ञानशक्तीचा उगम झाला, त्यांतून ब्रह्मदेवाचा जन्म झाला. त्याच्या क्रियाशक्तीने सृष्टिनिर्मितीला आरंभ झाला.

**सत्त्वं विष्णुस्तमो रुद्रः रजस्तु कमलासनः ।**
**सर्वं त्रिगुणसंयुक्तं विस्तृतं सृष्टिकारणम् ।।४।।**

विष्णू सत्तगुणाने युक्त आहे, रूद्र तमोगुणी आहे, ब्रह्मदेव रजोगुणी आहे. हे तिन्ही गुण एकत्रमिळून ह्या विशाल सृष्टीचे कारण झालेले आहेत.

**महत्तत्त्वाख्यमाया या अहमीश्वर एव च ।**
**संजातनिश्चयो यस्तु तमःक्रियासमुद्भवः ।।५।।**

महत्तत्त्वमायेमध्ये मी ईश्वर आहे असा अहंकार निर्माण झाला त्यामुळे अज्ञानाची (अविद्येची) स्थापना झाली, त्यांतून (तमोगुणातून) दृश्यसृष्टी निर्माण झाली.

**तस्माच्च प्रथमं शून्यं गगनोदरसंभवम् ।**
**पंचतन्मात्रमुत्पन्नं कुतोअ ग्रे तदिदं शृणु ।।६।।**

अविद्येपासून प्रथम शून्य अवस्थेतून (अवकाशातून) आकाश निर्माण झाले. पुढे तन्मात्रा कशा निर्माण झाल्या ते ऐक.

**गगने तु भवेच्छब्दो रसस्त्वभवदप्सु च ।**
**स्पर्शरूपौ च वाय्वग्र्योर्गंधोअयं मेदिनीगुणः ।।७।।**

आकाशामध्ये शब्द तयार झाला, पाण्यामध्ये रस निर्माण झाला, वायू आणि तेज यांमध्ये (अनुक्रमे) स्पर्श आणि रूप हे गुण तयार झाले आणि पृथ्वीमध्ये गंध निर्माण झाला.

**सात्त्विकज्ञानसंयोगादंतःकरणपंचकम् ।**
**सप्राणमिंद्रियाधिनं तच्चप्राक्तनयोगतः ।।८।।**

सात्त्विक अहंकाराच्या (आणि ज्ञानशक्तीच्या) संयोगामुळे अंतःकरणपंचक निर्माण झाले. नंतर (जीवाच्या) प्रारब्धयोगाप्रमाणे त्यावर आधारित असलेली इंद्रियें व प्राण उत्पन्न झाले.

**अंतःकरणव्योमांशं निर्विकल्पं स्थितं तथा ।**
**वायोरंशान्मनश्चात्र संकल्पकविल्पकम् ।।९।।**

अंतःकरण हा आकाशाचा अंश असून ते निर्विकल्प असते. वायूच्या अंशापासून मनाचा उगम होतो (म्हणून)ते मन संकल्प व विकल्प अशा दोन्ही रूपांचे असते.

**तेजःसंभूतबुध्देश्च स्वभावो निश्चयात्मकः ।**
**चित्तस्योदकभूतस्य स्वभावः स्मृतिकारकः ।।१०।।**

तेजापासून निर्माण झालेल्या बुध्दीचा स्वभाव निश्चयात्मक असतो. जलापासून उत्पन्न झालेल्या चित्ताचा स्वभाव स्मृतिकारक (आठवण करून देणारा) आहे.

**अहंकारो महीभूतो बध्तायाचाक्ष कारणम् ।**
**इति प्रकरणं चोक्तं सत्त्वाहंकारसंयुतम् ।।११।।**

अहंकार हा पृथ्वीपासून निर्माण झाला आहे. त्याच्यामुळेच (जीवाला) बद्धता येते. अशाप्रकारे सात्त्विक अहंकारापासून निर्माण होणा-या अंतःकरणपंचकाचे विवरण झाले.

**राजसं कारणोत्संगं क्रियाशक्तिसमन्वितम् ।**
**ज्ञानेंद्रियसमुत्पन्नं तथा यत्प्राणपंचकम् ।।१२।।**

रजोगुणाचा क्रियाशक्तीशी संयोग झाल्यामुळे कान, त्वचा, डोळे, जीभ व नाक ही पाच ज्ञानेंद्रियें निर्माण होतात. आतां प्राणपंचकाचे विवरण करतो.

**प्राणोअपान उदानश्च समानो व्यानसंज्ञितः ।**
**वाचा तु पाणिपादौ चोपस्थं च गुदमेव हि ।**
**पंचकं प्राणवायोश्चेदं कर्मेंद्रियपंचकम् ।।१३।।**

प्राण, अपान, उदान, समान व व्यान नावाचे पाच प्राण आहेत आणि वाणी, हात, पाय, शिश्न व गुद ही प्राणवायूमुळे कर्म करणारी पाच कर्मेंद्रिये आहेत.

**पंचविंशतितत्त्वान्येवं च कर्मेंद्रियैः सह ।**
**तान्याश्रित्य तु जीवश्चाज्ञानान्मुह्यत्ययं ननु ।।१४।।**

अशा प्रकारे कर्मेंद्रियांसह ही एकूण पंचवीस तत्वे आहेत. त्यांचा आश्रय केल्यामुळे जीव अज्ञानाने खरोखर मोहित होतो.

**आकाशसंभवं श्रोत्रं त्वक्व वायुसमाश्रिता ।**
**तेजोरूपं तु चक्षुश्च रसना जलमाश्रिता।।१५।।**

कर्णेंद्रिय आकाशापासून निर्माण झाले आहे. त्वगिंद्रिय (त्वचा) वायूपासून निर्माण झाले आहे, चक्षुरिंद्रिय (डोळा) तेजापासून निर्माण झाले आहे. रसनेंद्रिय (जीभ) पाण्यापासून निर्माण झाले आहे.

**पृथ्वीभूतमिदं घ्राणं गंधरूपेण सोज्ज्वलम् ।**
**एवं च कथितं सर्वं ते ज्ञानेंद्रियकारणम् ।।१६।।**

पृथ्वीपासून निर्माण झालेले घ्राणेंद्रिय (नाक) हे गंधाचे स्वीकार करणारे आहे. आशाप्रकारे (तुला) निरनिराळी प्रयोजने सांगितली.

**व्यानो गगनसाह्यार्थ व्याप्तः सर्वशरीरगः।**
**पवनांशः समानस्तु नाभिस्थानसमाश्रितः ।।१७।।**

व्यान हा आकाशाचा अंश असून तो सर्व शरीर व्यापून राहणारा आहे. समान हा वा-याचा अंश असून तो नाभीमध्यें वास करून असतो.

**उदानस्तेजयुक्तोऽयं ग्रीवामंडलमाश्रितः ।**
**आहारसेवनं कृत्वा पाकं नयति सर्वदा ।।१८।।**

उदानवायू हा तेजाचा अंश असून त्याचा निवास कंठामध्ये आहे. तो आहाराचा स्वीकार करून त्याचे नेहमी पचन करतो.

**प्राणश्चोदकसंयुक्तोः नासिकस्थानमाश्रितः ।**
**रसभोक्तृत्वसंतुष्टः क्रियाशक्तिः सुसंगतः ।।१९।।**

प्राणवायुमध्ये जलाचा अंश असून तो नाकामध्ये वास करतो. रसांचा आस्वाद घेतल्यामुळे त्याला आनंद होतो. हा प्राणवायु क्रियाशक्तीने युक्त आहे.

**अपानो मेदिनीभागो गुदमेंद्रसमाश्रितः ।**
**विसृष्टमलमूत्रश्च शरीरशुद्धीकारकः ।।२०।।**

अपानवायु हा पृथ्वीचा अंश असून तो गुद व शिश्न यांच्या ठिकाणी राहतो. त्याच्यामुळे मलमूत्रांचे विसर्जन होते, त्यामुळे तो शरीराची शुध्दी करणारा आहे.

**वाचा तु व्योमसंभूता करावनिलसंगातौ ।**
**पादौ तु तेजसो जातौ भारं देहस्य वाहकौ ।।२१।।**

वाणी आकाशापासून निर्माण झाली. हात वायूपासून व देहाचा भार वाहाणारे पाय तेजापासून निर्माण झाले आहेत.

**उपस्थं मन्मथोपेतं जलतत्वाच्च जायते ।**
**महीतत्वाद्गुदं जातं वै कर्मेंद्रियकारणम् ।।२२।।**

मदनाने युक्त असलेले शिश्नेंद्रिय जलतत्वापासून निर्माण होते. पृथ्वीतत्वापासून गुदेंद्रिय होते. अशा प्रकारे ही (पाच तत्वे) कर्मेंद्रियांचे कारण आहेत.

**द्रव्यशक्त्या तमोऽसूत पंचतन्मात्रसंज्ञितम् ।**
**शब्दस्पर्शौ रसो रुपं सुगंधश्चेति संज्ञितः ।।२३।।**

तमोगुणाने आणि द्रव्यशक्तीच्या संयोगाने पंचतन्मात्रांची निर्मिती केली. शब्द, स्पर्श, रस, रूप व गंध हीं तीं पंचतन्मात्रे आहेत.

**अंतराश्रितबीजं तु व्यानांशेन विवर्धितम् ।**
**खे वचः प्रभवेत्तत्र श्रोत्रव्दारमपावृतम् ।।२४।।**

(अर्थ-द्रव्य, स्वार्थ-काम, इच्छा ही ज्यात बीजरूपाने आहेत, अशी शब्दगर्भरूप पाने असलेल्या पिंडातील) शब्दवृक्षाचे बीज अंतःकरणरूपी पृथ्वीवर पडते त्याला व्यानवायु वाढवितो. ते उघडलेल्या कर्णेंद्रियामध्ये पडून नंतर (त्याचा वृक्ष बनून तो) आकाशापर्यंत विस्तारतो.

**मनः समानसंयुक्तं त्वगिंद्रियसमाश्रितम् ।**
**पाणियुक्तमगच्छत्तु स्पर्शगुणं च मारुतम् ।।२५।।**

मनाचा समानवायूशी संयोग होऊन ते त्वगिंद्रियाचा आश्रय घेते. त्याचा (मनाचा) स्पर्श हा गुण असून ते हातामध्ये प्रवेश करून वायुमध्ये जाते.

**उदानसंयुक्ता बुद्धिः पादेंद्रियसमन्विता ।**
**चक्षुर्युक्ता च संयाति गुणरूपं तु तैजसम् ।।२६।।**

उदानवायु युक्त असलेली बुद्धी, पादेंद्रिय व चक्षुरिंद्रिय यांच्याशी संयुक्त होऊन तेजोगुणाचे रूप धारण करते.

**चेतः प्राणप्रयुक्तं च द्रियसमाश्रितम् ।**
**उपस्थसहितं वारित्त्वमायाति सौरसम् ।।२७।।**

प्राणवायूने युक्त असलेले चित्त जिव्हेंद्रिय, शिश्नेंद्रिय यांच्या सहकार्याने जलतत्त्वाचे रस, रूप धारण करते.

**अहंकृतिस्त्वपानेन युक्ता घ्राणगुदान्विता ।**
**गंधगुणं च भूतत्त्वं प्रविशति सुखाश्रितम् ।।२८।।**

अपानवायूने युक्त असलेला अहंकार घ्राणेंद्रियाच्या व गुदेंद्रियाच्या सहकार्याने पृथ्वीतत्त्वाचे सुखमय असे गंधरूप धारण करतो.

**एवं तु सूक्ष्मभूतांना संगमः कर्दमो महान् ।**
**परतंत्रकरश्चायं कार्यकारणसंभवः ।।२९।।**

असा हा एकत्र झालेल्या सूक्ष्मभूतांचा चिखल म्हणजे शरीर आहे. हा कार्यकारणभावातून निर्माण झाला आहे व तो परतंत्र असून (विषयांच्या अधिन) आहे.

**व्योमहेतुश्च व्यानस्तु युक्ततेजोऽभवच्छ्रुतिः।**
**स एव जलमाश्रित्य शब्दतां याति विस्फुटाम् ।।३०।।**

व्यानवायुला आकाश कारण असून, तोच तेजाशी संयोग पावल्यानंतर कर्णेंद्रिय होतो. तोच जलतत्त्वाशी संयुक्त झाला असता शब्दरूप धारण करतो.

**गगनं च महीयुक्तं शब्दाहंकारमाश्रितम् ।**
**स्वतःसिद्धमिदं रूपमंतःकरणसुस्थिरम् ।।३१।।**

आकाश पृथ्वीशीं संयोग पावून जेव्हा शब्दाभिमानाने युक्त होते तेव्हा स्वतः अंतःकरणाचे रूप धारण करते.

**अतिक्रांतो मनोवेगो गगनोदरसंभवः ।**
**तेजःसमानयुक्तोऽयं त्वक्चैवं जायते खलु ।।३२।।**

वायूचा आकाशाशी संयोग झाला असता मनाचा (संकल्पविकल्पांचा) वेग वाढतो. समानवायूचा तेजाशी संयोग होवून स्पर्शज्ञान होते.

**पाणींद्रियेण वायुस्तु जलतत्त्वं च गच्छति ।**
**स एव स्पर्शयोगाच्च भूतत्त्वमधिगच्छति ।।३३।।**

वायूच हातांच्या साहाय्याने जलतत्त्वामध्ये प्रवेश करतो. तसेंच तो स्पर्शाच्या साहाय्याने पृथ्वीतत्त्वामध्ये प्रवेश करतो.

**बुद्ध्यावकाशतत्त्वं तूदानांशेनैव चानिलम् ।**
**तेजसः संगमो जातो त्वगिंद्रियेण चोदकम् ।।३४।।**

तेज बुद्धीच्या संयोगाने आकाशतत्त्वाशी मिळून जाते, ते उदानाच्या सहकार्याने वायूमध्ये मिळून जाते व तेच त्वगिंद्रियाच्या साहाय्याने जलामध्ये प्रवेश करते.

**पादेंद्रियेण पृथ्व्यां तु रूपेण चक्षुषोः स्थिरम् ।**
**उदकेनावकाशं च प्राणैः पवनसंयुतम् ।।३५।।**

तेज पादेंद्रियांच्या साहाय्याने पृथ्वीमध्ये प्रवेश करते व स्वभावतः डोळ्यामध्ये स्थिर होते. जलतत्त्वाच्या साहाय्याने ते आकाशाला मिळते आणि प्राणांच्या सहकार्याने

**वायूला मिळते. तोयं च तेजोयुक्तं भवेत्तनु ।**
**स्वतंत्रोपस्थसंयुक्तं रसमात्रेण भूयुतम् ।।३६।।**

पाणी तेजाने युक्त होते. शिस्नेंद्रियामध्ये ते स्वतंत्र रीतीने राहते आणि ते पृथ्वीमध्ये रसाच्या रूपाने राहते.

**भूनभः संयुतोऽहंकारोऽपानो ह्येव संज्ञितः ।**
**सतेजो घ्राणसंयुक्तो गंधो नीरेण मिश्रितः ।।३७।।**

पृथ्वी व आकाशाने युक्त अशा अहंकाराला अपान ही संज्ञा आहे. तो तेज, जल व घ्राणेंद्रिय यांनी युक्त झाला असता गंधरूप धारण करतो.

**स्वतंत्र गंधरूपं तु पायुस्थजलमिश्रितम् ।**
**एवमन्योन्यकृद्भूतसंघः कर्दम एव हि ।।३८।।**

गुदातील जलाशीं मिश्रित झालेले गंधाचे रूप स्वतंत्र आहे. अशा प्रकारे परस्परांना निर्माण करणा-या पाच महाभूतांचा समुदाय म्हणजेच देहरूपी चिखल आहे.

**तत्त्वसंघे प्रधानं तु स्वंतः करमपंचकम् ।**
**त्रिपंचकं तु भृत्यत्वं सिद्धं विषयपंचकम् ।।३९।।**

(या पंचवीस) तत्त्वांच्या समूहामध्ये अतःकरणपंचक मुख्य आहे. (पाच ज्ञानेंद्रियें, पंचप्राण, पाच कर्मेंद्रियें ही) तीन पंचके त्याचे नोकर आहेत. याशिवाय विषयपंचक हे चौथे पंचक आहे.

**एवं च पंचभूतांना संभ्रमः सूक्ष्मसंभवः ।**
**बोधेनास्य त्रितापाश्च नश्यंति तदिदं शृणु ।।४०।।**

असा हा अतिशय सूक्ष्म पंचमहाभूतांचा संभ्रम (गोंधळ) आहे. ह्यांच्या ज्ञानामुळे तिन्ही प्रकारचे ताप नाहींसे होतात, म्हणून तू हे श्रवण कर.

**।। इति श्रीसिध्दान्तसंहितायां सोहिराविरचितायां भूतकर्दमसंगमो नाम व्दितीयोऽध्यायः संपूर्णः ।।**

# अध्याय तिसरा

## त्रिविधतापकथन

**ब्रह्मांडरूपं वैराजमव्ययं यस्य दैवतम् ।**
**हिरण्यगर्भसूक्ष्मं तत्पिंडानामाधिदैवतम् ।।१।**

शाश्वत अशा परमेश्वराचे ब्रह्मांड हे विराटरूप असून ते पिंडाची (जीवाची) अनेक दैवते आहेत. त्या पिंडाच्या सूक्ष्मदेहांचे (समष्टिरूपाने) हिरण्यगर्भ हे अधिदैवत आहे.

**अध्यात्मं चाधिभूतं तु जीवानां देहमाश्रितम् ।**
**अस्य संगेन भुंजंति सुखदुःखेन विस्मिताः ।।२।।**

अध्यात्म व अधिभूत हे जीवाच्या देहांचा आश्रय करून राहतात.त्यांच्या सहवासामुळे जीव (भ्रमाने) चकित होऊन सुखदुःखें भोगीत असतात.

**कथयामि विचारं तं त्वमेकाग्रेण शृण्विमम् ।**
**तेन च ज्ञानलब्धं त्वां साक्षात्कारश्च जायते ।।३।।**

(जीव सुखदुःखें का भोगतो) त्याविषयी माहिती आता (तुला) सांगतो, ते तू एकाग्र होऊन ऐक,ज्यामुळे तुला ज्ञानप्राप्ती होऊन साक्षात्कार होईल.

**अंतःकृन्निर्विकल्पं त्वध्यात्मादित्रिपुटीयुतम् ।**
**विष्णोस्तु ज्ञानशक्त्या च विराजितम् ।।४।।**

अंतःकरणामध्ये निर्विकल्पता असते, तेथे अध्यात्म इत्यादी (अध्यात्म, अधिभूत, अधिदैव) त्रिपुटी असते. ते (अंतःकरण) विष्णूच्या ज्ञानशक्तीने युक्त झाले असता सुखकारक व शोभिवंत होते.

**मनस्तु सर्वजीवानां कारणं सुखदुःखयोः ।**
**तत्राधिदैवसंयोगाघातं वृध्दिं च लाघवम् ।।**
**ते अध्यात्माधिभूते व्देऽब्धीय इवेंदुनैव हि ।।५।।**

मन हे सर्व जीवांच्या सुखदुःखाचे कारण आहे. तेथे अधिदैवाच्या संयोगामुळे मनातील विकार चंचल होतात.अध्यात्म व अधिभूत हे जणू दोन समुद्रच आहेत. चंद्रामुळे (समुद्रमध्यें भरती व ओहोटी येते तशीच या) दोन समुद्रांनापण येते.

**अध्यात्मबुध्दिसंयोगमधिभूतं च वेदितम् ।**
**विरंचिर्दैवतं तत्र राजसंज्ञितम् ।।६।।**

अध्यात्माला बुध्दीची जोड मिळाली असता ते अधिभूत होते. रजोगुणाने युक्त ब्रह्मदेव ही तेथील देवता आहे.

**चित्तमध्यात्मसंयुक्तमधिभूतविवर्धितम् ।**
**नारायणाधिदैवं च दृश्यस्मरणपूर्वकम् ।।७।।**

मन हे अध्यात्माने युक्त असलेले, अधिभूताने वाढविलेले आहे. ते नारायण या अधिदैवतामुळे दृश्याचे (जगाचे) स्मरण करते.

**अहंताध्यात्मयुक्तेयं चाधिभूतविवर्धिता ।**
**गौरीपत्याधिदैवा च साहंकर्त्रीतिभाषिणी ।।८।।**

अध्यात्माने युक्त असलेली, अधिभूताने वाढवलेली, शंकर हे अधिदैवत असलेली अहंता 'मी करणारी आहे', असे म्हणत असते

**श्रोतव्यं श्रोत्रमध्यात्मसान्निध्यादाधिभौतिकम् ।**
**दिगाधिदैवमावृत्य शेषं यत्सावकाशकम् ।।९।।**

अध्यात्माच्या सहवासामुळे, दिशा हे अधिदैवत असलेले आधिभौतिक कर्णेंद्रिय हे सर्व पोकळी (ज्याचा अर्थभेद होत नाही असे) ऐकविते.

**त्वक् चैवाध्यात्मसंयुक्ता ह्यधिभूतेन संगता ।**
**स्पर्शेच्छा जायते तत्र त्वधिदैवेन वायुना ।।१०।।**

त्वचा ही अध्यात्माने व अधिभूताने युक्तच असते. वायू या अधिदैवतामुळे तिला स्पर्श करण्याची इच्छा होते.

**चक्षुरध्यात्मसंयुक्तं दृष्टमाधिभौतिकम् ।**
**सूर्याधिदैवयुक्तं च दाहकत्वं स्वभावजम् ।।११।।**

चक्षुरिंद्रिय अध्यात्माने युक्त असते. पाहण्याची इच्छा ही आधिभौतिक आहे. सूर्य या अधिदैवाशी ते संबद्ध आहे. दाहकत्व हा त्याचा स्वभाव आहे.

**रसनाध्यात्मयोगोऽयमधिभूतरसस्त्वयम् ।**
**अधिदैवजलाधिशो जलाश्रितप्रवर्तकः ।।१२।।**

चव ओळखणे हा जिभेचा अध्यात्मयोग होय. रस चाखण्याची इच्छा हा अधिभूतयोग आहे. तिचे वरूण हे अधिदैवत असून तो जलावर आधारित असलेल्या प्रवृत्ती निर्माण करतो.

**घ्राणाध्यात्मयुतंचैव गंधत्वं चाधिभौतिकम् ।**
**अश्विनावाधिदैवं च गंधरूपेण वर्धनम् ।।१३।।**

घ्राणेंद्रिय हे अध्यात्माने युक्त आहे. सुवास घेण्याची इच्छा हे आधिभौतिक आहे. घ्राणेंद्रियाचे अश्विनीकुमार हे अधिदैवत आहे. त्यमुळे त्याची गंध घेण्याची प्रवृत्ती वाढते.

**वागध्यात्मयुतं चैव वक्तव्यमाधिभौतिकम् ।**
**अग्न्याधिदैवयुक्तं च प्राधान्यं व्योमसत्त्वजम् ।।१४।।**

वाणीमध्ये स्वाभाविकपणे अध्यात्म असते. बोलण्याची इच्छा हे अधिभूत आहे. ती अग्नी

ह्या अधिदैवताने युक्त असून तिच्यात आकाश व सत्त्वगुणांचे प्राधान्य आहे.

**हस्ताध्यात्मयुतं चैव क्रियात्वमाधिभौतिकम् ।**
**इंद्राधिदैवयुक्तं च प्रभुत्वं वायुसत्त्वजम् ।।१५।।**

हातांची स्वाभाविक हालचाल हे अध्यात्म आहे, इच्छेने ती करणे हे अधिभूत आहे. (हाताचे) इंद्र हे अधिदैवत आहे, त्यामुळे त्यांच्यात वायू व सत्तगुणांचे प्राधाचे आहे.

**पादाध्यात्मयुतं चैव गंतव्यमाधिभौतिकम् ।**
**उपेंद्राधिदैवयुक्तं तु तेजः क्रमणसत्त्वजम् ।।१६।।**

पायांची सहज हालचाल हे अध्यात्म आहे, तर इच्छायूक्त हालचाल ही आधिभौतिक आहे. त्यांची उपेंद्र ही अधिदेवता असल्याने पायांमध्ये तेज व सत्त्वगुण यांचे प्राधान्य आहे.

**उपस्थाध्यात्मयुक्तं तु मन्मथेनाधिभौतिकम् ।**
**प्रजापत्याधिदैवं च जलस्वभावसत्त्वजम् ।।१७।।**

लिंग हे स्वभाविक अध्यात्माने युक्त असून कामेच्छा ही आधिभौतिक आहे. प्रजापती ही लिंगाची अधिदेवता असून जल व सत्त्वगुणाला त्यामध्ये प्राधान्य आहे.

**पाय्वध्यात्मयुतं चैव विसृष्टत्वाधिभौतिकम् ।**
**निऋतेराधिदैवं च मेदिनीभूतसंभवम् ।।१८।।**

गुद अध्यात्माने युक्त असून विसर्गशक्ती ही आधिभौतिक आहे. निऋति ही येथील अधिदेवता असून ती पृथ्वी भूताशी संबद्ध आहे.

**एवं हिरण्यगर्भं च लिंगदेहसमन्वितम् ।**
**विराजश्चास्य ब्रह्मांडे पिंडानां पृथगुद्भवम् ।।१९।।**

अशा प्रकारे हे हिरण्यगर्भाचे चरित्र आहे. विराट अशा ब्रह्माण्डापासून वेगवेगळ्या पिंडांची निर्मिती होते, त्यांचा तो लिंगदेह धारण करतो.

**विष्णोरंशाभिमानं च प्रविविक्तं तु तैजसम् ।**
**प्राप्तस्वप्नावभासं च ग्रीवामंडलमाश्रितम् ।।२०।।**

(जीवाच्या लिंगदेहामध्ये प्रविविक्त भोग व तैजस अभिमानी असलेला विष्णूचा अंश, कंठाचा आश्रय करून असतो, तो सुखदुःखात्मक अशा स्वप्नांचे भान करून देतो.

**अन्यथाज्ञानमित्युक्तमात्मरूपस्य विस्मृतिः ।**
**सुखदुःखयुतोऽहं तदविद्यामयसंभवम् ।।२१।।**

आत्मरूपाचे विस्मरण ह्याला अज्ञान (अन्यथाज्ञान) म्हटले आहे. 'मी सुखदुःखाने युक्त आहे' (असे समजणे) हे त्या अज्ञानाचे स्वरूप असून ते अविद्येपासून निर्माण होते.

**विधिहिनो दुराचारः साधिभूतबलाश्रयः ।**
**रजस्तमोयुतोऽयं तु पूर्वजन्मनि दुष्कृतात् ।।२२।।**

दुराचारी, कर्तव्यहीन माणूस आपल्या अधिभूतांच्या सामर्थ्यावर अवलंबून असतो. पूर्वजन्मींच्या दुष्कर्मांमुळे तो रज व तमोगुणांनी युक्त असतो.

**आजन्मपापबीजानि वर्धंत इह जन्मनि ।**
**निरयं प्राप्नुवंतस्ते पतंति जन्मजन्मसु ।।२३।।**

पूर्वजन्मींची त्यांची पापबीजें ह्या जन्मामध्ये वाढतात. (त्यामुळे) अनेक जन्मापर्यंत ते (दुराचारी) अधोगतीला जातात व नरकामध्यें पडतात.

**पूर्वपुण्यस्य संघात्तु सत्त्वे शीघ्रं प्रवर्तनम् ।**
**अनेन ज्ञानसंयुक्तो मोक्षोपायप्रयोजकः ।।२४।।**

पूर्वपुण्याच्या संग्रहामुळे सत्त्वगुणांमध्ये लवकर प्रवृत्ती होते. त्यामुळे ज्ञान प्राप्त झालेला मनुष्य मोक्ष मिळविण्याचा अधिकारी होतो.

**विस्मरणं च वृत्तीनां प्रपंचो भ्रममूलकः ।**
**न निद्राति न जागर्ति चिंतयति सुखं निजम् ।।२५।।**

वृत्तींच्या विस्मरणामुळे भ्रममूलक प्रपंच तयार झाला आहे, हे तो (सत्त्वगुणी) जाणतो. निद्रा व जागृति यांच्या पलीकडील आत्मसुखाचा तो विचार करतो.

**योगभ्रष्टो मुमुक्षुस्तु जातः पुण्येन भाग्यवान् ।**
**रजस्तमःप्रयुक्तस्तु जातः पापेन दुर्भगः ।।२६।।**

योगभ्रष्ट असा एखादाच भाग्याने मुमुक्षु म्हणून जन्माला येतो. रजोगुणामुळे आणि तमोगुणामुळे जन्माला आलेला पापी दुर्भागी होतो.

**कलत्रपुत्रवित्तानां मायामोहेन ग्रासितः ।**
**शाश्वतं मन्यते दृश्यमंतवंतमशाश्वतम् ।।२७।।**

तो (रजोगुणी) स्त्री, पुत्रांच्या खोट्या मायेने ग्रस्त होऊन अनित्य अशा दृश्य वस्तूंना नित्य मानतो.

**प्रमदाध्यासनिष्ठोऽयं तद्रूपस्य विचिंतकः ।**
**तच्छृंगारद्रष्टा पिशाचमुखवत्तु चंचलः ।।२८।।**

स्त्रियांच्या ध्यासामध्ये मग्न असलेला तो, त्यांच्याच रूपाचे चिंतन करतो, त्यांचे श्रृंगार पाहतो (आणि तो) पिशाचाच्या तोंडाप्रमाणे चंचल असतो.

**सुंदरीं युवतीं गौरां सर्वशृंगारसंयुताम् ।**
**योषितं दिव्यवस्त्रां च कामयते रजोगुणात् ।।२९।।**

तो रजोगुणामुळे तरुण, सुंदर, गो-या, सर्व शृंगारांनी युक्त, उत्तम वस्त्रे धारण केलेल्या युवतीची अपेक्षा करतो.

**रसाहारातिलुब्धोऽयं भोगमात्रेण संयुतः ।**
**गर्भवासाधिकारी च रजोगुणस्वभावतः ।।३०।।**

केवळ भोगामध्ये मग्न असलेला तो स्वादिष्ट आहाराविषयी आसक्त असतो. त्याचा स्वभाव रजोगुणी असल्यामुळे त्याला पुन्हः पुन्हा गर्भवास भोगावा लागतो.

**महद्दुराग्रही चैव पुण्यमार्गे पराङ्मुखः ।**
**पापकर्मणि युक्तोऽयं तमोगुणस्वभावतः ।।३१।।**

(दुसरा एखादा) हा तमोगुणामुळे पापकर्मामध्ये युक्त असून पुण्यमार्गाहून पराङ्मुख असा अतिशय दुराग्रही असतो.

**संततं क्रोधयुक्तोऽयं विक्षेपकः सुकर्मणि ।**
**निद्रालस्यविसंमूढोंऽतःशून्यो मोहसंयुतः ।।३२।।**

तो (तमोगुणी) नेहमी रागीट असून चांगल्या कामात विघ्ने आणतो. तो अतिशय झोपाळू, आळशी. अंतःकरणशून्य व मोहमग्न असतो.

**निंदकश्च विषादी च शोकाकुलितमानसः ।**
**कामी स बहुमानी च निमग्नः स्वस्तुतौ सदा ।।३३।।**

तो निंदा करणारा, नेहमीच विषण्ण असलेला, शोकमग्न, कामुक, स्वतःला फार मोठा समजणारा व आत्मस्तुतीतच सदा मग्न असणारा असतो.

**मया तु सदृशो नास्ति भूतेषु सर्वतो भुवि ।**
**इतियमज्ञता जंतोर्मोहता च मदांधता ।।३४।।**

पृथ्वीवर माझ्यासारखा इतर कोणीही नाही, असे मानणे हा माणसाचा मूर्खपणा, मोह आणि मदांधताच आहे.

**एवं च त्वंपदं सर्वं निर्बंधस्यानुकारणम् ।**
**लुप्तज्ञानमधैर्यं च तथा भ्रांतिमूलकम् ।।३५।।**

अशा प्रकारे त्वंपद हे जीवाला, सर्व बंधनात ठेवणारे, ज्ञान व धैर्य नष्ट झाल्याने भ्रांतिमूलक असलेले आहे.

**आत्महितं न जानाति परमार्थे पराङ्‌मुखः ।**
**न करोति मनःस्थैर्यं सद्‌भावं नाचरेत्कदा ।।३६।।**

परमार्थापासून पराङ्‌मुख असलेल्या माणसाला स्वतःचे हित समजत नाही. जो आपले मन स्थिर करत नाही, तो सद्‌भावाचे केव्हाही आचरणपण करू शकत नाही.

**योगक्षेमरता नित्यं चिंताक्रांता हि सर्वदा ।**
**असंतुष्टा विहर्षस्तूदासीना ज्ञानमार्गेण ।।३७।।**

स्वतःच्या योगक्षेमाचीच चिंता करणारे लोक नेहमीच चिंताक्रांत असतात. ज्ञानमार्गापासून दूर असणारे असे ते नेहमी दुःखी, उदासीन व असंतुष्ट असतात.

**ज्ञानं च कथमेतेषां तरिष्यति भवात्कथम् ।**
**यांति ते भवपारं च साधुसंगाच्च सेवनात् ।।३८।।**

अशा लोकांचा संसारापासून उध्दार केवळ ज्ञान कसें करू शकेल? (ते केवळ) संतांचा सहवास व त्यांची सेवा केल्यामुळे संसार तरून जाऊ शकतील.

**।। इति श्रीसिध्दान्तसंहितायां सोहिराविरचितायां त्रिविधतापकथनं नाम तृतीयोऽध्यायः संपूर्णः ।।**

# अध्याय चवथा

## आर्तजिज्ञास्वर्थार्थीमुमुक्षुलक्षणकथन

**केवलं मूढजंतूनां स्वेषां च मोक्षसाधनम् ।**
**सद्‌गुरोः सेवनं सद्यश्चानन्यभावतन्मयम् ।।१।।**

सद्‌गुरुची सेवा मूर्खांना आणि इतरांनाही मोक्षदायक आहे. ती तत्काळ अनन्यभाव आणि तन्मयता प्राप्त करून देते.

**जडत्वमन्नपाने चैतत्सामान्यं नृभिः समम्‌ ।**
**वासनाभिश्च मुक्तोऽसावनंत ज्ञानवानयम्‌ ।।२।।**

(साधूचे शरीर हे इतर माणसांच्या शरीराप्रमाणेच जड असते. तसेच त्यांचे खाणेपिणे इतर माणसांच्या आहाराप्रमाणेच असते, परंतु साधू वासनापासून मुक्त असतो व तो अनंत ज्ञानाने युक्त असतो.

**चंदनस्य तु रूपं चैतत्सामान्यं द्रुमैः समम्‌ ।**
**अन्यत्रागंधभावोऽत्र समीचीनः स विद्यते ।।३।।**

चंदनाच्या वृक्षाचे रूप इतर सामान्य वृक्षांप्रमाणेच असते. परंतु इतर वृक्षांमध्ये सुगंध असत नाही; चंदनाला मात्र अतिशय सुगंध येतो.

**लोहं नयति हेमत्वं परिसः प्रस्तरोऽपि च ।**
**सद्‌गुरुः सेवकं तद्वज्ज्ञानिनं कुरुते सदा ।।४।।**

परिस हा स्वतः दगड असूनसुध्दा लोखंडाचे सोने करतो. त्याप्रमाणे सद्‌गुरु सेवकाला (शिष्याला) ज्ञानी बनवितो.

**जातिरूपं परित्यज्यात्मज्ञं सद्‌गुरुमाचरेत्‌ ।**
**मनोधर्मं परीक्षेत स्वरूपं न विचारयेत्‌ ।।५।।**

सद्‌गुरुचा आकार किंवा रूप पाहू नये, मात्र आत्मज्ञान असलेल्या सद्‌गुरुचाच आश्रय घ्यावा, त्याच्यामनाची परीक्षा करावी, त्याच्या स्वरूपाचाच विचार करू नये.

**स्फटिकानां च वज्रं तु नृणां साधुर्नरर्षभः ।**
**आत्मन्येवात्मना तुष्टस्त्यक्तसंगश्च सत्परः ।।६।।**

स्फटिकाप्रमाणे जसा हिरा श्रेष्ठ आहे, तसाच स्वतःच आपल्यामध्ये संतुष्ट असणारा, सर्व संगांचा त्याग केलेला ब्रह्मनिष्ठ साधू माणसांमध्ये श्रेष्ठ आहे.

**श्रद्धया शरणं याति महात्मानं च तं गुरुम्‌ ।**
**तत्कृपया विनिर्मुक्तो विश्वसिति च तद्वचः ।।७।।**

(सद्‌गुणी शिष्य) त्या परमश्रेष्ठ गुरुला श्रध्दापूर्वक शरण जातो, त्याच्या वाणीवर विश्वास ठेवतो आणि त्याच्या कृपेने मुक्त होतो.

**आर्तस्त्वयं च जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानसंयुतः ।**
**ज्ञानहीनं तु सर्वं च निष्फलं साधनं ननु ।।८।।**

आर्त, जिज्ञासु, अर्थार्थी आणि ज्ञानी असे (साधकाचे चार) प्रकार आहेत. (असे असले तरी) ज्ञानाशिवाय केलेले कोणतेही साधन निष्फळच होते.

**आर्तस्तु भक्तिवांश्चैव जिज्ञासुर्ज्ञाननिर्मलः ।**
**अर्थार्थी योगवांश्चैव ज्ञानी स्वात्मप्रबोधकः ।।९।।**

आर्त भक्तीने युक्त असतो, जिज्ञासु ज्ञानाने निर्मल असतो, अर्थार्थी योगवान असतो तर ज्ञानी आत्मबोधाने युक्त असतो.

**यस्य प्रीतिः समुत्पन्ना नाम्नि तु परमात्मनः ।**
**सोऽपि न मुंचति ज्ञानं विना मायाविबंधनात् ।।१०।।**

ज्याला परमेश्वराच्या नामामध्ये प्रेम निर्माण झाले आहे, असा भक्तसुध्दा मायेच्या पाशांतून मुक्त झाल्याशिवाय ज्ञान प्राप्त करू शकत नाही.

**असता सच्च युक्तं तु नीरक्षीरवदत्र हि ।**
**तत्र सत्क्षीरं सेव्यं च त्याज्यं नीरं मरालवत् ।।११।।**

पाण्यामध्ये दूध मिसळावे त्याप्रमाणेच असताचे सताशी मिश्रण झालेले असते. म्हणून आपण हंसाप्रमाणे सत्‌रूपी दुधाचे सेवन करावे व असत्‌रूपी पाण्याचा त्याग करावा.

**दृश्यमूलमदृश्यं चालक्ष्यं च सर्वकर्षकम् ।**
**निरालंबपदमं शून्यमेकाग्रेणैव गम्यते ।।१२।।**

दृश्याला कारण असलेले जे अलक्ष्य (परब्रह्म) तिकडेच सर्व लक्ष ठेवावे. कोणताही आश्रय नसलेले (निरालंबपद शून्यपरब्रह्म) हे केवळ एकाग्रतेनेच जाणता येते.

**विकारोपशमः कार्यः सर्वद्रष्टुश्च चिंतनम् ।**
**निमिषोन्मिषसंबध्दो ध्यायेच्च सर्वसाक्षिणम् ।।१३।।**

विकारांचे शमन करून, सर्व पाहणा-या (साक्षी) परमेश्वराचे चिंतन करावे. सर्वकाळ असणा-या अशा (नित्य) सर्वसाक्षी (परमात्म्याचे) ध्यान करावे.

**प्राणापानसमायुक्तं ब्रह्मरंध्रं च कारयेत् ।**
**त्रिवेणीसंगमस्तत्र स्नानं तद्योगधारणम् ।।१४।।**

ब्रह्मरंध्राच्या ठिकाणी प्राण व अपान यांची समता करावी. तेथे (इडा, पिंगला, सुषुम्ना यांचे) त्रिवेणी संगमावर स्नान करणे यालाच योगधारणा म्हणतात.

**पिंगलेडा सुषुम्ना च तीर्थं तासां तु संगमः ।**
**तत्र स्नानं पवित्रं तु विशुध्दं योगसाधनम् ।।१५।।**

इडा, पिंगला व सुषुम्ना यांचा संगम हेच तिर्थ आहे. त्यामध्ये स्नान हे पवित्र व शुद्ध असे योगसाधन आहे.

**त्रिकुटश्रीहाटगोल्हाटौटपीठालिगुंफास्तु ।**
**मार्गेणानेन खे चेतः समाधौ योगधारणे ।।१६।।**

त्रिकुट, श्रीहाट, गोल्हाट, औटपीठ व भ्रमरगुंफा हा योगमार्ग आहे. या मार्गाने जाऊन आकाशामध्ये (सहस्त्रारमध्ये) समाधिची साधना करावी.

**व्यतिरेकान्वयाभ्यां च दृश्यं च ब्रह्मरूपकम् ।**
**कर्णनयनयोरैक्यमज्ञेयं सर्वगतं हि तत् ।।१७।।**

अन्वय व व्यतिरेक यांच्या साहाय्याने सर्व दृश्य ब्रह्मरूप आहे याचा अनुभव येतो, जेव्हा कान व डोळे यांचे ऐक्य समजत नाही. (म्हणजे ऐकणे व पाहणे या क्रिया एक होऊन जातात.)

**वासनाक्लिष्टहेतुत्वाद्व्यतिरेकावृता ननु ।**
**बुध्दिः संकल्पयुक्ता च विक्षेपान्वयसंयुता ।।१८।।**

वासनेने दुर्बोध झालेली बुध्दी व्यतिरेकाला जणू आवरण घालते आणि अन्वयाला संकल्पाच्या विक्षेपानी (भ्रमानी) युक्त करते.

**मृत्युलोके यदुत्पन्नं सर्वं तन्नाशवत्तथा ।**
**शाश्वतं मन्यते बुध्दिस्तदप्रज्ञानलक्षणम् ।।१९।।**

मृत्युलोकामध्ये जे जे उत्पन्न होते, ते सर्व नाशवंत आहे आणि बुध्दी त्याला शाश्वत मानते, हे खरोखर अज्ञानाचे लक्षण आहे हे जाण.

**शब्दज्ञानयुतोऽयं च प्रशस्यो बहुभिर्जनैः ।**
**निश्चयो नास्ति तत्त्वे तु वृथा तस्य प्रवर्तनम् ।।२०।।**

शब्दज्ञान (पांडित्य) असणा-या माणसाची लोक प्रशंसा करतात; परंतु त्याचा तत्त्वाविषयी निश्चय असत नाही. अशाचे दर्शनही व्यर्थ आहे.

**देहात्मबुध्दिरेवास्य पाखंडवादवर्तकः ।**
**नास्तिक्यो विषयानंदी सद्दर्शनपराङ्मुखः ।।२१।।**

पाखंडवादाचे प्रवर्तन करणारे लोक, नास्तिक, विषयांमध्येच आनंद मानणारे, सज्जनांचे दर्शन न घेणारे आणि देहालाच आत्मा समजणारे असे असतात.

**साधूनां दर्शनं पुण्यं वैराग्यलाभदं शुभम् ।**
**तेषां च भाषणं शुद्धमानंददायकं खलु ।।२२।।**

साधूंचे दर्शन पुण्यकारक, वैराग्याचा लाभ करून देणारे व शुभ असते; त्यांचे बोलणे पवित्र व आनंद देणारे असते.

**सर्वलिंगाद्विभिन्नं च संतचिन्हं न लुप्यते ।**
**तेजोमयं प्रदीप्तं च समानसाधितं मनः ।।२३।।**

संतांचे लक्षण इतर लोकांपेक्षा वेगळे असून ते लपून राहू शकत नाही. त्यांचा चेहरा तेजस्वी व प्रकाशमान असतो व त्यांचे मन समतोल असते.

**सावधानः सदानंदे नित्यतृप्तो निराश्रयः ।**
**व्याप्यव्यापकशून्यश्च साधुश्चात्र तु दुर्लभः ।।२४।।**

नेहमीच सावधान व आनंदामध्ये मग्न असणारा, नित्यतृप्त, निराकारात वास करणारा, व्याप्य-व्यापकभाव नसलेला असा साधू (ब्रह्मज्ञ) दुर्मिळ असतो.

**हंसो यथांबुमध्याच्च क्षीरं पिबति नित्यशः ।**
**तथा साधुरसन्मध्याच्च सद्गृह्याति सर्वदा ।।२५।।**

हंस पाणी आणि दुधामधून जसे रोज दुधच पितो तसा साधू नेहमी (चांगले आणि वाईटामधून) चांगलेच घेत असतो.

**पटे तंतुर्घटे मृत्तद्वद्ब्रह्मत्वं च दर्शने ।**
**एवं ज्ञात्वा तथा सोऽहं ब्रह्मास्मीति सुनिश्चितः ।।२६।।**

वस्त्रांमध्ये जसा तंतू किंवा घटांमध्ये जशी माती (ही मूळ आहेत), हे जाणून (विश्वाचे मूळ ते) 'मी ब्रह्म आहे' असे निश्चित ज्ञान साधूला झालेले असते.

**दूरस्थात्तपनादूर्व्यां मृगनीरसमुद्भवः ।**
**उत्पत्तिर्जगतस्तद्वन्नित्याच्च शाश्वतान्नु ।।२७।।**

दूर असलेल्या सूर्यापासून ज्याप्रमाणे मृगजळाची उत्पत्ती होते, त्याप्रमाणेच नित्य व शाश्वत अशा ब्रह्मापासून जगाची उत्पत्ती होत असते.

**तरंगः पवनोद्भूतः स विरामे विनश्यति ।**
**वायोस्तु तत्समं विश्वमुत्पन्नं च निरंजनात् ।।२८।।**

पाण्यावरील तरंग वा-यामुळे उत्पन्न झालेला असतो, वारा गेल्यावर तो नष्ट होतो. त्याचप्रमाणे हे जग निरंजन ब्रह्मापासून निर्माण झाले आहे.

**स्फुरणं त्वनिलस्यैव जन्मस्थैर्यं च मृत्युता ।**
**एवं गतागतानां च प्राणिनां सहजा स्थितिः ।।२९।**

जन्म, स्थैर्य व मृत्यू हे सारे म्हणूनच (वरील) वा-याचे स्फुरणाप्रमाणे आहेत. (जन्माला) येणा-या व जाणा-या (मृत होणा-या) प्राण्याचा स्वभावही तसाच भासमान आहे.

**पत्रपुष्पफलानां च वृध्दिर्भवति माधवे ।**
**तद्वन्नित्यस्य सत्तायां जायते च चराचरम् ।।३०।।**

वसंत ऋतूच्या सत्तेने पाने, फुले, फळे यांची वाढ होते. त्याचप्रमाणे नित्यवस्तूच्या सामर्थ्याने चराचर निर्माण होत असते.

**चुंबकस्य तु सान्निध्याद्यथा लोहं सचेतनम् ।**
**तथा नित्यादनित्यं च रव्युदयाद्यथोत्पलम् ।।३१।।**

चुंबकाच्या सांनिध्यामुळे लोखंड जसे सचेत होते, किंवा सूर्योदयामुळे जसे कमल उमलते, तसेच अनित्य असलेले जग नित्य ब्रह्मापासून निर्माण होते.

**चंद्रोदयात्समुद्रश्च कुमुदानि तथैव च ।**
**तथैव ब्रह्मसत्ता च दूरस्था च सुखंभवा ।।३२।।**

चंद्राच्या उदयामुळे समुद्राला भरती येते व कमळेपण फुलतात. त्याप्रमाणे ब्रह्मसत्ता दूर (दिसत) असूनसुध्दा सर्वांना सुख देते.

**हुताशने यथा धूम्रो नखानि पाणयोर्यथा ।**
**जगदभ्रं चिदाकाशो तत्र दुःखसुखे न च ।।३३।।**

अग्नीमुळे जसा धूर होतो किंवा हाताच्या बोटावर जशी नखे वाढतात तसे चैतन्यरूपी आकाशामध्ये जगरूपी ढग येत असतात, त्यांना सुख किंवा दुःख असत नाही.

**रज्जौ सर्पस्य भासश्च निद्रायां स्वप्नविभ्रमः ।**
**ब्रह्मणि च जगद्भासश्चासत्यो ज्ञानविभ्रमः ।।३४।।**

दोरीवर सर्पाचा भ्रम होतो, झोपेमध्ये स्वप्नाचा भास होतो, तसाच विपरीतज्ञानामुळे ब्रह्मावर जगाचा भ्रम होतो.

**पश्यति चिन्मयं चैव ज्ञप्तिमात्रं प्रकाशकम् ।**
**तदा तु विलयं याति मायामोहः क्षणार्धतः ।।३५।।**

(मनुष्य) ज्या वेळी चैतन्यमय प्रकाशक जाणिवेला पाहतो, म्हणजे जाणिवेचे त्याला ज्ञान होते, त्या वेळी क्षणार्धातच त्याचा मायामोह लयाला जातो.

**आदावंते च यद्ब्रह्म नित्यतृप्तं निरामयम् ।**
**नेति नेति च वेदोक्तं सोऽहं परममव्ययम् ।।३६।।**

जे विश्वाच्या आधिही आहे आणि अंतीही आहे, जे नेहमीच तृप्त आहे व निर्विकार आहे, ज्याचे वर्णन वेद 'नेति नेति' असे करतात, ते श्रेष्ठ अविनाशी ब्रह्म 'मी' आहे (हे तो जाणतो).

**सदैव शाश्वतं स्वस्थं निरालंबं निरंजनम् ।**
**अव्याकृतं निराकर्ण्यं ध्याने च स्तवने शुभम् ।।३७।।**

ब्रह्म हे नेहमीच शाश्वत असणारे, आपल्यामध्येच स्थित असणारे, आश्रय नसलेले, निरंजन, अमूर्त, निराकरण करता न येणारे, ध्यानाला व स्तुतीला शुभ असे आहे.

**सर्वत्र समचित्तश्च सद्भावः स सनातनः ।**
**नारायणश्च सर्वेषां वत्सलः प्रियदर्शनः ।।३८।।**

सर्वांनाच समानतेने पाहणारा, सर्वांमध्येच राहणारा, नित्य असा नारायण (परमात्मा) दृष्टीला समाधान देणारा व सर्वांवर प्रेम करणारा आहे.

**।। इति श्रीसिध्दान्तसंहितायां सोहिराविरचितायां आर्तजिज्ञास्वर्थार्थीमुमुक्षुलक्षणकथनं नाम चतुर्थोऽध्यायः संपूर्णः ।।**

# अध्याय पांचवा

## शमदमाभ्यासयोग

**जंतुप्रकारभिन्नश्च प्रेमभावश्च जायते ।**
**पूर्वार्जितेन ते सर्वे रमंते स्वे तु कर्मणि ।।१।।**

प्रत्येक प्राण्याची आवडीची गोष्ट (प्रेमभाव) वेगवेगळी असते. पूर्वजन्मातील कर्मानुसार तो आपापल्या कर्मामध्ये उद्युक्त होत असतो.

**वर्षाकालसमुत्पन्नमेघशब्देन हर्षितः ।**
**नृत्यति तु मयूरश्च तस्याश्रु गर्भसंभवम् ।।२।।**

वर्षाऋतूच्या वेळी निर्माण झालेल्या ढगांचे आवाज ऐकून आनंदित झालेला मयूर नृत्य करतो. त्या वेळी गळलेल्या अश्रूंमधून त्याच्या गर्भाची निर्मिती होते.

**उरगस्य तु प्रीतिश्च नादे परिमले तथा ।**
**आभ्यां तु प्राप्तबंधो हि सुखं च मन्यते सदा ।।३।।**

साप नादावर व सुगंधावर लुब्ध होतो. त्याच्यामुळे तो बंधनात सांपडतो तरी त्यातच नेहमी सुख मानतो.

**कुरंगो नादलुब्धश्च निवासप्रियकाननः ।**
**अश्नाति वृक्षपर्णान्यन्यत्तस्यैव न तु प्रियम् ।।४।।**

अरण्यामध्ये राहण्याची आवड असलेले नादलुब्ध हरीण झाडाची पाने खाते, इतर वस्तू त्याला आवडतच नाही.

**दक्षिणामानलुब्धश्च ब्राह्मणो भोजनप्रियः ।**
**गृह्यात्यर्चनसत्कारं तैर्विना न च तुष्यति ।।५।।**

दक्षिणा व सन्मान यांचा लोभी असलेला भोजनप्रिय ब्राह्मण तेच (सन्मान, सत्कार इ.) स्वीकारीत असतो (आणि) ते मिळाल्याशिवाय तो संतुष्ट होत नाही.

**क्षत्रियो युद्धकामश्च विप्रसेवासु तत्परः ।**
**प्रजापालनदक्षश्च न चान्यत्तस्य रोचते ।।६।।**

युध्दाची इच्छा करणारा क्षत्रिय ब्राह्मणसेवेमध्ये तत्पर असतो. तसेच तो प्रजापालन करण्यामध्येही दक्ष असतो, इतर गोष्टी त्याला आवडत नाहीत.

**वैश्यानां परमं धर्म्यं वाणिज्यं वस्तुविक्रयम् ।**
**समृध्दौ धान्यसंग्राह्यं महर्घतायां च विक्रयः ।।७।।**

वैश्याचा व्यापार हाच श्रेष्ठ धर्म आहे (असे तो मानतो). सुकाळाच्या वेळी धान्यसाठा करणे व महागाई आल्यावर तो विकणे म्हणजेच (त्याचा) व्यापार आहे.

**सेवाप्रियश्च शूद्रस्तू कृषिकर्मणि तत्परः ।**
**करोति जीवनार्थं च निंद्योद्यमं च हर्षितः ।।८।।**

शूद्राला सेवेची आवड असते व तो कृषीकर्मांत तरबेज असतो. जीवनासाठी हलका उद्योगसुध्दा तो आनंदाने करतो.

**पुरुषं बलवंतं तु साभिलाषं च कामिनम् ।**
**दृष्टा तु स्वैरिणी नारी मोदते संगमोत्सुका ।।९।।**

अभिलाषा करणा-या सामर्थ्यवान कामी पुरुषाला पाहून संगमासाठी उत्सुक असलेल्या स्वैर स्त्रीला आनंद होतो.

**पशवः शष्पमिच्छंति मत्स्यास्तु जलसंयुताः ।**
**खेचराः पक्षिणश्चैव गुडासक्तास्तु मक्षिकाः ।।१०।।**

पशूंना गवताची आवड असते, माशांना पाण्याची आवड असते तर पक्ष्यांना आकाशांत उड्डाण करण्यात गोडी वाटते. तसेच माशीला गुळाची चटक असते.

**भ्रमरः प्रियकल्हारः स्तेनः परधनप्रियः ।**
**भक्तास्तु भगवत्प्रीता मुक्ताः समरसप्रियाः ।।११।।**

भुंग्याला कमळाची आवड असते, चोराला परद्रव्याची इच्छा असते, भक्तांचे भगवंतावर प्रेम असते, मुक्त हे ब्रह्मानंदामध्ये रंगून जात असतात.

**वैराग्यं च निरोधश्च त्यागश्च योगिनः प्रियः ।**
**निंद्यं तु पातकं चैव पापिनां बहुधा प्रियम् ।।१२।।**

वैराग्य, प्राणायाम व त्याग हे योग्यांना आवडत असतात तर पाप्यांना मात्र निंदनीय असे पातकच आवडत असते.

**दुःखार्तान्बांधवान्दृष्टा दायादानां परं सुखम् ।**
**सधनं रोगिणं दृष्टा कुवैद्यो हर्षसंयुतः ।।१३।।**

भाऊबंदांना आपला नातेवाईक दुःखमग्न झालेला पाहून आनंद होतो. श्रीमंत माणसाला रोग झालेला पाहून दुष्ट वैद्याला आनंद होत असतो.

**एवं जीवसमूहो मायावृत्तोऽज्ञानग्रासितः ।**
**क्वचिच्च भक्तिमांस्तस्मिन्सत्यज्ञानसुनिर्मलः ।।१४।।**

अशा प्रकारे सर्वच जीव मायेने वेढलेले व अज्ञानाने ग्रासलेले असतात. त्यामध्ये एखादाच ख-या ज्ञानाने युक्त व निर्मळ असतो.

**अज्ञानी नास्तिकश्चैव वृषभ इव जीवति ।**
**यस्य मुखे हरेर्नाम नास्ति तच्चर्मकुंडवात् ।।१५।।**

मूर्ख, नास्तिक हे बैलासारखेच जगतात. ज्या तोंडामध्ये हरिनाम नाही, तें तोंड (जणू) चामड्याचे भांडेच आहे.

**यावज्जीवः शरीरे तु तावच्चिंतय चेश्वरम् ।**
**यथोक्तं स्नानसंध्यादि कुरुष्व च तपश्वर ।।१६।।**

शरीरामध्ये जोपर्यंत जीव आहे, तोपर्यंत ईश्वराचे चिंतन कर. शास्त्रविधिनुसार स्नान, संध्या इत्यादी कर्मे कर आणि तपाचे आचरणपण कर.

**विष्णोर्नामसहस्त्रं च गीता भागवती तथा ।**
**अनयोर्भावं जानंश्च भवैव ध्याननिर्मलः ।।१७।।**

विष्णुसहस्त्रनाम व भगवद्गीता यांचा भाव जाणून घेऊन ध्यानाने शुद्धचित्त हो.

**शोधरोधयुतो बोधपरप्रसन्नतायुतः ।**
**परमात्मपरब्रह्मप्राप्तये भक्तिमानन्भव ।।१८।।**

(परमात्म्याचा) शोध व (इंद्रियांचा) निरोध साधून बोधपर ज्ञानाने प्रसन्नता मिळवून परमात्म परब्रह्माच्या प्राप्तीसाठी प्रयत्न कर.

**अभ्यासम्य प्रयत्नेन शमदमौ तु साधयेत् ।**
**मोक्षस्यसाधनं कुर्याद्दृश्यद्वैतगतभ्रमः ।।१९।।**

प्रयत्नपूर्वक शम व दम यांचा अभ्यास करून त्यांची सिध्दी साधावी व दृश्यातील द्वैताचा भ्रम नष्ट करून मोक्षाचे साधन करावे.

**शमः कोऽत्रः दमः कोऽत्रः तत्सर्वं सादरं शृणु ।**
**येन त्वं सफलं ज्ञानं प्राप्नोषि शुद्धमुत्तमम् ।।२०।।**

शम व दम या शब्दांचा अर्थ काय ते तू आदरपूर्वक ऐक. त्यामुळे तुला शुद्ध, उत्तम व फलानं युक्त असलेले ज्ञान मिळेल.

**प्राक्कर्मणोत्थितां वृत्तिं चांतःकरणसंयुताम् ।**
**मनोबुध्द्याद्यसंपृक्तां पूर्वस्थं च नयेच्छमम् ।।२१।।**

प्रारब्धकर्मांमुळे अंतःकरणात उठलेल्या वृत्तीना शांत करून (मन, बुध्दी यांच्यापासून विभक्त होऊन) पूर्वस्थानावर (आत्म्यावर) शमाने चित्ताची एकाग्रता करावी.

**सत्यविदः शमेनैव मुच्यंते सर्वकिल्बिषात् ।**
**हरति जन्ममृत्यु स तान्नयति परं पदम् ।।२२।।**

सत्य जाणणारे शमामुळेच सर्व पापापासून मुक्त होतात. शम त्यांना जन्म व मृत्यूपासून मुक्त करतो व तोच त्यांना परमपदाकडे नेतो.

**प्रकाशो ज्ञानदीपस्य विश्रांतश्चात्मरूपके ।**
**नश्वरतमसो नाशो जीवात्मनश्च सार्थकम् ।।२३।।**

ज्ञानदीपाच्या प्रकाशाने आत्मस्वरूपाचे ज्ञान होते. त्यामुळे नाशिवंत अंधाराचा नाश होतो व जीवात्म्याचे सार्थक होते.

**सर्वोपाधिविनिर्मुक्तो छिनत्ति भवकारणम् ।**
**सर्वतेजोमयं ब्रह्म समत्वं प्रापयन्स तु ।।२४।।**

सर्व तेजाने युक्त ब्रह्मस्वरूप आणि ज्याला साम्यावस्था प्राप्त झालेली आहे, असा तो (जीवात्मा) सर्वउपाधिपासून मुक्ती पावून त्याचा पुनर्जन्म नाहीसा झालेला असतो.

**अनेन शमरूपेण राजयोगं तु साधयेत् ।**
**सविकल्पसमाधिं च व्यतिरेकान्वयात्तथा ।।२५।।**

अशा प्रकारे शमाने राजयोग प्राप्त करावा. त्याचप्रमाणे अन्वय व व्यतिरेकाने सविकल्प समाधि सिद्ध करून घ्यावी.

**येन तु दमरूपेण ब्रह्मरूपं च साध्यते ।**
**निर्विकल्पसमाधिश्च तत्सर्वं तु निरूप्यते ।।२६।।**

ज्या दमाच्या साहाय्याने ब्रह्मरूपाची प्राप्ती होते व निर्विकल्प समाधि प्राप्त होते, ते सर्व आता सांगतो.

**प्राक्पूर्वसंगनिर्मुक्तः कर्मप्रधानसूत्रजः ।**
**निर्धूतपापपुण्यश्च दमयोगं प्रयाति सः ।।२७।।**

जन्मापूर्वीच सर्वसंगातून मुक्त असलेला, केवळ कर्मशेषामुळे जन्माला आलेला, ज्याची सर्व पापपुण्ये धुऊन गेलेली आहेत (असा कोणी) दमयोगाकडे वळतो.

**संचितं क्रियमाणं तु प्रारब्धयोगसंयुतम् ।**
**दमयोगस्य साह्यार्थं नित्यं च यतते ननु ।।२८।।**

संचित, क्रियमाण व प्रारब्ध हे जणू दमयोगाच्या साहाय्यासाठी नेहमी प्रयत्न करीत असतात.

**अनृण्याग्राहकश्चैव यस्य नो कर्मसंग्रहः ।**
**अतस्तु शून्यसंसारः स प्राक्चैतन्यमार्जितः ।।२९।।**

ज्याने पूर्वजन्मी कुणाचे ऋण घेतलेले नाही किंवा (कुणाला) दिलेले असत नाही, अशा त्याला काहीच कर्म शिल्लक असत नाही. त्याला या जन्मी संसार उरतच नाही, पूर्वजन्मींच्या अभ्यासाने त्याच्या वाट्याला केवळ चैतन्यच आलेले असते.

**ततस्तु स्वयमेवात्रासंगः सज्ज्ञानसंयुतः ।**
**शरीरभोगमात्रेण लोकेऽस्मिंश्चरतीह वै ।।३०।।**

असा तो सर्व संग टाकून देऊन, ब्रह्मज्ञानाने युक्त असलेला, इहलोकामध्ये केवळ जणू शरीरभोग भोगण्यासाठीच फिरत असतो.

**निर्विकल्पस्थितिश्चेयं भूतभेदविनाशिका ।**
**भूतहिते न चासक्ता प्रस्तरेण समा च सा ।।३१।।**

ही (योग्याची) निर्विकल्पस्थिती (जरी) प्राण्यांमधिल भेद नाहीशी करणारी आहे (तरी) प्राण्यांचे हित करण्याकडेही तिचे लक्ष असत नाही (कारण) ती पाषाणासारखी स्थिती आहे.

**निरोधः सर्ववृत्तीनां हठयोगः प्रकीर्तितः ।**

**हठिनः सिध्दिदाः सर्वा इंद्रियाणां तु देवताः ।।३२।।**

सर्व वृत्तींच्या निरोधाला हठयोग म्हणतात. (वरील निर्विकल्पस्थिती प्राप्त झालेल्या) हठयोग्याला इंद्रियांच्या सर्व देवता सिध्दी देण्यास सज्ज असतात.

**सद्यः सुखसमाधानैर्जनैस्तु वृत्तितत्परैः ।**

**अकार्यं मन्यते तत्त्वमनुपयुक्तनिष्फलम् ।।३३।।**

सुख व समाधान लगेच मिळवू इच्छिणारे कामी लोक ब्रह्मज्ञान निरुपयोगी व निष्फळ मानतात.

**यस्त्वर्थरहितो दीनः सोऽमान्यो दुर्भगः खलु ।**

**स च शोकयुतश्चैवं मन्यते त्वज्ञमानवैः ।।३४।।**

ज्याच्या जवळ द्रव्य नाही, तो माणूस दुबळा, दुर्दैवी, दुःखी व दुर्भागी आहे, असे अज्ञ लोक मानतात.

**मया प्रागेव दत्तं नातोऽधुना प्राप्यते न हि ।**

**इति चिंतायुतस्यैव न वै स्वपरसाधने ।।३५।।**

मी पूर्वजन्मीं काही दान केले नाही म्हणून या जन्मी मी दरिद्री झालो, अशा चिंतेत मग्न असलेल्या माणसाचा प्रपंचही नीट चालत नाही व परमार्थही धड होत नाही.

**एवं सततदुःखार्तः साधुसंगविवर्जितः ।**

**तस्येदं न परं नास्ति नास्ति बुध्दिर्भवभ्रमात् ।।३६।।**

अशा प्रकारे सतत दुःखी असणा-या व सत्संगतीपासून दूर असलेल्या माणसाला प्रपंचाच्या भ्रमामुळे इहलोक नाही व परलोकही नाही आणि बुध्दीही नाही (अशी स्थिती येते.)

**लोकेषु गुप्तसिध्दाश्चाज्ञवत्तेषां च वर्तनम् ।**

**विषयाणां भ्रमाल्लोका न जानंति च सद्‍गुरुम् ।।३७।।**

जगामध्ये सिद्धलोक गुप्तपणे राहत असतात. त्यांचे बाह्यवर्तन अज्ञानी माणसांप्रमाणेच असते. लोक विषयांच्या भ्रमामुळे त्यांना ओळखू शकत नाहीत.

**द्रव्यमिच्छंति केचित्तु वंध्या संतानमिच्छति ।**

**एवं चानेककामास्तु लोकाः सिध्दं प्रयांति ते ।।३८।।**

काही (लोकांना) द्रव्याची इच्छा असते, निपुत्रिक स्त्रियांना संततीची इच्छा असते. अशा अनेक कामनांसाठी लोक सिध्दांकडे जात असतात.

**अनेकवासनासक्ता वर्तंतेऽत्र जनाः खलु ।**

**तेषां मध्ये च साधूनां निवासो गहनस्थले ।।३९।।**

या जगामधिल लोक अनेक वासनांमध्ये बुडून गेलेले असतात (म्हणून) साधुलोक त्यांच्यामध्ये असूनही अज्ञात स्थळी राहतात.

**दमसाधनसंयुक्तो वर्तते च निराश्रयः ।**

**क्षुधार्तश्चाश्नुते क्षुत्तु तृषार्तश्च पिबेत्तृषाम् ।।४०।।**

दमाचे साधन करणारा साधू निराधार असतो. भूक लागली असता तो भूकच खातो,

तहान लागली असता तहानच पिऊन टाकतो.

**एवं वायुनिरोधं कृत्वाष्टांगयोगसाधनम् ।**
**दमनं चेंद्रियाणां तु चरत्येव निराश्रयः ।।४१।।**

अशा प्रकारे अष्टांगयोगाचे साधन करणारा असा योगी वायुनिरोध करून व इंद्रियांचे दमन करून निराश्रयपणे फिरत असतो.

**कामक्रोधादयः सर्व उन्मत्ता मनसि स्थिराः ।**
**दमेन सह युध्यंते जानंति योगिनः खलु ।।४२।।**

मनामध्ये वास करून असलेले उन्मत्त असे काम, क्रोध इत्यादी शत्रू दमाबरोबर युद्ध करू लागतात, हे सर्व योगी लोकांनाच माहीत असते.

**तस्मिन्युध्दे न हंतव्याःकामादयो दमेन वै ।**
**शूरा न घ्नंति शत्रूंश्च तांस्तु कुर्वंति चांकितान् ।।४३।।**

त्या युध्दाने दमाने कामादी शत्रूंना मारू नये. शूर शत्रूंना मारीत नाहीत, ते त्यांना अंकित करतात.

**नानाभूतसमुत्पन्नं ब्रह्मांडं प्रेक्ष्य पिंडके ।**
**अहंकारं तु व्यष्टिश्च त्वचा सत्यमवाप्नुयात् ।।४४।।**

अनेक भूतांची उत्पत्ती करणा-या त्या ब्रह्मांडाला पाहण्याने व व्यष्टीमधिल अहंकाराचा त्याग केल्याने सत्यज्ञान होते.

**सर्वसाक्षीश्वरोऽयं च पिंडे तु जीवरूपकः ।**
**ईश्वरे चोपतिष्ठंश्चैवाधिष्ठितस्त्वहंकृतौ ।।४५।।**

हा आत्माच सर्वसाक्षी ईश्वर असून पिंडामध्ये मात्र तो अहंकाराच्या आश्रयाने जीवरूप धारण करतो, ईश्वरामध्ये निवास करणारा आत्मापण तोच आहे.

**शमयुक्तो भवेज्जीवो जीवन्मुक्तस्तु सर्वदा ।**
**ईश्वरस्यैक्यतां प्राप्तो नित्यानंदश्च जायते ।।४६।।**

तो (शमाचे साधन करणारा) शमयुक्त जीवन्मुक्त अवस्थेला पोहोचतो आणि ईश्वराशी एकत्व पावल्याने नेहमी आनंदरूप असा होतो.

**एवं तु दमयोगोऽयं व्यतिरेकेण सुस्थिरः ।**
**तथा च शमयोगोऽप्यन्वयेनैव समाश्रितः ।।४७।।**

अशा प्रकारे हा दमयोग व्यतिरेकाने सुस्थिर होतो, तसेच शमयोग हा (सुध्दा) अन्वयावर आधारित आहे.

**।। इति श्रीसिध्दान्तसंहितायां सोहिराविरचितायां शमदमाभ्यासयोगो नाम पंचमोऽध्यायः संपूर्णः ।।**

# अध्याय सहावा

## जिज्ञासुज्ञानप्राप्तियोग

**संन्यासित्वं मुमुक्षुत्वं भवेन्निःस्पृहता तथा ।**
**आचाराणां च शुद्धत्वमेतज्जिज्ञासुलक्षणम् ।।१।।**

नैराश्य असणे, मोक्षाची इच्छा, निःस्पृहता व शुद्ध आचार असणे ही जिज्ञासूची लक्षणे आहेत.

**यच्छरीरं तपस्तप्तं यन्मनो ध्यानतत्परम् ।**
**ईक्षत आत्मरूपं चाभेदं तु दृश्यवस्तुषु ।।२।।**

त्याचे (जिज्ञासूचे) शरीर तपश्चर्येने तप्त झालेले असते, त्याचे मन ध्यानामध्ये व्यग्र असते, तो सर्व दृश्यवस्तूमध्ये आत्मरूप व अभेद पाहत असतो.

**तस्य त्वपरिच्छिन्नं ब्रह्मचर्यं तत्त्वचिंतनम् ।**
**आदिदेवे महेशे तु तस्य श्रध्दा च जायते ।।३।।**

त्याच्या (जिज्ञासूच्या) तत्त्वचिंतनाला कोणतीही मर्यादा असत नाही, त्याचे ब्रह्मचर्य त्याच्या पूर्ण कह्यात असते. त्याची आदिदेव शंकरावर श्रध्दा असते.

**अजे तु शाश्वते नित्ये चिरस्थे पुरुषे परे ।**
**यस्यैकाग्र्यं समाधानं तद्वै जिज्ञासुलक्षणम् ।।४।।**

जन्मरहित, शाश्वत, नित्य, चिरंजीव अशा सर्वश्रेष्ठ पुरुषाच्या ठिकाणी एकाग्रता असणे व सदा समाधानी असणे ही जिज्ञासूची लक्षणे आहेत.

**शून्यध्यानयुतो नित्यं सहस्त्रदललक्षितः ।**
**स्थिराक्षो ब्रह्मरंध्रे तु निरिच्छो वायुरोधकः ।।५।।**

जिज्ञासु हा नेहमी शून्याकडे ध्यान लावणारा, सहस्त्रदलचक्रावर लक्ष केंद्रित करणारा, ब्रह्मरंध्रामध्ये दृष्टी ठेवणारा, वायूचा निरोध करणारा व कोणतीही इच्छा न बाळगणारा असा असतो.

**चांद्री सौरी सुषुम्ना च तासामैक्यपथात्खलु ।**
**त्रिकूटं संचरेन्नित्यं समाधौ सुखमश्नुते ।।६।।**

चंद्रनाडी, सूर्यनाडी व सुषुम्ना या तीन नाड्या जेथे एकत्र मिळतात तेथून त्रिकूटपर्वताकडे जावे. तेथे गेल्यावर नित्य समाधिसुखाचा लाभ होतो.

**तस्मिन्नित्ये निमग्नश्च संतुष्टः सततं सुखी ।**
**तुल्यग्रामवनश्चैव प्रहृष्टात्मा च हर्षितः ।।७।।**

त्या तशा त-हेने सुखात निमग्न असलेला साधक, अतिसय संतुष्ट, आनंदी, मनामध्ये संपूर्ण समाधानी, अरण्य व गाव दोन्ही समान मानणारा असा असतो.

**सुंदरीषु कुरूपासु यस्य भावः समश्च वै ।**
**शुभाशुभसमो यश्च सुखदुःखसमः खलु ।।८।।**

(तो जिज्ञासु) सुंदर स्त्रीकडे किंवा कुरूप स्त्रीकडे एकाच बुध्दीने पाहत असतो. त्याला सुख व दुःख, शुभ किंवा अशुभ दोन्ही समानच असतात.

**छलखेलसमो यश्च व्योमभूमिसमः खलु ।**
**जलवायुसमो भूत्वा भूमौ चैतन्यमीक्षते ।।९।।**

तो सर्व जगाचा विकास तटस्थतेने पाहतो. त्याला आकाश, पृथ्वी, पाणी, वारा यांच्यामध्ये एकत्व दिसते. पृथ्वीमध्येही त्याला चैतन्य दिसते.

**तेजोबीजादिसर्वेषु मूलमेकं च पश्यति ।**
**अतोऽशोच्यश्च भूतेऽसावद्वेष्यस्तुल्यभावनः ।।१०।।**

तो सर्वांचे मूळ हे एकच तेज व बीज आहे, असे पाहतो. म्हणून त्याला सर्वभूते समान वाटतात; तो कोणाचाही द्वेष किंवा शोक करीत नाही.

**प्रपद्यते परं धामं पवित्रं मंगलं परम् ।**
**अव्यक्तं परमं गुह्यं सद्‌गुरोः कृपया खलु ।।११।।**

तो अतिशय मंगल, पवित्र, परमगुप्त, अव्यक्त अशा त्या श्रेष्ठ स्थानाला सद्‌गुरुच्या कृपेने पोहोचतो.

**निष्कामकर्मजं पुण्यं पूर्वजन्मार्जितं च तत् ।**
**श्रद्धयान्वितमंतश्चात्र वै सद्‌बुध्दिदं परम् ।।१२।।**

पूर्वजन्मी केलेल्या निष्काम कर्मांमुळे प्राप्त झालेल्या पुण्याने त्याला इहलोकी उत्तम बुध्दी व श्रध्दा प्राप्त होते.

**स इच्छत्यात्मतत्त्वं चैवाभ्यासादात्मशोधनम् ।**
**अर्थार्थी दर्शनं ज्ञानं प्राप्नोति परमं पदम् ।।१३।।**

आत्मतत्त्व प्राप्त करणाची इच्छा असल्याने तो योगाभ्यासपूर्वक चित्तशुध्दी करतो आणि त्याला ज्ञानप्राप्ती होऊन परमात्म्याचे (अर्थार्थाचे) दर्शन होते, त्यामुळे तो श्रेष्ठ स्थान मिळवितो.

**विरक्ता मोक्षमिच्छंति कल्पंते क्षणिकं जगत् ।**
**नाशयंति च मोहं ते सज्ज्ञानं प्राप्नुवंति हि ।।१४।।**

विरक्त होऊन मोक्षाची इच्छा करतात, ते जग क्षणभंगुर आहे असे मानतात, ते मोहाचा नाश करतात व उत्तम ज्ञान प्राप्त करून घेतात.

**वर्धमाना विकारास्तु गुणधर्मविभागशः ।**
**तत्सादृश्येन कर्मात्र क्रियते सर्वजंतुभिः ।।१५।।**

(सत्त्व, रज व तम या) त्रिगुणांच्या वृध्दीमुळे विकार वाढतात आणि तदनुसार सर्व प्राणी या जगात कर्मे करीत असतात.

**प्राप्यते कर्मणा केन किं जन्म किं फलं कथम् ।**
**कविभिः सुखदुःखं च वियोगो योग एव हि ।।१६।।**

प्राण्यांना कोणत्या कर्मामुळे कोणता जन्म प्राप्त होतो, त्याची फळे काय होतात, सुखदुःखाची प्राप्ती कशी होते, आत्मज्ञानाचा विसर कसा पडतो व ते कसे प्राप्त करता येईल (याचे आता निरूपण करतो).

**सत्त्वात्स्वर्गापगर्वो च प्राप्येते रजसस्तु वै ।**
**सुखदुःखयुतं जन्म तमसः पापसंयुतम् ।।१७।।**

सत्त्वगुणांमुळे स्वर्ग व मोक्ष मिळतो. रजोगुणामुळे सुख व दुःख यांनी युक्त असा जन्म प्राप्त होतो. तमोगुणामुळे पापी असा अतिशय वाईट जन्म येतो.

**मानुषं दुर्लभं जन्म समानपुण्यपापजम् ।**
**स्वर्गे वसंति पुण्याश्च सायुज्यं यांति निर्गुणाः ।।१८।।**

पुण्य व पाप समान झाले असता दुर्लभ असा मनुष्याचा जन्म मिळतो. पुण्यवान लोक स्वर्गामध्ये जातात, गुणरहित लोक मोक्ष (सायुज्य) प्राप्त करून घेतात.

**तमसः कीटका व्याघ्र्या सर्पाश्च प्रस्तराः खलु ।**
**वृक्षाश्च निष्फलाः शश्वज्जायंते पापकर्मभिः ।।१९।।**

तमोगुणाने केलेल्या पापकर्मांमुळे वारंवार कीटक, वाघ, सर्प इ. किंवा दगड, फलहीन वृक्ष यांचा जन्म प्राप्त होतो.

**एवं सर्वं च दृश्यं वै विनष्टं ज्ञानदर्शने ।**
**आत्मसिध्दिश्च जातात्र ब्रह्माहं व्यापकं स्वयम् ।।२०।।**

अशा प्रकारे हे सर्व दृश्यजगत्, ज्ञान प्राप्त झाले असता नाहीसे होते व मी व्यापक ब्रह्म आहे असा आत्मसाक्षात्कार होतो.

**गुणधर्मविभागेन जीवोऽयं देहकर्मणा ।**
**भोक्ताहं मन्यतेऽज्ञानादात्मा वै जन्मकर्मभाक् ।।२१।।**

हा जीव शरीरसंबंधामुळे, त्रिगुणांच्या संगामुळे व कर्मांमुळे सुखदुःखांचा भोग घेतो. आत्म्याला जन्म किंवा कर्मे आहेत, हे त्याला (जीवाला) अज्ञानामुळे वाटते.

**तावद्भोगास्तु भूतानां यावद्द्वैतस्य भावना ।**
**अनेकधा विकाराश्च भवंति पूर्वकर्मभिः ।।२२।।**

जोवर द्वैत भावना असते, तोपर्यंतच प्राण्यांना सुखदुःखोपभोग असतात. तसेच पूर्वकर्मांमुळे त्यांना (काम, क्रोधादी) अनेक प्रकारचे विकार निर्माण होतात.

**लिंपंति तेषु ते नैव तत्त्वज्ञानबलेन च ।**
**निर्विकल्पं च पश्यंति सविकल्पसमाधिना ।।२३।।**

ते (योगी) तत्त्वज्ञानाच्या सामर्थ्यामुळे विकारांना वश होत नाहीत व त्यांचे लक्ष सविकल्प समाधिकडून निर्विकल्प समाधिकडे लागलेले असते.

**तत्र ते व्यक्तिशून्याश्च गमनागमवर्जिताः ।**
**सर्वेष्वंतर्गतात्मानो बाह्यवेषसुधारकाः ।।२४।।**

ते त्या वेळी स्वतःचे अस्तित्व नसलेले, हालचाल (जाणे-येणे) इ. क्रिया नसलेले, आत्मा सर्वांच्या ठिकाणी असतो (हे जाणणारे परंतु) बाहेरून व्यवस्थित असा वेष धारण केलेले असे असतात.

**ते वर्णाश्रमधर्मेषु प्रपंचसाधने तथा ।**
**असंगाश्च विमुक्ता वै नाटके तु नटा यथा ।।२५।।**

ते वर्णाश्रम धर्माच्या बाबतीत, तसेच प्रपंचसाधनाविषयी नाटकातील नटाप्रमाणे आसक्तीरहित व मुक्त असतात.

**ब्रह्मानंदनिमग्नाश्च तेऽन्तरात्मसुखेन वै ।**
**नित्यज्ञानरता दृश्ये निरालंबस्य दर्शनम् ।।२६।।**

त्यांना आत्मसुख प्राप्त झाल्यामुळे ते नेहमी ब्रह्मानंदामध्ये बुडून गेलेले असतात. नेहमीच ज्ञानामध्ये रत असलेले ते, सर्व दृश्यामध्ये परमात्म्याला पाहतात.

**आत्मानुभवसंधानं नामरूपविवर्जितम् ।**
**कर्मकारणभस्मीकृत्क्रियमाणविनाशकम् ।।२७।।**

कर्मकारणांचा तसेच क्रियमाण कर्मांचा (ज्ञानाने जाळून नाश केलेले असे ते, नामरूपाच्या पलीकडे असलेल्या परमात्म्याचा अनुभव घेत असतात.

**मुक्तस्य न पुनर्जन्म न दुःखं नैव गर्भता ।**
**नास्ति तु मरणं तस्य दृश्यं सर्वं न विद्यते ।।२८।।**

मुक्ताला दृश्यवस्तू भासत नाहीत, त्याला पुनर्जन्म असत नाही. दुःखे व गर्भवासपण असत नाहीत आणि त्याला मृत्यूपण नसतो.

**अज्ञस्य तु पुनर्दैवं पुनर्व्याधिश्च दीनता ।**
**पुनः पुत्राश्च मित्राणि कलत्रं च तथाश्रमाः ।।२९।।**

मूर्खाला मात्र पुनः पुन्हा दैव, व्याधि व दैन्य प्राप्त होते. त्याला पुनः पुन्हा मुले, मित्र, स्त्री व आश्रम प्राप्त होत असतात.

**सेव्यसेवकयोर्भावः स्तनपानं पुनः पुनः ।**
**तारुण्यं चैव वार्धक्यं रूपहीनं च सर्वदा ।।३०।।**

त्याला वारंवार सेव्यसेवकत्व, बालपण, तारुण्य तसेच रूपहीन वृद्धत्वाची प्राप्ती होते.

**नैव क्षुधा न तृप्तिश्च जीवन्मुक्तश्च सर्वदा ।**
**यदा गतभ्रमो जीवो ब्रह्म संपद्यते तदा ।।३१।।**

जीवन्मुक्ताला केव्हाही भूक लागत नाही किंवा तृप्तीही होत नाही. जेव्हा जीवाचा भ्रम नाहीसा होतो, तेव्हाच ्याला ब्रह्मप्राप्ती होते.

**निःसंगो रमते योगी निष्कामो विगतज्वरः ।**
**संतुष्टो लोभशून्यश्च बालोन्मत्तपिशाचवत् ।।३२।।**

संग, कामना, क्रोध नसलेला, निर्लोभी व संतुष्ट योगी लहान मूल, उन्मत्त माणूस किंवा पिशाचाप्रमाणे आनंदात असतो.

**अक्रोधो बोधसंयुक्तो देहस्थं साक्षिणं परम् ।**
**चैतन्यं शाश्वतं पश्येद्देहधर्मं च धारयन् ।।३३।।**

(अशा त्या योग्याने) राग नष्ट करून, ज्ञानाने युक्त होऊन देहधर्माचे आचरण करीत असतानाच देहातील श्रेष्ठ अशा परमसाक्षिरूप, चैतन्य, शाश्वत आत्म्याला पाहावे.

**आत्मध्यानस्थितश्चात्मसुखानुभविता नरः ।**
**अनिर्वाच्यं परब्रह्म सोऽहं पश्यति चिन्मयम् ।।३४।।**

आत्मज्ञानामध्ये मग्न असलेला, आत्मसुखाचा अनुभव घेणारा, तो योगी (पुरुष) अनिर्वचनीय, चैतन्यरूप परब्रह्म 'ते मी आहे' असे पाहतो.

**सानुकूलः स्वयंसिध्दः परमात्मायमव्ययः ।**
**नास्ति च तद्विना किंचिदन्यत्तु सुखसाधनम् ।।३५।।**

हा परमात्मा अविनाशी, आत्मसिध्दीला अनुकूल व स्वयंसिद्ध आहे. त्याच्याशिवाय दुसरे कोणतेही सुख देणारे साधन नाही.

**स्वप्नवत्क्षणिकं सर्वं नामरूपात्मकं जगत् ।**
**तस्मिन्यत्सुखदुःखं च मृगवारिसमं खलु ।।३६।।**

सर्व नामरूपात्मक जग हे स्वप्नाप्रमाणे क्षणिक आहे. त्यांतील सुखदुःख हे मृगजळाप्रमाणे आहे.

**यथा सिंधौ तरंगास्तद्वच्चैतन्ये जगद्भ्रमः ।**
**गुणत्रयविभागेन सर्वकर्मविवर्तकः ।।३७।।**

ज्याप्रमाणे समुद्रावर लाटा उठतात, त्याचप्रमाणे ब्रह्मावर जगाचा भास (भ्रम) होतो. तो भ्रमच त्रिगुणांच्या साहाय्याने सर्व कर्मे करीत असतो.

**तत्र सुखं च मन्यंते मूढा मायाभ्रसंभवम् ।**
**तत्कर्मणापि बध्दास्तेऽनात्मानो दुर्जनाः खलु ।।३८।।**

तेथे मूर्ख लोक मात्र या मायारूपी ढगांपासून निर्माण झालेल्या क्रियेला सुख मानीत असतात. मायेच्या कार्यामुळे बद्ध असलेले ते आत्मशून्य लोक खरोखर दुर्जन असतात.

**सद्भावेन युतः श्रेष्ठः शुभो वै भेदनाशकः ।**
**ब्रह्मविद्ब्रह्मगो नित्यः सर्वज्ञानप्रकाशकः ।।३९।।**

पवित्र अशा सद्भावाने युक्त असणारा श्रेष्ठ, शुभ, भेद नष्ट करणारा, नित्य अशा सर्व ज्ञानाला प्रकाशित करणारा, ब्रह्म जाणणारा साधू, तो नेहमीच ब्रह्मप्राप्ती करून घेतो.

**बुध्दीचें बोद्धव्य । मनाचे मंतव्य । चित्ताचे चेतव्य । मुरालें जेथ ।२६।**
**ऐसा शांभवीमुद्रा प्रसाद। प्राप्त झाला जया विशद। तोचि भगवंतासि प्रसिद्ध। प्रिय झाला।२७।**

**।। इति श्रीसिध्दान्तसंहितायां सोहिराविरचिताया जिज्ञासूनां ज्ञानप्राप्तियोगो नाम षष्ठोऽध्यायः संपूर्णः ।।**

# अध्याय सातवा

## अर्थार्थीज्ञानयोगकथन

**भवाब्धितारको देवो जगध्देतुश्च मृत्युहा ।**
**समर्थोऽयमतो भक्तास्तं सदाऽनुसरंति ते ।।१।।**

देव भवसागरातून तारणारा व जगाचे कारण असा आहे. तो मृत्यूचा नाश करणारा व सामर्थ्यसंपन्न आहे म्हणून भक्तजन नेहमीच त्याचे अनुसरण करतात.

**सर्गादिकारणं भक्ताः स्वात्मसुखप्रदायकम् ।**
**निस्पृहाः कामनिर्मुक्ता भजंते तमनन्यभाक् ।।२।।**

त्या आत्मसुख देणा-या, उत्पत्ती, स्थिती व प्रलयाचे कारण असलेल्या परमेश्वराला निरिच्छ व कामनारहित भक्त अनन्यतेने भजतात.

**चिन्मयो ब्रह्मरूपोऽयं सत्संगेषु परायणः ।**
**नारायणसमं सर्वं जगत्पश्यति वर्तते ।।३।।**

हा भक्त चैतन्यमय, ब्रह्मरूप व सत्संगतीमध्ये मग्न असून तो सर्व जग नारायणरूपच (परमात्मस्वरूप) पाहतो.

**सन्नित्यसुखहेत्वात्मबोधेन सर्वदा स वै ।**
**कालं क्राम्यति तृप्तः सन्विरक्तस्तत्त्वविन्नरः ।।४।।**

तत्त्वज्ञ माणूस विरक्त व तृप्त असतो व तो नित्य व उत्तम सुखाला कारण असलेल्या आत्मज्ञानात आपला काळ घालवीत असतो.

**निष्कामी राजयोगी च रागव्देषविवर्जितः ।**
**विवेकी क्लेशशून्यश्च भुंक्ते सर्व च नित्यशः ।।५।।**

तो राग-व्देष नसणारा निष्काम राजयोगी सर्व भोग विवेकाने व दुःखरहितपणे भोगत असतो.

**पद्मपत्रं जलेऽलिप्तमलिप्तोऽर्थैस्तथास वै ।**
**पश्यति सर्वगं ब्रह्म लिप्तं च दृश्यवस्तुना ।।६।।**

कमळाचे पान जसे पाण्यापासून अलिप्त असते, तसाच तो विषयांपासून अलिप्त असतो. सर्वत्र व्यापून असणा-या ब्रह्माला दृश्यवस्तूनी केवळ स्पर्श केल्याप्रमाणे त्याला वाटते.

**भुजंगस्तु यथा वायुं योग्यश्नाति च संसृतिम् ।**
**निष्कामकर्मकर्ता च सर्वत्र ब्रह्मरूपकः ।।७।।**

साप जसा वायू भक्षण करतो , तसा तो योगी सर्व संसार खात असतो. तो निष्कामकर्म करणारा प्रत्यक्ष ब्रह्मरूपच असतो.

**दग्धबीजानि कर्माणि प्ररोहंति सतां न हि ।**
**तेन ते न लभंते च पुनर्जन्म च वासनाम् ।।८।।**

सज्जनांची (योग्यांची) कर्मबीजे जळून गेलेली असल्यामुळे ती पुनः वाढू शकत नाहीत, त्यामुळे त्यांना वासना व पुनर्जन्म येत नाहीत.

**वसंते मृतवल्ल्यश्च यथा सपल्लवा न तु ।**
**तव्दत्सतां तु कर्माणि नीष्फलानि वै ।।९।।**

मृतवेलींना ज्याप्रमाणे वसंत ऋतूत पालवी येत नाही, त्याप्रमाणे सज्जनांची कर्मे (जळून गेलेली असल्यामुळे) निष्काम होत असतात.

**प्रारब्धभोगसंयुक्तान्संतान्लिंपंति नैव ते ।**
**अच्छिद्रं दृश्यते सर्वैः कपित्थं गजभक्षितम् ।।१०।।**

प्रारब्धाचे भोग भोगत असताना संताना ती कर्मे चिकटत नाहीत. (जसे) हत्तीने खाल्लेले कवठ बाहेरून अभंगच दिसते (परंतु त्यातील गर्भ नाहीसा झालेला असतो.)

**गवां वने चरंतीनां चेतः स्वे स्तन्यपे शिशौ ।**
**तथा चित्तं परे नित्यं सतां तु देहिनां खलु ।।११।।**

रानात चरणा-या गाईचे मन जसे (घरी असलेल्या) आपल्या दूध पिणा-या वासरावर असते, तसे देहधारी साधूचे मन नेहमी परब्रह्माच्या ठिकाणी असते.

**परपुंसि यथा चित्तं जारिण्या वर्तते ननु ।**
**तथा चित्तं सतां नित्यं परे ब्रह्माणि देहिनाम् ।।१२।।**

जसे व्यभिचारी स्त्रीचे मन परपुरूषावर असते, तसे देहधारी साधूचे मन परब्रह्मामध्ये असते.

**लौकिकाश्रमधर्मेण वर्तंते साधवः सदा ।**
**परं तेषां मनो नित्यं परे ब्रह्माणि शाश्वते ।।१३।।**

साधू नेहमी लौकिक अशा आश्रमधर्मानुसार वर्तन करतात, परंतु त्याचे मन शाश्वत व नित्य अशा परब्रह्मामध्ये असते.

**कर्म रजस्तमाभ्यां वै प्रारब्धेन च वर्तनम् ।**
**ज्ञानाग्निदग्धकर्माणि बध्नंति तेषु नैव हि ।।१४।।**

रजोगुणामुळे किंवा तमोगुणामुळे होणारी कर्मे ते (साधू) करीत नाहीत. तसेच त्यांना प्रारब्धानुसार वागावे लागत नाही (कारण) ज्ञानाग्नीने त्यांची कर्मे भस्मसात झाल्यामुळे ती त्यांना बाधू शकत नाहीत.

**यथा महौषधेनैव महद्विषं तु शाम्यते ।**
**विषयाश्च शमं यांति स्वात्मबोधेन वै तथा ।।१५।।**

जसे महाऔषधानेच महाविष शांत होते, तसेच आत्मज्ञान विषयांचा नाश करते.

**सर्वान्विषयबंधांश्च नाशयत्यर्धमातृका ।**
**भवरोगभयं हंत्री साक्षिणी चेश्वरी कृपा ।।१६।।**

ॐकाराची अर्धमात्रा म्हणजेच साक्षिणी अवस्था. ही विषयांचे बंध नाहीसे करणारी असून भवरोगाचे भय(पण) नष्ट करते.

**साधुः साक्षात्परं ब्रह्म परमात्मा सदाशिवः ।**
**सुनिश्चलश्च पूर्णोऽयं दिव्यमूर्तिर्दिगंबरः ।।१७।।**

साधू हा साक्षात् परब्रह्म परमात्मा सदाशिवच असतो. तो पूर्ण, स्थिर तसेच दिव्यरूप धारण करणारा दिगंबरच असतो.

**आत्मन्येवात्मना तुष्टो निदानज्ञः परात्परः ।**
**तस्मिन्द्वैतस्य चाभावः स्यान्मायायाः कुतो भयम्? ।।१८।।**

आत्माज्ञानामुळे स्वयं संतुष्ट असलेल्या, सृष्टीचे मूळ कारण जाणणा-या, अशा सर्वश्रेष्ठ साधूला त्याच्या ठिकाणी द्वैतभाव नसल्यामुळे मायेचे भय कसे बरे असेल?

**अभिन्ना नित्यमुक्ताश्चाविर्भूताश्चिन्मयास्तथा ।**
**निष्प्रपंचविशुध्दाश्च पश्यंति दृश्यमात्मवत् ।।१९।।**

द्वैतभाव नसलेला, नेहमीच मुक्त अवस्थेत असणारा, स्वतःच प्रकट झालेले चैतन्यरूप असा साधू, प्रपंचरहित व शुद्ध असणारा असून त्याला सर्व दृश्यवस्तू आत्मरूपच दिसतात.

**योगप्राप्ताश्च ये संतः सर्वसाध्याश्च तन्मयाः ।**
**समाधानस्य धामैव यांति ते परमसाधनम् ।।२०।।**

योगसिध्दी प्राप्त झालेले, आत्मज्ञानात तन्मय असलेले ते साधू, श्रेष्ठ आणि परमसाधन असे समाधानाचे स्थान प्राप्त करून घेतात.

**सद्यःसुखं समाधानं सर्वत्र ब्रह्मभावना ।**
**तेषां दुखःसुखं तुल्यं च संदेहविनाशनात् ।।२१।।**

त्यांची सर्वत्र ब्रह्मरूप भावना असल्यामुळे त्यांना नेहमीच आत्यंतिक सुख व समाधान असते. त्यांचे सर्व संदेह नष्ट झालेले असल्यामुळे त्यांना सुख व दुःख समानच असतात.

**कर्तुमात्मविशुध्दिं च कोऽन्योऽस्ति मनुजो भुवि ।**
**स्वयं तु शुद्धबुद्धश्च तुर्यया सज्जनं व्रजेत् ।।२२।।**

पृथ्वीवर चित्तशुध्दी करणारे साधूशिवाय इतर कोण आहेत? आपणच आपल्या बुध्दीची पवित्रता साधून तुर्येच्या प्राप्तीसाठी साधूकडे जावे.

**सतां तु संगतिं सेवां नित्यं च प्रार्थनां खलु ।**
**कृत्वा ज्ञानं च तेभ्यस्तु श्रुत्वा मनसि चिंतयेत् ।।२३।।**

सज्जनांची नेहमी संगती, सेवा व प्रार्थना करावी व त्यांच्याकडून ज्ञान मिळवून, त्याचे मनामध्ये चिंतन करावे.

**गृहस्थवर्णिने चापि वेदांतोपनिषत्खलु ।**
**उपदिशंति संतश्च व्यतिरेकान्वयक्रमम् ।।२४।।**

साधुलोक गृहस्थाश्रमींनासुध्दा वेदान्त व उपनिषदे यांचा उपदेश करतात. त्यांना क्रमाने व्यतिरेक व अन्वयज्ञानसुध्दा देतात.

**तदनुसृत्य धिरोऽसौ मुद्राध्यानासनस्थितः ।**
**दृश्यविक्षेपशून्यश्च पूर्णप्राप्तिं च गच्छति ।।२५।।**

(साधूंनी केलेल्या उपदेशाला) अनुसरून तो धैर्यवान साधक आसन, मुद्रा, ध्यान यांचा आश्रय करून व दृश्याचा प्रतिबंध नाहीसा करून पूर्णत्व प्राप्त करून घेतो.

**दृश्यं स्वप्नं च शून्यं च चतुर्थो भेदसंज्ञकः ।**
**एतेषां भ्रांतिनाशस्तु क्रियते च क्रमेण वै ।।२६।।**

दृश्य, स्वप्न व शून्य (सुषुप्ति) या जीवाच्या (जगत् आणि ब्रह्म यात भेद दाखविणा-या) तीन भ्रामक अवस्था आहेत. त्यांचा क्रमाने निरास करावा, तेव्हा चवथ्या अवस्थेत (तुर्या अवस्थेत) वरील भेद नष्ट होतो.

**स्थूललिंगे शरीरे च तृतीयं कारणं तथा ।**
**एतान्यतीत्य संगच्छेन्महाकारणसंज्ञितम् ।।२७।।**

स्थूलशरीर, लिंगशरीर व तिसरे कारणशरीर या तिन्ही शरीरांच्या पलीकडे जाऊन महाकारण या शरीराची प्राप्ती करून घ्यावी.

**जागृतिः प्रथमावस्था द्वितीया स्वप्न एव च ।**
**तृतीया च सुषुप्तिः स्यादेताँस्त्यक्त्वा तुर्यां व्रजेत् ।।२८।।**

जागृति ही (जीवाची) पहिली अवस्था आहे, दुसरी स्वप्न ही आहे, तिसरी सुषुप्ति अवस्था आहे. या तिन्ही अवस्था टाकून चवथी तुर्यावस्था प्राप्त करून घ्यावी.

**अउमेताश्च मात्रास्तु सर्गस्थितिलयप्रदाः ।**
**चतुर्थी चार्धमात्रां तु शून्याख्यां रमते स वै ।।२९।।**

ओमकाराच्या अ, उ, म् या तीन मात्रा उत्पत्ती, स्थिती व लय करणा-या आहेत; चवथी मात्रा शून्य ही आहे. योगीलोक त्या मात्रेमध्ये रममाण होतात.

**विश्वाख्यः प्रथमश्चैव तैजसाख्यः परस्तथा ।**
**प्राज्ञाख्यश्च तृतीयस्तु चतुर्थ ईश्वरस्तथा ।।३०।।**

(जीवाच्या चार अवस्थांमधिल) विश्व हा सत्तेचा प्रथम अभिमानी असून तैजस हा दुसरा, तिसरा प्राज्ञ असून ईश्वर हा चवथा अभिमानी आहे.

**नेत्राभासश्च स्थूलाख्यः साकारः प्रथमः खलु ।**
**प्रविविक्तो द्वितीयश्च स्वेच्छाभूतो मनःस्थितः ।।३१।।**

डोळ्यांना भासणा-या साकार स्थूलदेहाचा नेत्रभोग हा प्रथमभोग आणि स्वप्न अवस्थेचा म्हणजे कल्पनेने साकार झालेल्या मानसिक सृष्टीचा प्रविविक्त भोग, हा दुसरा योग आहे.

**तृतीयस्तु निराभास आनंदाख्यश्चतुर्थकः ।**
**सर्वद्रष्टा च संपूर्णः शाश्वतः परमप्रिय ।।३२।।**

गाढ झोपेमध्ये (सुषुप्तीमध्ये) मिळणारा आनंद हा तिसरा निराभास नावाचा भोग आहे. सर्व पाहणारा नित्य, अतिशय आवडणारा आनंद हा (तुरीय अवस्थेचा) चवथा भोग आहे.

**त्रिकूटं श्रीहटं चैव गोल्हाटं च ततः परम् ।**
**चतुर्थमौटपीठं च सुषुम्नामार्गणे खलु ।।३३।।**

सुषुम्नेच्या वाटेत असणारी त्रिकूट, श्रीहाट, गोल्हाट अशी तीन मंडळे असून त्यापुढे चवथे औटपीठ हे मंडळ आहे.

**पंचमी भृंगगुंफा तत्रोन्मनी सा प्रकीर्तिता ।**
**समाधौ पूर्णयोगा च स्थिरात्मसिध्दिदा खलु ।।३४।।**

पाचव्या मंडळाचे नाव भृंगगुंफा आहे, तिला उन्मनी म्हणतात. त्या स्थितीमध्ये संपूर्ण व स्थिर समाधि असते. ही अवस्था आत्मसिध्दी देणारी आहे.

**सर्वद्रष्ट्री तु वै तुर्या चावस्थात्रयसाक्षिणी ।**
**नित्यं निरंजनासक्ता समाधानं च गच्छति ।।३५।।**

सर्वद्रष्ट्री (आणि जागृति, स्वप्न, सुषुप्ति या) तिन्ही अवस्थांची साक्षिणी अशी तुर्या ही अवस्था आहे. त्या अवस्थेत योगी निरंजन आत्म्यामध्ये मग्न राहून समाधान मिळवीत असतो.

**भिन्नमशाश्वतं सर्वं स्थूलं लिंग च कारणम् ।**
**पश्यति सैव शश्वच्च सोऽहंमूलश्च निर्गुणः ।।३६।।**

या अवस्थेमध्ये स्थूलशरीर, लिंगशरीर, कारणशरीर तो (योगी) आपल्याहून भिन्न आणि अशाश्वत असलेले पाहतो. या वेळी राहिलेले शाश्वत असे निर्गुण ब्रह्म 'ते मी आहे' हे तो पाहतो.

**नाहं सावयवोऽस्मीति साभासोऽहं न वै तथा ।**

**शून्योऽप्यहं न वै साक्षी सर्वगो निर्मलः खलु ।।३७।।**

मी अवयव असलेला (साकार) नाही, मी आभासयुक्त नाही, मी शून्यही नाही, तर सर्वसाक्षी, सर्वव्यापी, पवित्र (आत्मा) आहे, हे तो पाहतो.

**अहंकारवियुक्तं चानाद्यंतं द्वैतवर्जितम् ।**

**कैवल्यं शिवरूपं च योगिनां परमं सुखम् ।।३८।।**

तो स्वतःला अहंकारापासून दूर असलेला, अनादि, अनंत, द्वैत नसलेला, कैवल्य शिवस्वरूप, या योग्यांना मिळणा-या श्रेष्ठ सुखाच्या अवस्थेत पाहतो.

**इति ज्ञानसमाधानं सांप्रदायेन साधितम् ।**

**विक्षेपावरणघ्नं चाद्वैतं स्वानुभवं च तत् ।।३९।।**

हे ज्ञानामुळे मिळणारे समाधान गुरुपारंपरिक संप्रदायाने साध्य करावयाचे असते. या ज्ञानामुळे आवरण व विक्षेप नाहीसे होतात. अद्वैताची प्राप्ती होते व स्वानुभव मिळतो.

**पूर्वसत्कर्मयोगेन कश्चिन्नरेषु साधकः ।**

**निश्चलज्ञानसंयुक्तं आत्मानं वेत्ति सर्वगम् ।।४०।।**

(असंख्य) माणसांमध्ये एखादाच स्थिर ज्ञानाने युक्त असा साधक आपल्या पूर्वपुण्याईने सर्वत्र असणा-या आत्म्याला जाणू शकतो.

**।। इति श्रीसिध्दान्तसंहितायां सोहिराविरचितायामर्थार्थीज्ञानयोगकथनं नाम सप्तमोऽध्यायः संपूर्णः ।।**

# अध्याय आठवा

## अज्ञानज्ञसंगफलयोग

**आत्मानं यो विजानाति नृणां श्रेष्ठतमो मतः ।**

**अन्ये च विषयासक्ताः कस्मै जीवंति ते भुवि ।।१।।**

जो आपल्याला जाणतो (म्हणजे ज्याला आत्मज्ञान झालेले असते) तो माणसामध्ये सर्वश्रेष्ठ पुरुष आहे. इतर जे विषयांमध्ये आसक्त असतात त्यांचे जीवन व्यर्थ आहे, ते पृथ्वीवर का जगतात?

**शिष्टधर्मरतो धन्यः सद्‌गुणी च विराजते ।**

**बाह्यशुद्धश्च पाखंडी दुर्गुणी नैव शोभते ।।२।।**

सद्धर्मांमध्ये मग्न असलेला सद्‌गुणी माणूस हा धन्य होय (त्यालाच यश मिळते). बाहेरून सदाचारी परंतु मनातून पाखंडी व दुर्गुणी माणूस शोभून दिसत नाही.

**अध्यायाध्यापने चैव ज्ञानयोगव्यवस्थितीः ।**

**शमदमादि सत्यं वै विप्राणां कर्म तूत्तमम् ।।३।।**

अध्ययन, अध्यापन व ज्ञानयोग प्राप्त करणे, तसेच शम, दम इत्यादी नियमांचे पालन करून सत्याचे पालन करणे, हे ब्राह्मणाचे उत्तम कर्म आहे.

**क्षात्रधर्मस्तु शौर्यं च चाप्यपलायनम् ।**

**जीवस्य निर्ममत्वं वै धृतिस्तु साधुता तथा ।।४।।**

शौर्य, युध्दापासून पळून न जाणे, जीवावर ममता न ठेवणे, धैर्य व साधुत्व हे क्षत्रियांचे उत्तम गुण आहेत.

**कुलस्त्रीणां च धर्मस्त्वव्यभिचर्येण वर्तनम् ।**

**ईश्वरतुल्यं पूज्यं च सद्भावं भर्तृसेवनम् ।।५।।**

अव्यभिचारपणे राहणे व पतीला ईश्वराप्रमाणे पूज्य मानून त्याची सद्भावाने सेवा करणे, हा कुलस्त्रीचा धर्म आहे.

**श्रेष्ठधर्मो गृहस्थानां सत्यत्वं प्रियभाषणम् ।**

**भूतेषु सदयत्वं च यथाशक्ति च दातृता ।।६।।**

सत्य व गोड बोलणे, सर्व प्राण्यांवर दया करणे, शक्तीनुसार दान करणे, हा गृहस्थाचा श्रेष्ठ धर्म आहे.

**अनित्यं च शरीरं वै कीर्तिस्तु शाश्वता परा ।**

**आप्तवर्गाश्च पोष्या वै गृहस्थस्य मनः परे ।।७।।**

शरीर हे अनित्य आहे असा निश्चय करून, कीर्ति हीच नित्य आहे हे जाणून घरातले लोक, नोकर, चाकर इ. चे पोषण करून परब्रह्माच्या ठिकाणी मन ठेवणे, हे गृहस्थाचे कर्तव्य आहे.

**मैथुनमष्टकं वर्ज्यमिंद्रियनिग्रहश्च वै ।**

**शुक्रस्य संग्रहो नित्यं कर्मैतद्ब्रह्मचारिणः ।।८।।**

आठही प्रकारचे मैथुन वर्ज्य करणे, इंद्रियांचा निग्रह करणे व वीर्याचा संग्रह करणे, हे ब्रह्मचा-याचे कर्तव्य आहे.

**मित्राणां श्रेष्ठधर्मस्तु निष्कामप्रीतिवर्धनम् ।**

**अत्यागसहनत्वं च समा चानुमतिः सदा ।।९।।**

(मित्रावर) निष्काम प्रेम करणे, केव्हाही त्याचा त्याग न करणे, सहनशीलता व सुखदुःखामध्ये समानता, हा मित्राचा श्रेष्ठ धर्म आहे.

**गुरुणां श्रेष्ठधर्मश्च छात्राणां भवतारकम् ।**

**अज्ञाननाशनं तेषां ज्ञानदानं च मुक्तिदम् ।।१०।।**

शिष्यांचे अज्ञान नष्ट करून त्यांचा भवसागरातून उध्दार करणे, तसेच त्यांना मोक्ष मिळवून देणारे ज्ञान देणे, हे गुरुचे मुख्य कर्तव्य आहे.

**शिष्यस्य लक्षणं श्रेष्ठमनन्यं गुरुसेवनम् ।**

**प्रज्ञानत्वमनिंद्यं च शाश्वतस्य परीक्षणम् ।।११।।**

अनन्यतेने गुरुसेवा, ज्ञाननिष्ठा, अनिंद्य वर्तन व नित्य अशा आत्मवस्तूचे परीक्षण, हेच शिष्याचे उत्तम लक्षण आहे.

**साधूनां मुख्यधर्मश्च विचार आत्मनः खलु ।**

**ईश्वरभजनं नित्यं निर्गुणे निरतिः स्थिरा ।।१२।।**

ईश्वराची भक्ती करणे व निर्गुण ब्रह्माच्या ठिकाणी बुध्दी स्थिर करणे आणि
आत्मविचार हा साधूचा मुख्य धर्म आहे.

**स्वभावस्तु गुरोः शुद्धोऽसह्यश्च दुर्जयः खलु ।**
**स दोषो नैव तस्मिन्ननंतगुणनिधौ बत ।।१३।।**

गुरुचा स्वभाव पवित्र असला तरी तो सहन करण्यास कठीण व कठोर असतो. तरी
अनंत गुणांचा निधि त्याच्याकडे असल्यामुळे त्याला (स्वभावाला) दोष लेखू नये.

**तीर्थराजः पवित्रश्च रत्नानां जनकः खलु ।**
**एकेन क्षारदोषेण तृषार्तो नैव तुष्यति ।।१४।।**

तीर्थराज असा समुद्र पवित्र व रत्नांचा साठा आहे. परंतु एका खारटपणामुळे
तहानलेल्याची तहान तो भागवू शकत नाही.

**तथापि तं च गच्छंति पापं धावयितुं जनाः ।**
**तद्वत्साधुं तु ज्ञानार्थं विद्यार्थी च गुरुं व्रजेत् ।।१५।।**

तरीसुध्दा पाप धुण्यासाठी लोक समुद्राकडे जातातच. त्याचप्रमाणे साधूकडे किंवा
गुरुकडे शिष्याने ज्ञान मिळविण्यासाठी जावे.

**विश्वप्रकाशकः सूर्यश्चैतन्यजनिता च सः ।**
**पूज्यश्चापि समर्थो हि तापो दोषाय तत्र न ।।१६।।**

विश्वाला प्रकाश देणारा सूर्य, चैतन्य निर्माण करणारा आहे. तो समर्थ व पूज्य आहे,
पण त्याचे चटके बसतात, हा त्याचा दोष लेखू नये.

**शतपत्रं सुरम्यं च सौरभेण युतं खलु ।**
**तस्मिन्कंटकवृध्दिश्च दोषाय न कदाचन ।।१७।।**

फुले सुगंधि व सुंदर असतात, पण (त्यांच्या) झाडांना काटे असणे, हे दोषकारक ठरत नाही.

**शीतला तु पवित्र सा गंगा च पापनाशिनी ।**
**तस्यां कर्दमसंघश्च नैव दोषाय जायते ।।१८।।**

गंगा ही पावन (नदी असून), पाप नष्ट करणारी व शीतल आहे. तिच्यात असणारा
खूप चिखल हा दोषकारक ठरत नाही.

**तेजःपुंजयुतं रत्नममोघं कठिनं खलु ।**
**काठिन्यं तु न दोषाय भूषणाय परं च वै ।।१९।।**

रत्न हे तेजःपुंज परंतु अतिशय कठीण असते. त्याची कठीणता त्याला दोषकारक
न ठरता भूषणावह ठरते.

**चंदनं शीतलं चैव सुगंधं सौभगं खलु ।**
**तस्मिंश्च तिक्ततादोषः कथं भवति पश्य वै? ।।२०।।**

चंदन शीतल, सुगंधि व सौंदर्य देणारे आहे. पण त्याच्यामध्ये कडूपणा हा दोष
असतोच ना? पहा बरे!

**मृगमदः सुगंधश्च बहुमूल्यः सुखप्रदः ।**
**पशुभूतमिदं किं च ब्रूहि त्वं दूषणं ननु ।।२१।।**

कस्तूरी सुगंधि, किमती व सुख देणारी आहे; परंतु ती पशूपासून निर्माण होते, हे काय तिचे दूषण आहे? सांग बरे!

**गृह्यंत इंद्रियग्रामैर्यथा स्वविषयाः खलु ।**
**तथाधिकारिणा चैव गृह्यते ज्ञानमुत्तमम् ।।२२।।**

प्रत्येक इंद्रिय आपापल्या विषयांचे ज्ञान जसे घेते, तसेच अधिकारी व्यक्तीकडून उत्तम ज्ञान घेतले जाते.

**पद्मिनीरूपभार्यायां किं रमेत नपुंसकः ।**
**साधोश्च परमं गुह्यमज्ञो जानाति वै कथम्? ।।२३।।**

सुंदर पद्मिनी पत्नी मिळाली तरी नपुंसकाला तिचे काय? तसेच साधूचे गुप्तज्ञान मूर्ख जाणू शकत नाही (त्याला त्या ज्ञानाचा उपयोग नाही).

**दुर्गंधे कीटकप्रीतिः सुगंधे मरणं ध्रुवम् ।**
**तद्वदज्ञजनः सर्वो ज्ञानं तिरस्करोति वै ।।२४।।**

कीटकांना घाणीची आवड असते. सुगंधात त्यांचे मरण निश्चित असते. त्याचप्रमाणे सर्व मूर्ख माणसे ज्ञानाचा तिरस्कार करतात.

**धनविषयलुब्धाश्च निंदापाखंडवादिनः ।**
**कर्माभिमानिनः पापा विमुखाः साधुदर्शने ।।२५।।**

धन व विषय यांचे लोभी, निंदेमध्ये व पाखंडी वादामध्ये मग्न असणारे, कर्मठ व पापी लोक साधूच्या दर्शनाला जात नसतात.

**संकटेऽपि विरक्तस्तु वसेन्नैतादृशेषु वै ।**
**यदि वासो भवेत्तेषु न बोधव्याश्च ते तु वै ।।२६।।**

अशा लोकांमध्ये विरक्ताने संकटप्रसंगीसुध्दा राहू नये. जर कदाचित (त्यांच्यामध्ये) राहवे लागलेच तर आपली ओळख त्यांना देऊ नये.

**भोक्तृत्वान्नोदकार्थं च दृश्ये संगश्च जायते ।**
**तद्विना तु चरेध्दीमान्निःसंगं निरुपद्रवम् ।।२७।।**

(केवळ) अन्न व पाणी या भोक्तृत्वामुळे दृश्याचा सहवास करावा लागतो. बुध्दिमान माणसाने इतर वेळी निःसंग व उपद्रवाशिवाय राहवे.

**एकाकी सन्विरक्तस्तु स्मरेद्धरिं च पुण्यदम् ।**
**यस्य स्मरणमात्रेण मुच्यते जन्मबंधनात् ।।२८।।**

विरक्त माणसाने एकांतात राहून पुण्यकारक अशा विष्णूचे स्मरण करावे. त्यांच्या केवळ स्मरणाने जन्ममृत्यूच्या बंधनातून माणूस मुक्त होतो.

**यथा लाभः फलाहारोऽन्नं सद्भिर्भक्ष्यते खलु ।**
**तैरपि नोपदिश्यंतेऽज्ञानाः कामरता ननु ।।२९।।**

लाभाशिवाय आनंद होत नाही, हे खरे. जसे भूक लागली (आणि योग्य अन्न न मिळाले) तर साधू ती फलाहाराने भागवितात. तसेच (योग्य शिष्य न मिळाल्यास) ते विषयी व अज्ञानी माणसाला ज्ञानोपदेश करीत नाहीत.

**जारिणीधर्मपत्न्यास्तु भर्त्रा या लभ्यते गतिः ।**
**तां गतिं साधवो यांति दुर्जनस्य समागमात् ।।३०।।**

(आपली) धर्मपत्नी व्यभिचारिणी असली तर पतीला जी गती मिळते, तीच गती दुर्जनांच्या सहवासामुळे साधूंना प्राप्त होते.

**सतां च संगतिः श्रेष्ठा सद्भिः सह निरंतरम् ।**
**तेषां संभाषणं नित्यं सर्वसौख्याय जायते ।।३१।।**

साधूची साधूंशी होणारी भेट ही अतिशय श्रेष्ठ आहे. त्यांचे संभाषण हे नेहमी सर्वांच्या सुखासाठी असते.

**प्रकृतिरुभयोरेका त्वभ्यासोपि द्वयोः समः ।**
**ताभ्यां लक्ष्यत ऐक्यं च साधनं हि द्वयोः समम् ।।३२।।**

त्या दोघांचीही प्रकृती, अभ्यास व साधन एकच असते. त्यांचे साध्यही एकच असते.

**तत्रालापांस्तयोः श्रृत्वार्तादयो यांति वै सुखम् ।**
**तेऽपि भवंति संताश्च तरवश्चंदनेन वै ।।३३।।**

तेथे त्यांचे संवाद ऐकून दुःखी लोक सुखी होतात. चंदनाच्या सहवासाने इतर वृक्ष जसे चंदन (सुवासिक) होतात तसे तेही (लोक) साधू होतात.

**आत्मबोधसुखं नित्यं भक्तिज्ञानसमुत्थितम् ।**
**स्वच्छं तच्छृण्वतां शश्वत्सर्वेषां तु सुखप्रदम् ।।३४।।**

भक्ती व ज्ञानामुळे निर्माण झालेले आत्मज्ञानाचे सुख नित्य व पवित्र असते. ते ऐकणा-या सर्वांनाच सुख देते.

**सुखसाध्यं समाराध्यं यत्परात्मसुबोधकम् ।**
**सर्वमयमभेद्यं चार्तिं विनोपदिशेन्न तु ।।३५।।**

अत्यंत सुख देणारे, समत्वाने जे मिळविता येते, सर्वत्र असणारे व नाश न पावणारे परमात्म्याचे ज्ञान (कुणालाही) तशीच तळमळ असल्याशिवाय देऊ नये.

**पूर्णात्मज्ञानिना नैवाज्ञेषु वासः क्रियेत वै ।**
**किंतु तेषां च संबंधोऽप्यसंतोषाय जायते ।।३६।।**

पूर्ण आत्मज्ञान असलेला माणूस अज्ञानी लोकामध्ये वसती करीत नाही. त्यांच्याशी संबंध हा केवळ असंतोषालाच कारणीभूत होत असतो.

**।।इति श्रीसिध्दान्तसंहितायां सोहिराविरचितायामज्ञानज्ञयोःसंगफलयोगो नामाष्टमोऽध्यायः संपूर्ण ।।**

# अध्याय नववा

## विहंगमीनमार्गसाधनयोग

**नायकः सर्वलोकानामनंतसुखदायकः ।**
**सत्त्वस्थाय चिरं शांतिं स्वनंदं च ददाति वै ।।१।।**

अनंत सुख देणारा, सर्व लोकांचा स्वामी, सत्त्वगुणसंपन्न माणसाला आत्मानंद व चिरकाल शांति देतो.

**ब्रह्मांड निर्मितं तेन सत्तारूपं सचेतनम् ।**
**सर्गस्थितिलयैर्युक्तमव्यक्तशाश्वतेन वै ।।२।।**

अव्यक्त व शाश्वत असलेल्या त्याने स्वतःच्या सत्तेने चेतन असे, उत्पत्ती, स्थिती व प्रलय यांनी युक्त असलेले ब्रह्मांड निर्माण केले.

**चंद्रसूर्यो प्रकाशात्मौ भिन्नगुणौ सुतेजसौ ।**
**कृताः स्थिरा नगास्तेन सुवेलास्थितसागराः ।।३।।**

प्रकाशरूप असणारे पण भिन्न गुण असणारे चंद्र, सूर्य त्याने निर्माण केले. मर्यादा असलेला सागर व स्थिर पर्वत त्याने निर्माण केले.

**आकाशं विस्तृतं चैव चपलः पवनः कृतः ।**
**तेजस्तूष्णं कृतं तेनार्द्रं जलं संज्ञितं खलु ।।४।।**

त्यानेच विस्तृत आकाश, उष्ण तेज, आर्द्र असलेले जल तसेच चपळ वा-याची निर्मिती केली.

**सर्वाधारा धरा चैव निर्मिता वै स्वसत्तया ।**
**तेनैव शेषरूपेण सुस्थिरा च कृता खलु ।।५।।**

त्यानेच आपल्या सत्तेने सर्वांचा आधार असलेली पृथ्वी निर्माण केली व तिला शेषरूप धारण करून स्थिर केली.

**तस्यां तु प्राणिनस्तेन गतिश्च कल्पिता खलु ।**
**आयुः स्वल्पं च दीर्घं वै क्षयो वृध्दिश्च कल्पिता ।।६।।**

त्या पृथ्वीवर त्याने प्राणी निर्माण करून त्यांना चालना दिली. तसेच काहींना दीर्घायुषी केले, तर काहींना अल्पायुषी केले; त्यांना वृध्दी व नाश या अवस्थाही दिल्या.

**क्वचित्कुटुंबिनश्चैव क्वचिद्दीनाः क्वचिन्मृताः ।**
**क्वचिच्च विभवास्तृप्ता उपोषितादयः कृताः ।।७।।**

काही कुटुंबे दीन असतात, तर काही मरतात. त्यानं काहींना ऐश्वर्यसंपन्न केले, तर काहींना खाण्याला अन्न नाही (असे उत्पन्न केले).

**कश्चिदादौ दरिद्री च पश्चाद्भवति भाग्यवान् ।**
**कश्चित्तु भाग्यवानादौ पश्चाद्दारिद्र्यसंयुतः ।।८।।**

काहीजण आधि दरिद्री असतात व मागाहून भाग्यवान होतात, तर काही आधि भाग्यवान व नंतर दरिद्री होतात.

**कश्चिद्ग्रस्तश्च रोगेण कश्चिद्भोगेन संयुतः ।**
**बहुसंततिवान्कश्चित्कश्चित्संततिदुर्लभः ।।९।।**

**काहीजण रोगाने ग्रस्त असतात, तर काही**जण भोगाने युक्त असतात. काहींना पुष्कळ संतती असते, तर काहींना मुळीच संतती असत नाही.

**संतुष्टा ज्ञानिनः केचित्केचिनमूढाश्च दुःखिनः ।**
**केचित्तु हर्षसंयुक्ताः केचिद्रुदंति नित्यशः ।।१०।।**

काही लोक संतुष्ट व ज्ञानी असतात, तर काही मूर्ख व दुःखी असतात. काही आनंदी असतात तर काही नेहमी रडत असतात.

**केचिदन्नाशिनश्चैव केचिच्च तृणभक्षकाः ।**
**वृक्षपर्णाशिनः केचित्केचित्पवनभक्षकाः ।।११।।**

काही प्राणी अन्न भक्षण करणारे असतात, तर काही गवत खाणारे असतात. काही झाडाची पाणे खाणारे तर काही वारा भक्षण करून जगणारे असतात.

**जरायुजांडजो चैवोद्‌भिज्जाश्च स्वेदजास्तथा ।**
**निर्मिताः प्राणिनः सर्वे भगवता स्वसत्तया ।।१२।।**

भगवंताने आपल्या शक्तीने जरायुज, अंडज, स्वेदज व उद्‌भिज असे सर्व (प्रकारचे) प्राणी निर्माण केले.

**सुखदुःखयुताः सर्वे प्राणिनः पूर्वकर्मणा ।**
**कर्मानुसारतो जीवाश्वरंति च स्वयोनिषु ।।१३।।**

सर्व प्राणी आपल्या पूर्वजन्मींच्या कर्मानुसार सुखदुःखे भोगतात तसेच (ते) एका योनीमधून दुस-या योनीमध्ये फिरत असतात.

**साभासं चैव साकारं विकृतं च त्वनेकधा ।**
**योगी पश्यति योगेन सर्वमेतच्च ब्रह्मजम् ।।१४।।**

अनेक प्रकारे विकार पावणारी साभास व साकार सृष्टी, योगी योगाच्या साहाय्याने ब्रह्मापासून निर्माण झालेली आहे, हे पाहतो.

**रज्जौ सर्पस्य भासश्चाप्यज्ञानं भ्रममूलकम् ।**
**ब्रह्मणि तु जगद्‌भासोऽज्ञानजो भ्रममुलकः ।।१५।।**

दोरावर सर्पाचा भास हा भ्रमामुळे व अज्ञानामुळे होतो. तसाच ब्रह्मावर जगाचा होणारा आभास, हा अज्ञानाने होणारा व भ्रममूलक आहे (हे तो जाणतो).

**सद्‌भिश्च दृश्यते चैवाभेददिव्यदृशा परम् ।**
**कैवल्यं च स्थिरं नित्यं शिवजीवैक्यसौख्यदम् ।।१६।।**

साधुलोक आपल्या भेदभाव नष्ट झालेल्या दिव्यदृष्टीने स्थिर, नित्य, शिव व जीव यांच्या ऐक्यामधिल सुख देणारे परब्रह्म पाहतात.

**ब्रह्मणि भूतसृष्टिश्च यथा हेम्नि नगास्तथा ।**
**चैतन्यं शून्यमाकाशं सर्वं वै ब्रह्मसंभवम् ।।१७।।**

सुवर्णामध्ये जसे अलंकार समाविष्ट असतात, तशीच ब्रह्मामध्येही भूतसृष्टी सामावलेली आहे. चैतन्य, शून्य व आकाश हे सर्व ब्रह्मापासून निर्माण झाले आहे.

**अधिष्ठानं च सर्वेषां विदेहिनां च दर्शनम् ।**
सर्वेषां चापि साक्षित्वं ब्रह्म तस्मिन्स्थितं म**हत् ।।१८।।**

सर्वांचे (पंचमहाभूतांचे) अधिष्ठान, ज्याचा विदेही लोकांना साक्षात्कार होतो, ते सर्वसाक्षी महद्‌ब्रह्म आहे.

**दृश्यभासश्च लोकेऽस्मिन्ब्रह्मज्ञानविघातकः ।**
**तस्माद्योगेन कार्यं च ब्रह्मज्ञानस्य साधनम् ।।१९।।**

ह्या लोकांमध्ये दृश्याचा होणारा भास ब्रह्मज्ञानाला बाधक आहे म्हणून योगाच्या साहाय्याने ब्रह्मज्ञानाचे साधन करावे.

**मार्गाश्च पंच वै साध्या योगिना फलसाधने ।**
**तेन स द्वैतनाशाच्च प्राप्नोति पदमव्ययम् ।।२०।।**

योग्यांना फलप्राप्तीसाठी पाच मार्ग उपलब्ध आहेत. त्यामुळे द्वैताचा नाश होतो व त्यांना चिरंतनपद मिळते.

**प्रथमो विहगाख्यश्च द्वितीयो मीनसंज्ञकः ।**
**तथा पिपीलिकाख्यश्च चतुर्थः कपिसंज्ञकः ।।२१।।**

पहिला विहंगममार्ग असून दुस-याचे नाव मीनमार्ग आहे. तिसरा पिपीलिका मार्ग असून चवथा कपिमार्ग आहे.

**सुषुम्ना स्थिरवायुश्च पिंगलेडे नियम्य वै ।**
**भ्रूमध्यस्थिरदृक्चेक्षते नैराश्यं च कारणम् ।।२२।।**

पिंगला व इडा यांचे नियमन करून सुषुम्नेमध्ये वायू स्थिर करून भ्रूमध्यामध्ये दृष्टी स्थिर करावी. हे करण्यासाठी नैराश्य येणे आवश्यक आहे.

**सभूतं वसुधांशं च त्यक्त्वा त्यजेच्च वै परम् ।**
**सूक्ष्माख्यमपि जाड्याभिमानं देहसमुद्भवम् ।।२३।।**

(त्या योगाने) पंचमहाभूतांसह पृथ्वीचा अंश टाकून त्याहूनही सूक्ष्म असलेला, देहापासून निर्माण झालेला जडतेचा अभिमान टाळावा.

**उदकं विकृतं चैव स्थूलसूक्ष्मकृतं खलु ।**
**ततः सूक्ष्मविकारांश्च दृश्यकारणमब्जहि ।।२४।।**

स्थूलदेह व सूक्ष्मदेह निर्माण करणा-या विकृत जलतत्त्वाचा नाश करावा. नंतर सूक्ष्म विकारांचा त्याग करावा व नंतर दृश्याचे कारण असलेले जलतत्त्वाचे निरसन करावे.

**आकृष्य द्वैतबुध्दिं च गोल्हाटे स्थिरमानसः ।**
**शून्यया लोकयन्सर्वं चैतन्येन युतो भवेत् ।।२५।।**

बुध्दीचे द्वैत एकत्र करून गोल्हाटामध्ये शून्य दृष्टीलावून मन स्थिर करून चैतन्यात मिळून जावे.

**वैखर्यां मध्यमायां च नष्टो भासो द्विदेहयोः ।**
**तेजोंऽतश्चैव पश्यंत्याः परायाः दृश्यशून्यकः ।।२६।।**

वैखरी व मध्यमेमध्ये (स्थूल व सूक्ष्म या) दोन्ही देहांचे भान नष्ट होते, पश्यंतीमध्ये तेजाचे भान होते व परावाणीमध्ये शून्यदृष्टी होते.

**तत्तेजसापि दृष्यं वै परब्रह्मप्रकाशम् ।**
**पश्यति चैव योगेन नगेषु हेमरूपताम् ।।२७।।**

(त्याच्या) त्या तेजाने तो विश्व हे जसे सर्व अलंकारात एकच सोने असते, तसे सर्वप्रकाशक परब्रह्म स्वरूपात पाहतो.

**समाधिसुखविश्रान्तः सुखदुःखसमश्च वै ।**
**त्यक्तकामः स्थिरात्मा च भेदशून्यश्च जायते ।।२८।।**

नेहमी समाधिसुख उपभोगणारा, सुख व दुःख समान असलेला, ज्याच्या सर्व कामना नष्ट झाल्या आहेत, असा स्थिरात्मा साम्यावस्थेला पोहोचतो.

**एवं विहंगमार्गश्च साकल्येन निवेदितः ।**
**श्रवणमननैर्यस्य प्राप्यते च परं पदम् ।।२९।।**

अशा प्रकारे संपूर्ण विहंगममार्ग सांगितला. या मार्गाचे श्रवण-मनन केले असता मोक्ष मिळतो.

**अथातो मीनमार्गश्च कथ्यते शृणु सादरम् ।**
**येन मार्गेण यांति वै संतोऽव्ययं स्थिरं परम् ।।३०।।**

आता मीनमार्ग सांगतो, तो लक्षपूर्वक ऐक की ज्या मार्गाने साधुलोक मोक्ष मिळवितात.

**दृष्टिभेदेन शून्यश्च संन्यासेन समन्वितः ।**
**सर्वसावधचेताश्च ब्रह्मभूयाय कल्प्यते ।।३१।।**

या मार्गामध्ये दृष्टीचा भेद टाकून, सावध चित्ताने शून्यता दृष्टी लावून, संन्यास सिद्ध करून ब्रह्मत्त्वाची प्राप्ती करता येते.

**अदृश्ये धारणा चैव धृतिस्तु चिन्मये परे ।**
**कमलिन्यां यथा भृंगो ब्रह्मणि तु मनस्तथा ।।३२।।**

या (मीन) मार्गात धारणा अदृश्यावर स्थिर करावी. सर्व निश्चय आत्मस्वरूपामध्येच ठेवावा व मन ज्याप्रमाणे भुंगा कमलिनीमध्ये गुंततो, तसे ब्रह्मामध्ये गुंतवावे.

**पूर्वकर्मानुसारेण देही प्रपंचसंयुतः ।**
**कामक्रोधादिभिश्चैव क्लेशी दुश्चितमानसः ।।३३।।**

जीव आपल्या पूर्वकर्मानुसार प्रपंचामध्ये गुंतून इच्छा व क्रोध यांच्यामुळे दुःखी होऊन कष्ट पावतो.

**दुःखार्तस्तु क्वचिल्लोके वैराग्यभक्तिसंयुतः ।**
**ज्ञानी भूत्वा प्रबुद्धश्च साधुर्भवति निर्मलः ।।३४।।**

या दुःखी आर्तामध्ये एखादाच कोणीतरी वैराग्य व भक्ति यांनी युक्त होऊन ज्ञानी व निर्मळ असा प्रबुद्ध साधू होतो.

**कामक्रोधादिसंभूतो विक्षेपो ब्रह्मरूपकः ।**
**निर्द्वंद्वनिर्विकारस्य लाभे स्याद्भवछेदकः ।।३५।।**

त्याला काम व क्रोध यांनी निर्माण झालेले भ्रम बांधू शकत नाहीत कारण त्याला सर्वत्र ब्रह्मच दिसते. तो द्वंद्वापलीकडे गेलेला असून निर्विकार झाल्यामुळे त्याने संसाराचा पाश तोडून टाकलेला असतो.

**अन्वयपूर्णज्ञानी च संदेहस्य विनासकः ।**
**नित्यानंदी शिवोऽहं चेत्यनुभवति वै सदा ।।३६।।**

त्याला अन्वयाचे पूर्ण ज्ञान झालेले असते, जे त्याचे संदेह दूर करते. तो सदाच आनंदी असतो. त्याला 'मी शीव आहे' असा नेहमीच अनुभव येत असतो.

**सर्वं ब्रह्मेति दृश्यं तत्पदं चाविनाशकम् ।**
**अप्रमेयं निराकारं ब्रह्मसुखसमुद्भवम् ।।३७।।**

सर्व दृश्य त्याला अविनाशी असे तत्पदरूप (परब्रह्म) दिसते व तो बुध्दीला अगम्य, निराकार अशा मोक्षसुखाचा अनुभव घेतो.

**दृश्ये तु चित्तवृत्तीनां दमनं सर्वसावधम् ।**
**शून्येन युध्यमाना च सा मीनधारणा खलु ।।३८।।**

चित्तवृत्ती ह्या सतत दृश्याकडे धाव घेत असतात, त्यांचे दमन करून, नेहमी सावध राहून शून्याबरोबर झुंजणे याला मीनधारणा असे म्हणतात.

**सर्वं संभाति च ब्रह्म दृश्यभासविवर्जितम् ।**
**जगन्न दृश्यते तेन सुप्रसन्नेन साधुना ।।३९।।**

ज्याचा दृश्याचा भास मावळतो व ज्याला सर्वत्र ब्रह्मच दिसते, त्या आनंदी साधूला जग (वेगळे असे) दिसत नाही.

**एवं च मीनमार्गस्तु सांगश्च कथितो मया ।**
**अयं चैव विवेकाश्रितो वैराग्येण संयुतः ।।४०।।**

हा अशाप्रकारे संपूर्ण मीनमार्ग सांगीतला. याला विवेक व वैराग्य यांची जोड असणे आवश्यक आहे.

**।। इति श्रीसिध्दान्तसंहितायां सोहिराविरचितायां विहंगमीनमार्गसाधनयोगो नाम नवमोऽध्यायः संपूर्णः ।।**

# अध्याय दहावा

## पिपीलिकाकपिमार्गयोगकथन

**अथ पिपीलिकामार्गश्च कथ्यते शृणु सादरम् ।**
**पिपीलिका तु संकल्पस्तत्संगान्मुच्यते नरः ।।१।।**

आता पिपीलिका मार्ग सांगतो, तो लक्षपूर्वक ऐक. पिपीलिका म्हणजे संकल्प. तो योग्य प्रकारे अनुसरला असता माणसाला मोक्ष मिळतो.

**दृश्यासक्तस्तु संकल्पो मोहसंभ्रमसंयुतः ।**
**तेनैव त्वीक्ष्यते ब्रह्म साधुगुर्वनुकंपया ।।२।।**

दृश्य वस्तूशी संकल्पाचा संबंध आला असता (तो) मोह आणि संभ्रमांना कारण होतो. तोच संकल्प साधू आणि गुरूच्या कृपेमुळे ब्रह्मदर्शनाला कारणीभूत होतो.

**यथा घटेषु मृच्चैव पटे तंतुश्च दृश्यते ।**
**निराकारं च संकल्प आकारं चैव पश्यति ।।३।।**

ज्याप्रमाणे घटामध्ये माती असते किंवा वस्त्रांमध्ये तंतू असतो त्याप्रमाणे संकल्पामुळेच त्याला (साधकाला) साकारामध्ये निराकाराचे दर्शन होते.

**विना जलेन नैवास्ति बुद्बुदस्योद्भवः खलुः ।**
**स्वप्नस्य संभवो नैव प्राणिनां निद्रया विना ।।४।।**

पाण्याशिवाय खरोखर बुडबुड्याचा जन्म असू शकत नाही, त्याचप्रमाणे प्राण्यांना

झोपेशिवाय स्वप्न पडू शकत नाही.

**व्योम्ना च भक्ष्यते वायुस्तरंगस्य भ्रमो न वै ।**
**जलवत्स्थिरचित्ते च प्रपंचविभ्रमः कुतः ।।५।।**

आकाशाने वा-याला गिळले असता पाण्यावर लाटांचा भ्रम राहत नाही. त्याचप्रमाणे मन स्थिर झाले असता संसाराचा भ्रम कसा बरे होईल?

**तपनेऽस्तगते रात्र्यां कमलं न विराजते ।**
**आत्मप्राप्ते च संकल्पे द्वैतं नैव विराजते ।।६।।**

रात्री सूर्य अस्ताला गेला असता कमळाची शोभा नष्ट होते त्याचप्रमाणे संकल्पाने आत्म्याचा विषय निश्चित झाला असता द्वैत भावना निर्माण होत नाही.

**एवं मायाहेतुभूतः संकल्पश्च प्रयोजितः ।**
**मूले त्यक्ते च कार्यस्य दृश्यस्य च कथं भ्रमः ।।७।।**

अशाप्रकारे मायेला कारणीभूत होणारा संकल्प असेल आणि तोच नाहीसा झाला म्हणजेच मूळ कारणच नाहीसे झाले तर त्याचे कार्य असलेले जे दृश्य, त्याचा भ्रम कसा बरे राहील?

**ज्ञाने त्वेव प्रदीप्ते च दृश्याऽऽसक्तश्च मा भव ।**
**दृश्यासक्तिस्तु विक्षेपोऽत एव सावधो भव ।।८।।**

ज्ञानाग्नि प्रदीप्त झाल्यानंतर दृश्य वस्तूमध्ये आसक्त होऊ नकोस. दृश्य वस्तूमधील आसक्ती हा एक मोठा अडथळा (विक्षेप) आहे म्हणून तू सावध रहा.

**कज्जलं त्वेव दीपे च नेत्रयोः पटले ध्रुवम् ।**
**तस्करः पथि विक्षेपो गृहे च कलहस्तथा ।।९।।**

काजळ हे दिव्याचा विक्षेप आहे, डोळ्यांना पटल हा विक्षेप आहे. रस्त्यामध्ये चोर हा (वाटसरूला) विक्षेप आहे आणि घरामध्ये भांडण हा विक्षेप आहे.

**अर्थेच्छा चैव मित्रेषु शत्रौ विक्षेपकं हितम् ।**
**दाने विक्षेपको लोभः सुखे कार्पण्यमेव हि ।।१०।।**

मैत्रीमध्ये धनाची अपेक्षा करणे, शत्रूच्या बाबतीत त्याचे कल्याण चिंतणे, दानामध्ये लोभ आणि सुखाला कंजुषपणा, हे विक्षेप आहेत.

**धिरे तु भ्रांतिविक्षेपः शुरे मोहस्तथैव हि ।**
**रत्यां नपुंसकत्वं च ज्ञानेऽविद्या तथैव च ।।११।।**

धिराला भ्रम, शूराला मोह, रतीला नपुंसकत्व आणि ज्ञानाला अविद्या हे विक्षेप आहेत

**मेघे विक्षेपको वायुः क्षुधायामरुचिः खलु ।**
**विक्षेपकमसत्सत्ये धान्येषु कीटकास्तथा ।।१२।।**

ढगाला वारा, भुकेला अरुची, सत्याला असत्य, धान्याला अळी हे विक्षेप आहेत.

**साधुषु मूढसंगश्च विद्वत्सु कृषिकर्म च ।**
**स्त्रीत्वं तु ब्रह्मचर्ये चाविवेको ज्ञानिनां तथा ।।१३।।**

साधूंना मूर्खाची संगती, विद्वानाला शेती, ब्रह्मचा-याला स्त्री व ज्ञानी माणसाला अविवेक हे विक्षेप आहेत.

**ब्रह्मबोधे तु तद्वच्चाविद्या विक्षेपिका खलु ।**
**सदभ्यासेन सा नश्येत् दृश्यभासोऽसदेव हि ।।१४।।**

त्याचप्रमाणे ब्रह्मज्ञानाला अविद्या हा विक्षेप आहे. ब्रह्मज्ञानाचा अभ्यास केला असता ती (अविद्या) नाहीशी होते; सर्व भासणा-या वस्तू या खरोखर नाहीच आहेत.

**साम्येन संयुतं ज्ञानं सर्वावस्थासु निश्चलम् ।**
**एवं पिपीलिकामार्गं सच्छिष्यो वेत्ति वै क्वचित् ।।१५।।**

ज्ञान हे समतेने युक्त असलेले आणि सर्व अवस्थांत स्थिर असलेले असे आहे. अशा प्रकारचा पिपीलिका मार्ग एखादाच सच्छिष्य समजू शकतो.

**अथातः कपिमार्गश्च षट्चक्रभेदकः खलु ।**
**वज्रासनयुतः शुध्दः कथ्यते साधनप्रियः ।।१६।।**

यानंतर सहाही चक्रांचा भेद करणारा कपिमार्ग आहे. या मार्गामध्ये वज्रासन आवश्यक असते आणि ते उत्तम व शुद्ध साधन आहे, असे साधनप्रेमी लोक सांगतात.

**अंगुष्ठेनापिधानोऽपि गुदस्थः पवनस्तु वै ।**
**चतुर्दलादूर्ध्वगतः प्रयाति षड्दलं शनैः ।।१७।।**

गुदाच्या ठिकाणी असणा-या वायूला (पायाचा) अंगठा लावून ते बंद केले असता तो चतुर्दल (मूलाधार) चक्रातून वर जाऊन हळूहळू षट्दल (स्वाधिष्ठान) चक्राकडे जातो.

**शबलं तत्र संहृत्य चापान उत्थितः स वै ।**
**तेनैव चालितं कुंडं तच्च मेदादि भक्षकम् ।।१८।।**

वायू तो शबलाचा संहार करतो आणि तेथून अपानवायू वर उठतो. तो कुंडलिनीचे चालन करून मेद, मांस इत्यादी खाऊ लागतो.

**त्रिदोषान्सप्तधातूंश्च सर्वान्व्याधींश्च कुंडली ।**
**भक्षयते च निःशेषं वाय्वादिभेदशून्यका ।।१९।।**

ती कुंडलिनी (कफ, वात व पित्त हे) तिन्ही दोष, सात धातू, (शरीराच्या) सर्व व्याधि संपूर्णपणे खाऊन टाकते आणि वायूंचे सर्व भेदही ती नाहीसे करते.

**नाभौ दशदलं प्रोक्तं दशमातृकया युतम् ।**
**द्वादशदलमेवैकं हृदि द्वादशमातृकम् ।।२०।।**

नाभीस्थानाच्या ठिकाणी दहा मातृकांनी युक्त असलेले दशदल (मणिपूर) चक्र आहे. हृदयामध्ये बारा मातृका असलेले बारा दल (अनाहत) असे एक चक्र आहे.

**षोडशदलमेवं तु कंठे षोडशमातृकम् ।**
**द्विमातृकं द्विपत्रं च सहस्त्राख्यं ततः परम् ।।२१।।**

कंठामध्यें सोळा मातृकांचे व सोळा दले असलेले (विशुद्ध) चक्र आहे. त्यानंतर दोन मातृका असलेले व दोन दले असलेले (आज्ञा) चक्र आहे, त्याच्याही नंतर सहस्त्रदले असलेले चक्र आहे.

**एवं तु कपिमार्गोऽयं षट्चक्रभेदकः खलु ।**
**तत्समाधौ च सौख्यं वै भुंजंति साधवो ननु ।।२२।।**

अशा प्रकारे हा सहा चक्रभेद करणारा कपिमार्ग आहे, तो सिद्ध झाला असता साधुलोक समाधिचे सुख भोगतात.

**पंचमः शेषमार्गोऽयं सदैवं वायुभक्षकाः ।**
**पश्यत्यलिप्तमात्मानं दीप्तोऽनुहतनादगः ।।२३।।**

पाचवा शेषमार्ग आहे. या मार्गामध्ये नेहमीच वायू भक्षण करून प्रकाशमान अवस्थेमध्ये व अनाहत नादामध्ये राहून साधू स्वतःला अत्यंत अलिप्त स्थितीमध्ये पाहतो.

**यत्र यांति दिशश्चांतः सच्चिदानंदविग्रहम् ।**
**अद्वयं हृद्गतं ध्याति शाश्वतं पदमव्यम् ।।२४।।**

या अवस्थेमध्ये दिशांचा अंत होतो व चिरंतन, नाश न पावणारे, द्वैत नसणारे, हृदयामध्ये असणारे, असे जे शाश्वत सच्चिदानंदस्वरूप त्याचे तो ध्यान करतो.

**सदानंदं जगद्वंद्यं जगज्जीवनसज्जनम् ।**
**ज्ञाननिर्धूतदोषं तं स्मृत्या तु भवनाशकम् ।।२५।।**

ते परमेश्वराचे स्वरूप अतिशय आनंदरूप असून जगाला वंदनीय आहे. ते सर्व सज्जनांना जीवन देणारे आहे. ते ज्ञानामुळे सर्व दोष नाहीसे करणारे आहे, त्याचे स्मरणसुध्दा संसाराचा नाश करणारे आहे.

**अप्रमेयपारं च सद्गतिदं तु हृत्स्थितम् ।**
**स्वप्रकाशं परं ब्रह्म निर्गुणं भगवन्निदम् ।।२६।।**

ज्याचा पार कोणालाही समजणे शक्य नाही, जो हृदयामध्ये राहून सद्गती देणारा आहे, जो स्वयंप्रकाश आहे, जो निर्गुण परब्रह्म आहे, तोच भगवान आहे.

**विश्वातीतं हृषीकेशमच्युतं श्रीजनार्दनम् ।**
**जगन्नाथं जगद्बंधुं सत्तारकस्वभावजम् ।।२७।।**

सर्व विश्वाच्या पलीकडे असलेला अच्युत, जनार्दन, हृषीकेश, जगन्नाथ, सर्व जगाचा बंधू, सज्जनांचे तारण करण्याचा ज्याचा स्वभाव आहे, अशा भगवंताचे तो ध्यान करतो.

**नारायणं च पूर्णं वै परमात्मानमव्ययम् ।**
**ध्यायंति साधकाः सर्वे व्यापकं श्रीधरं च ते ।।२८।।**

ते साधक, अविनाशी पूर्ण परमात्मा असा जो व्यापक लक्ष्मीधर नारायण, त्याचे ध्यान करीत असतात.

**।। इति श्रीसिध्दान्तसंहितायां सोहिराविरचितायां पिपीलिकाकपिमार्गयोगकथनं नाम दशमोऽध्यायः संपूर्णः ।।**

# अध्याय अकरावा

## षष्ठावतारतत्त्वकथन

**संरक्षणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।**
**भगवतोऽवतारास्तु देहे दृश्यंते साधुभिः ।।१।।**

सज्जनांच्या संरक्षणासाठी व दुर्जनांच्या नाशासाठी भगवंताचे जे अवतार होतात, ते साधूना (आपल्या) देहात दिसतात.

**आत्मज्ञानं तु वेदाश्च पिंडोभूर्भवसागरः ।**
**शंखो देहाभिमानस्तु मत्स्यः सोऽहं मनस्तथा ।।२।।**

सोऽहं भाव हा मत्स्य आहे आणि 'तो मी आहे' ही मनाची अवस्था हा (पहिला) मत्स्यावतार आहे, यात आत्मस्वरूप जाणणे यालाच वेद असे नांव आहे, पृथ्वी हा पिंड आहे, संसार हा समुद्र आहे व देहाभिमान हा शंखासुर आहे.

**सोऽहं मनोऽभिमानं तु हत्वा प्रारब्धशेषकम् ।**
**तच्छवज्ञानतीर्थेन साधुः स्नाति च नित्यशः ।।३।।**

तो सोऽहंमत्स्य देहाभिमानाला, शेष प्रारब्धला मारून टाकतो. (म्हणजे शंखासुराचा नाश करून) साधुलोक त्याच्या शरीराच्या तीर्थामध्ये (म्हणजेच ज्ञानतीर्थामध्ये) नेहमी स्नान करतात.

**क्षमारूपा क्षितिः प्रोक्ता विषमा वृत्तयोऽसुराः ।**
**ताभिश्चला क्षमा त्वेव विवेकेन स्थिरीकृता ।।४।।**

(दुस-या अवतारात) क्षमा ही पृथ्वी असून, चंचलवृत्ती म्हणजे असुर आहेत. त्यांनी अशांत केलेल्या क्षमेला (पृथ्वीला) विवेकाने (साधुलोक) स्थिर करतात.

**तस्माद्विवेककूर्मोऽसौ धारयति क्षमाक्षितिम् ।**
**प्रसराऽऽकुंचनारूपः कूर्मो विवेकवत्खलु ।।५।।**

म्हणून विवेकरूपी कासव, क्षमारूपी पृथ्वीचे धारण करीत असते. हे प्रसरण आणि आकुंचन करणारे कासव विवेकासारखेच असते.

**धनलोभो हिरण्याक्षो धृतिरूपा क्षितिस्तथा ।**
**निःसंगस्तु वराहो वै धनतृष्णां निहंति सः ।।६।।**

(तिस-या अवतारात) धनाचा लोभ म्हणजेच हिरण्याक्ष राक्षस आहे. धैर्य हीच पृथ्वी आहे, अनासक्ती हा वराह आहे. या अनासक्तीमुळेच धनाची इच्छा नष्ट होते.

**हिरण्याक्षस्तु वा कामो परदारेषु यश्चवै ।**
**तं हत्वा त्वेव निष्कामो धृतिं करोति सुस्थिराम् ।।७।।**

(अथवा) परस्त्रियांची इच्छा हाच खरोखर हिरण्याक्ष आहे. निष्कामता प्राप्त झालेला (योगी), त्या हिरण्याक्ष राक्षसाला ठार करून आपले धैर्य दृढ करतो.

**दैत्या देहाभिमानस्तु हिरण्यकशिपुस्तथा ।**
**प्रल्हादं त्वेव सद्भावं पीडयति सदैव हि ।।८।।**

(चवथ्या अवतारात) देहाभिमान हेच हिरण्यकशिपू वगैरे राक्षस आहेत. ते नेहमीच सद्भावरूपी प्रल्हादाला छळत असतात.

**दृश्यवादौ विरोधस्तु हरिस्मरणनिंदकः ।**
**आसुर्याः संपदोंऽशस्तु ज्ञात्वा द्वेष्ट्यजमेव हि ।।९।।**

हरिस्मरणाची निंदा करणे, दृश्याबद्दल आसक्ती असणे, वादविवाद, भांडण करणे, हे सर्व

आसुरी संपत्तीचे अंश आहेत. ते जाणूनही (हे असुर) परमेश्वराचे शत्रुत्व करीत असतात.

**स्थूलदेहस्तु स्तंभोऽयं नरत्वं च हरत्यतः ।**
**नृहरिरात्मबोधस्तु प्रकटश्चाभिमानहृत् ।।१०।।**

हे स्थूलशरीर हाच खांब आहे. आत्मज्ञान हाच नरसिंह आहे, तो अभिमान नाहीसा करण्यासाठी प्रकट होतो. नराचे नरत्व हरण करून (तो त्याला विदेहावस्था प्राप्त करून देतो म्हणून) त्याला नृहरि असे नांव पडले आहे.

**शब्दब्रह्म तु वैराग्यं बोधस्यापि च तर्जनम् ।**
**सद्भावरक्षको बोधो देहबुध्दिं च हंति वै ।।११।।**

शब्दब्रह्म (वेद ही नृसिंहाची गर्जना) म्हणजे वैराग्य आहे. त्याची दटावणी म्हणजेच बोध आहे. सद्भावरूपी (प्रल्हादाचे) रक्षण करणारा बोध म्हणजेच ज्ञान, हे देहबुध्दीला मारून टाकते.

**न दिने नैव रात्रौ च न च बहिर्न वै गृहे ।**
**नोर्ध्वमधस्तु संधौ चावि,ये हृद्गतं हृतम् ।।१२।।**

दिवसाही नाही आणि रात्रीही नाही, घरातही नाही आणि बाहेरही नाही, वरही नाही आणि खालीही नाही अशा संधीमध्ये निर्विषरूपी नखांनी हृदयामध्ये असलेल्या अभिमानरूपी राक्षकाला त्याने ठार मारले.

**चतुर्थश्चावतारोऽयं जीवबुध्दिविनाशकः ।**
**दानवमदहंता वै कथितश्चात्मबोधकः ।।१३।।**

देहाभिमान नाहीसा करणारा (नृसिंह हा) चवथा अवतार आहे. हा आत्मज्ञान करून देणारा आणि दानवांचा गर्व नाहीसा करणारा आहे.

**पंचमो वामनश्चायमात्मरूपः प्रकिर्तितः ।**
**बलिः सकामजीवस्तु कर्मयज्ञफलप्रदः ।।१४।।**

पाचवा वामनावतार हा प्रत्यक्ष आत्मरूपी असून तो कर्मरूपी यज्ञाचे फल देणारा आहे. (या अवतारात) बळी हा कामना असणारा जीव आहे.

**नर्मदाऽविषयत्वं वै भूमिर्देहचतुष्टया ।**
**भक्त्या च बलिजीवेन दत्तमात्मनिवेदनम् ।।१५।।**

नर्मदा म्हणजे विषय (मद) नष्ट करणे आहे. भूमी म्हणजे चार देह आहेत. बलीरूपी जीवाने भक्तीने केलेले आत्मनिवेदन म्हणजे दान दिलेली (तीन पावले भूमी) आहे.

**त्रिमातृकं पदत्रयं तद्व्याप्तं स्थूलसूक्ष्मकम् ।**
**तच्चराचरद्वैतं नष्टमात्मतया खलु ।।१६।।**

स्थूल व सूक्ष्म अशा तिन्ही मातृका (अ, उ, म) वामनाने तीन पावलांनी व्यापून टाकल्या, त्या वेळी (जीवाचे) चर, अचर, इत्यादी सर्व द्वैत समूळ नष्ट झाले.

**अंगुष्ठस्त्वर्धमात्रा वै तत्स्पर्शाज्जीवनिपातनं ।**
**अनुभवेन तस्यास्तु जीव आनंदरूपकः ।।१७।।**

अंगुष्ठ ही (ओंकाराची) अर्धमात्रा आहे, त्याच्या स्पर्शाने जीवदशा नष्ट होते. हा अनुभव

आल्यानंतरच जीवाला आनंदरूपाची प्राप्ती होते.

**विराट्पदं तु देहश्च तृप्तिस्तु प्रभुता चिरम् ।**
**पातालेऽत्र बलिस्तेन जीवन्मुक्तश्च नंदते ।।१८।।**

नंतर त्याला (बळीला) विराटदेहाचा पाय (म्हणजे पातळ), याचे स्वामित्व चिरकाल मिळते आणि आनंद प्राप्त होतो. असा हा बळी म्हणजेच जीवन्मुक्त, पाताळामध्ये आनंदाने राहतो.

**साम्राज्यं तु वैराग्यं परमार्थस्तु तद्बलम् ।**
**एवं सायुज्यमापन्नः श्रध्दा भावार्थवत्सलः ।।१९।।**

त्याचे (जीवन्मुक्ताचे) साम्राज्य म्हणजेच वैराग्य आहे. त्याचे सैन्यबल म्हणजे परमार्थ आहे. अशा प्रकारे श्रध्दा आणि दृढभाव असलेला साधू सायुज्य पदवीला प्राप्त होतो.

**सर्वतो ब्रह्मभावस्तु तद्द्वाःस्थमजरूपकम् ।**
**एवं वामनसादृश्यमात्मबोधस्वरूपकम् ।।२०।।**

सर्व प्रकारे ब्रह्मभाव होणे म्हणजेच त्या (बळीचा) द्वारपाल म्हणून राहणे आहे. अशा प्रकारे आत्मज्ञानाचे व वामनावताराचे साम्य आहे.

**वैराग्येण विवेकस्तु जमदग्निश्च कथ्यते ।**
**बोधरामश्च हंति त्वविद्यां वै स्वमातरम् ।।२१।।**

(सहावा परशुराम अवतार आहे यात) वैराग्यामुळे प्राप्त झालेल्या विवेकाला जमदग्नी असे म्हणतात. (त्याच्या सांगण्यावरून) ज्ञानरूपी परशुराम अविद्यारूपी आपल्या मातेला मारतो.

**संजाता सैव शुध्दाऽसौ विरक्तिः सैव कथ्यते ।**
**क्षत्रमोहो जगज्ज्ञानं कामसंघोऽर्जूनस्तथा ।।२२।।**

ती (अविद्यारूपी रेणुका) शुद्ध झाली. तिलाच वैराग्य ही संज्ञा आहे. जगाचे (भ्रामक) ज्ञान म्हणजे क्षत्रियांना झालेला मोह असून इच्छांचा समुदाय म्हणजे सहस्त्रार्जुन आहे.

**जडं भूः शबलं यत्र पुनः पुनश्च नाशितम् ।**
**ब्रह्मविदस्तु विप्राश्च सोऽहं भावस्तपः खलु ।।२३।।**

पुनः पुन्हा नष्ट केलेले शबलत्व म्हणजे जड पृथ्वी आहे. ब्रह्मवेत्ते म्हणजेच ब्राह्मण आहेत आणि सोऽहं भाव म्हणजेच तपश्चर्या आहे.

**। इति श्रीसिध्दान्तसंहितायां सोहिराविरचितायां षष्टावतारतत्त्वकथनं नामैकादशोऽध्यायः संपूर्णः ।।**

# अध्याय बारावा

## ज्ञानस्वरूप-श्रीरामावतारकथन

**दशरथस्तु जीवात्माऽऽत्मा तु रामश्च कीर्तितः ।**
**सद्बुध्दिस्त्वेव सीता स्यात्सूर्यान्वयस्तु चिद्भवः ।।१।।**

(सातवा रामावतार आहे यात) दशरथ हा जीवात्मा आहे. राम हा परमात्मा आहे. सद्‌बुध्दी ही सीता आहे आणि चैतन्य हा सूर्यवंश आहे.

**अविद्या त्वत्र कैकेयी वनं वैराग्यमेव च ।**
**सोऽहंबोधेन संतृप्तो विवेको लक्ष्मणस्तु वै ।।२।।**

तेथे अविद्या हीच कैकयी आहे. वैराग्य हे वन आहे आणि सोऽहं ज्ञानाने तृप्त झालेला विवेक म्हणजे लक्ष्मण आहे.

**क्रोशी तु भृंगगुंफा वै कुटी सप्तदशी तथा ।**
**विवेकरक्षिता बुध्दिरेषौटपीठमेव हि ।।३।।**

पंचक्रोशी ही भृंगगुंफा आहे आणि सत्रावी म्हणजे कुटी आहे. विवेकाने रक्षण केलेली बुध्दी हेच औटपीठ आहे.

**कोऽहं तु मृगमारीचो सद्‌बुध्दिभ्रांतिदः खलु ।**
**तेव मूढा तु सद्‌बुध्दिर्मिथ्यामोहनसंयुताः ।।४।।**

कोऽहं (मी कोण हा भ्रम) म्हणजेच मारीच हरीण आहे. तोच सद्‌बुध्दीला फसविणारा आहे. त्याने फसवलेली सद्‌बुध्दीच खोट्या मोहाला वश होते.

**सद्‌बुध्दिः कामसंयुक्ता तदाऽऽत्मा जीवरूपकः ।**
**मनस्तु विषयासक्तं जीवस्तदनु गच्छति ।।५।।**

सद्‌बुध्दी ज्या वेळी इच्छेने कामनेशी एकरूप होते, त्यावेळी परमात्मा जीवरूपात परिवर्तित होतो. मन हे विषयासक्त असल्यामुळे जीव हा त्याच्या मागून जातो.

**हीनबलो विवेकस्तु जीवः कर्मानुगः खलु ।**
**दृष्टा च मृगरूपं तु शबलं मोहकारकम् ।।६।।**

ते विचित्र (शबल) मोह करणारे असे हरीण पाहिल्यानंतर पूर्वकर्मानुसार जाणारा जीव दुर्बळ व विवेकशून्य होतो.

**मायामोहेन च भ्रांतो जीवोऽविवेकसंयुक्तः ।**
**बुध्दिभ्रमश्च वै जातो हरिहरगतिर्यथा ।।७।।**

अविचाराने संयुक्त झालेला जीव मायेच्या मोहाने फसतो आणि विष्णू (राम) आणि शंकराप्रमाणे जीवाचाही बुध्दिभ्रंश होतो.

**मायावृद्धस्तु संन्यासी देहाभिमानरावणः ।**
**हर्तुं तु भ्रांतसद्‌बुध्दिं गुंफां विशेच्च सोऽपि हि ।।८।।**

नंतर देहाभिमानरूपी रावण आपल्या मायेने वृद्धसंन्याशाचे रूप घेऊन त्या भ्रष्ट झालेल्या सद्‌बुध्दीला पळवून नेण्याकरिता गुंफेमध्ये प्रवेश करतो.

**शब्दज्ञाने तु सद्‌बुध्दिः सात्त्विका जानकी तथा ।**
**सोल्लंघयतिदानार्थं रेषां विस्मृत्य वै पुनः ।।९।।**

सात्त्विक असलेली जानकी जशी दानाकरिता (लक्ष्मण-)रेषा ओलांडून जाते तशीच सद्‌बुध्दी केवळ शब्दज्ञान झाले असता मर्यादा ओलांडून जाते.

**सद्‌बुध्दिमभिमानश्च वशीकर्तुमचोरयत् ।**
**तथैव वायसोऽपात्रः सुमुक्तं सुंदरं तथा ।।१०।।**

ज्याप्रमाणे एखाद्या नालायक कावळ्याने एखादे सुंदर मोती चोरावे त्याप्रमाणे अभिमानाने (रावणाने) सद्बुध्दीला (सीतेला) आपल्याला वश करण्यासाठी चोरले.

**भावार्थं तु जटायुं वै हीनं ज्ञानेन सर्वदा ।**
**आर्तं च तं तु हंति सोऽप्यभिमानस्तमोयुतः ।।११।।**

ज्ञानहीन भावार्थ म्हणजेच जटायु आहे. अतिशय आर्त असलेल्या त्याला तमोगुणाने युक्त असलेल्या अभिमानाने मारून टाकले.

**भक्तिरूपौ तु पक्षौ वै भावार्थस्य दृढौ खलु ।**
**कापट्यवचसा शीघ्रमभिमानेन तौ हतौ ।।१२।।**

दृढ भावार्थाचे दोन भक्तिरूपी पंख अभिमानाने (आपल्या) कपटी बोलण्याच्या साहाय्याने लगेच तोडून टाकले.

**सागरे कल्पनामोहे लंका त्वष्टदलद्विपम् ।**
**सद्बुध्दिं तत्र वै मनः संस्थापयति निर्भये ।।१३।।**

कल्पनारूपी घोरसमुद्रामध्ये लंका हे अष्टदल बेट आहे. निर्भय अशा त्या बेटामध्ये मन सद्बुध्दीला नेऊन ठेवते.

**सद्बुध्द्ध्याश्च वियोगेन जीवात्मा दुःखसंयुतः ।**
**तौ तु विवेकजीवौ च संन्यासिनौ विना तया ।।१४।।**

सद्बुध्दीच्या वियोगामुळे जीवात्म्याला दुःख भोगावे लागते. ती नसल्यामुळेच विवेक आणि जीव हे संन्याशासारखे बनतात.

**अंजनरूपकस्त्वत्र हनुमांश्च बली पुमान् ।**
**सद्बुध्दिमार्गणः प्राप्तो जीवविवेकसन्निधौ ।।१५।।**

आत्माभ्यासरूपी (अंजनरूप) सामर्थ्यवान पुरुष म्हणजे हनुमान आहे. तो सद्बुध्दीच्या शोधासाठी जीव आणि विवेक यांच्या जवळ येऊन पोहोचला.

**आत्मरूपं तु जीवं वै हनुमान्नमति स्वयम् ।**
**जीवस्यांजनलाभेन समाधानं च जायते ।।१६।।**

आत्मज्ञानस्वरूपी जीवाला स्वतः हनुमान नमस्कार करतो. अंजनाच्या लाभाने (म्हणजेच आत्माभ्यासाच्या लाभाने) जीवाला समाधान होते.

**साह्यभूतश्च सुग्रीवो निष्कामपूर्वसत्कृतम् ।**
**सकामस्तु भ्रमो वालिस्तारा निष्कामसत्कला ।।१७।।**

रामाला मदत करणारा सुग्रीव म्हणजे पूर्वजन्मामध्ये केलेले निष्कामकर्म होय. वाली म्हणजे कामनेने निर्माण झालेला भ्रम असून तारा ही निष्काम सत्कला आहे.

**धारणा योगमार्गश्च कपयो बहबः खलु ।**
**त्रैलोक्यं तु त्रयो देहाः षट्चक्रभुवनानि वै ।।१८।।**

पुष्कळ वानरांचे सैन्य म्हणजे अनेक धारणा असलेला योगमार्ग आहे. त्रैलोक्य म्हणजे तीन प्रकारचे देह असून षट्चक्रे ही भुवने आहेत.

**दृष्टत्वलक्षसंपातिर्जिज्ञास्वंजनसंयुतम् ।**
**शोको न विद्यते यत्राऽशोकं तद्वनसंज्ञितम् ।।१९।।**

दृष्टीवर लक्ष ठेवणारा जिज्ञासू, जो आत्मज्ञानयुक्त आहे, तो म्हणजेच संपाती पक्षी आहे. त्याने (मारुतीला) जेथे सीतेला ठेवले होते त्या वनाची म्हणजे ज्या वनामध्ये शोक नाही, त्या अशोक वनाची माहिती दिली.

**संकेतखेचरीं मुद्रां त्वात्मचिंतनतत्पराम् ।**
**बुध्दिप्राप्तां तु रामाय मरुत्पुत्रा न्यवेदयन् ।।२०।।**

वायुपुत्राने (मारुतीने) आत्मचिंतनामध्ये तत्पर असलेल्या बुध्दीला खेचरीमुद्रा दाखवून (आपली ओळख पटविली आणि) ती सद्बुध्दी मिळाली असे रामाला सांगितले.

**शिलास्त्वत्र जडत्वं च सेतुः षट्चक्रभेदनम् ।**
**अभिमानभयाच्चैव व्यवर्ध्दतभवश्च वै ।।२१।।**

येथे जडता म्हणजे शिला आहे, षट्चक्राचे भेदन करणे हाच सेतू आहे. भवसमुद्र खरोखर अभिमानाच्या (रावणाच्या) भीतीने वाढला.

**योगस्य साधनारंभे कामाद्याः शबलभ्रमाः ।**
**स्वनाशस्य भयाच्चैते विवर्ध्दते स्वभावतः ।।२२।।**

योगसाधनेला आरंभ केल्यानंतर काम, क्रोध, इत्यादींनी निर्माण केलेले निरनिराळे भ्रम आपला आता नाश होईल या भीतीने स्वाभाविकपणे वाढू लागतात.

**रामक्रोधस्तु वैराग्यं हठयोगधृतिः शरः ।**
**त्यागस्त्वत्र व्यतिरेको रत्नानि तु चिदन्वयः ।।२३।।**

(या ठिकाणी) रामाला आलेला राग म्हणजेच वैराग्य आहे. हठयोगाचा अभ्यास म्हणजेच बाण आहे. त्याग हाच व्यतिरेक आणि चैतन्याशी संबंध हीच रत्ने आहेत.

**ब्रह्मसायुज्यरूपं तु विप्ररूपोऽत्र सागरः ।**
**भक्तिर्नवविधा त्वत्र चिद्रत्नानां च चित्कला ।।२४।।**

समुद्र ब्राह्मणरूप धारण करता झाला म्हणजेच (जीवाला) ब्रह्माची सायुज्य प्राप्ती झाली. नऊ प्रकारची भक्ती म्हणजेच चिद्रत्नामधिल चैतन्यकला आहे.

**यथा जलेऽतरंस्त्वेव पाषाणाश्च तथा भवे ।**
**निदिध्यासेन जीवस्तु तरति च सदैव हि ।।२५।।**

पाण्यावर ज्याप्रमाणे पाषाण तरले, त्याप्रमाणे निदिध्यासाच्या साहाय्याने भवसागरामध्ये जीव तरून जातो.

**त्रिकूटं तु सुवेलैव चोपदेशोंऽगदः खलु ।**
**अविचाराभिमानस्य स्थूलदृक् चात्र मंडपः ।।२६।।**

सुवेला पर्वत म्हणजेच त्रिकूट आहे. उपदेश म्हणजेच अंगद आहे. स्थूलदृष्टी अविचार आणि अभिमान हा तेथे (रावणाच्या सभेचा) मंडप आहे.

**सात्त्विकासुरयोर्युध्दं लिंगदेहेऽभवत्खलु ।**
**मोहाद्यासुरसैन्यं वै वैराग्यादि च सात्त्विकम् ।।२७।।**

लिंगदेहरूपी लंकेमध्ये दैवीशक्ती आणि आसुरी संपत्ती यांचे युद्ध झाले. मोह, काम,क्रोध वगैरे हे असुरसैन्य होते व वैराग्य इत्यादी हे दैवीसंपत्तीचे सैन्य होते.

**तत्रासुरं पराभूतं विजितं सात्त्विकेन वै ।**
**विरमे स्थिरतां याति सात्त्विकस्य जयश्च हि ।।२८।।**

तेथे सात्त्विक (दैवी) संपत्तीने असुरांच्या सैन्याचा पराभव केला आणि त्या संपत्तीचा विजय झाला. हे युद्ध संपल्यावर स्थैर्य प्राप्त झाले.

**अभिमानस्य पुत्रास्तु विकाराः कल्पजाः खलु ।**
**शुध्दांशैःसह युध्यन्ते शबलांशाः सदैव हि ।।२९।।**

सर्व विकार म्हणजे खरोखर अभिमानाचे पुत्र असून ते संकल्पापासून निर्माण झालेले आहेत. ते शबलांश नेहमी शुध्दांशाबरोबरयुद्ध करीत असतात.

**निर्जिताः शबलांशाश्च शुध्दांशैश्चाखिलास्तु वै ।**
**अभिमानस्तु शेषोऽयं भ्रमोऽजिंक्यो महाबली ।।३०।।**

त्या युध्दामध्ये सर्व शबलांशांना शुध्दांश जिंकून टाकतात. अभिमान हा जो भ्रम आहे, तो एकच अतिशय बलवान व अजिंक्य असून तो मात्र (शेवटी) शिल्लक राहतो.

**हृस्थं चामृतं चैव विक्षेपावृत्तिसंज्ञितम् ।**
**तन्नाशादभिमानस्य न पुनरुद्‌भवः खलु ।।३१।।**

हृदयामध्ये अमृतस्वरूपात असलेल्या आवरण आणि विक्षेप ह्या वृत्तींचा नाश केल्याने अभिमान नष्ट होऊन त्याची पुनरुत्पत्ती होत नाही.

**देहभ्रमश्च नाशात्तु कोऽहं च सोऽहमन्वितः ।**
**सा वै सायुज्यमुक्तिस्त्वैक्यता जीवेशयोः खलु ।।३२।।**

देहभ्रमाचा नाश झाल्यानंतर कोऽहं आणि सोऽहं दोन्ही एक होतात. हीच सायुज्यमुक्ती आहे. या मुक्तीमध्ये जीव आणि ईश्वर यांचे ऐक्य होते.

**मेघनादस्तु वीरो वै मूढवृत्तिः करक्रिया ।**
**नागपाशा ममत्वं च यज्ञः सकामकर्म तु ।।३३।।**

मूर्खासारख्या हातांच्या क्रिया (मूर्खपणाने जगणे) म्हणजेच मेघनाद हा वीर आहे. ममता म्हणजेच नागाचे पाश आहेत आणि सकाम कर्म करणे हा यज्ञ आहे.

**देहभ्रमस्य निःपातो व्यतिरेकः प्रकीर्तितः ।**
**बिभीषणस्तु सद्‌भावो लिंगान्वितोऽन्वयः खलु ।।३४।।**

देहभ्रम नाहीसा करणे म्हणजेच व्यतिरेक आहे. बिभीषण म्हणजे सद्‌भाव आहे, त्याला लंकेमध्ये स्थापन करणे म्हणजेच अन्वय सिद्ध करणे आहे.

**ज्ञानानंदः सुषेणो हि प्रबोधस्तु महौषधम् ।**
**सैन्यमृतिस्तु मिथ्या वै प्रबोधेन तु सर्वदा ।।३५।।**

सुषेण हा ज्ञानानंद असून प्रबोध ही महौषधि आहे. या महौषधामुळे सैन्याचे मरणे मिथ्या होते.

**महाशून्यं तु क्षीराब्धिर्द्रोणगिरिस्त्रिकूटकम् ।**
**तद्‌ब्रह्मरंध्रशीर्षं वै गुरुसिध्दान्त औषधम् ।।३६।।**

क्षीरसमुद्र हे महाशून्य असून द्रोणाचल हा त्रिकूट आहे, त्याचे शिखर म्हणजे ब्रह्मरंध्र आहे

आणि गुरुसिध्दान्त हेच औषध आहे.

**चतुर्देहांतरं यत्र चतुष्कोटिश्च संज्ञितम् ।**
**तत्पारं गंतुमेवात्र श्रेष्ठा तु कपिधारणा ।।३७।।**

चार कोटी योजनांचे अंतर म्हणजे चार देहांचे अंतर आहे. त्याच्या पलीकडे जाण्याकरिता कपिमार्ग हाच सर्वश्रेष्ठ मार्ग आहे.

**धारणासु च सर्वासु कपिमार्गो महाबलः ।**
**वासनानाशकर्ता च ब्रह्मरंध्रप्रवेशकः ।।३८।।**

सर्व धारणामध्ये कपिमार्ग हाच सर्वश्रेष्ठ आहे, तो वासनांचा नाश करणारा असून ब्रह्मरंध्रामध्ये प्रवेश करून देणारा आहे.

**आत्मज्ञानं हि विभ्रांतऽमनुसंधानमौषधम् ।**
**व्यतिरेकान्वयाभ्यां च भवरोगविनाशकम् ।।३९।।**

कोणत्याही भ्रमाशिवाय असलेल्या आत्मतत्त्वाचे अनुसंधान हेच व्यतिरेक आणि अन्वय यांच्या साहाय्याने भवरोगाचा नाश करणारे औषध आहे.

**संजीवन्यत्र प्राप्ता तु देहातीता हि धारणा ।**
**अमृतेन मृतिप्राप्ताः सद्‌भावास्तु तयोत्थिताः ।।४०।।**

देहातीत अशी धारणा प्राप्त होणे हीच येथे संजीवनी आहे. हे अमृत घातले असता मेलेला सद्‌भाव पुनः जिवंत होतो.

**अतीतस्त्यागभोगाभ्यां वीतरागश्च जायते ।**
**एवमद्वैतबोधेन रामस्तु ब्रह्म चाखिलम् ।।४१।।**

त्याग आणि भोग यांच्याही पलीकडे गेले असता वैराग्य प्राप्त होते. अशा प्रकारे अद्वैतज्ञान झाल्यामुळे राम हा ब्रह्मरूप झाला.

**आत्मनश्चरितं सर्वं भगवता च दर्शितम् ।**
**एवं रामावतारस्तु लोकानां ज्ञानदः खलु ।।४२।।**

भगवंताने अशा प्रकारे आत्म्याचे सर्व चरित्र येथे दाखविले आहे. असा हा रामावतार लोकांना खरोखर ज्ञान प्राप्त करून देणारा आहे.

**। इति श्रीसिध्दान्तसंहितायां सोहिराविरचितायां ज्ञानस्वरूप-श्रीरामावतारकथनं नाम द्वादशोऽध्यायः संपूर्णः ।।**

# अध्याय तेरावा

## ज्ञानस्वरूप-श्रीकृष्णावतारकथन

**विष्णुस्तु व्यापकोऽनंतो वैकुंठनायको हरिः ।**
**अवतारद्यदोर्वंशे कृष्णनामा स्वमायया ।।१।।**

व्यापक व अनंत असणारा वैकुंठाचा स्वामी, विष्णुरूपी अशा हरिने यदूच्या वंशामध्ये आपल्या मायेच्या साहाय्याने कृष्ण या नावाचा अवतार घेतला.

**दुष्कर्माणं तु कंसं वै तथान्यान्दुष्टदानवान् ।**
**हंतुं समभवदात्मा धर्मसंस्थापनाय वै ।।२।।**

अतिशय दुराचारी अशा कंसाला तसेच इतर दुष्ट राक्षसांना मारण्यासाठी आणि धर्माची स्थापना करण्यासाठी भगवंतांनी हा अवतार घेतला.

**भूभारभूतदैत्यांस्तु हत्वाऽरक्षन्नरांस्तथा ।**
**सर्वाधिन्परिहृत्यैव जीवात्मैक्यं करोत्ययम् ।।३।।**

पृथ्वीला भारभूत असलेल्या दैत्यांना मारून मानवांचे त्याने रक्षण केले. सर्व विकारांचा परिहार करून हा अवतार जीव आणि आत्मा यांची एकता करतो.

**कृष्णो विदेहधर्मस्तु भक्तानां मुक्तिदः खलु ।**
**वासनारूपगोपीस्तु भुक्त्वाऽलिप्तः समश्च वै ।।४।।**

भगवान कृष्ण सर्वदेहधर्मापासून मुक्त असून तो भक्तांना मुक्ती देणारा आहे. वासनारूपी गोपींचा भोग घेऊनही तो समरूपी असल्यामुळे कोणत्याही लेपाने चिकटला नाही.

**निष्कामः क्रीडया सक्तः सवत्सधेनुरक्षकः ।**
**पयःपाने रतो नित्यं गोरक्षकप्रियः खलु ।।५।।**

तो निष्काम असून सुध्दां क्रीडेत मग्न आहे. वासरांसह गाईंचे रक्षण करणारा आहे, नेहमी दूध पिण्यामध्ये मग्न आहे आणि गवळ्यांना आवडणारा आहे.

**गोप्यो मुह्यंति सर्वाश्च तस्य वेणुरवेण वै ।**
**तेन नृत्यंति गायंति नग्नास्ता नगरे गृहे ।।६।।**

त्याच्या वेणूच्या आवाजाने सर्व गोपी मोहित होतात आणि त्यामुळे त्या नगरामध्ये आणि घरामध्ये नग्नपणे नृत्य व गायन करतात.

**मज्जंतीनां जले तासां वासांसि परिहृत्य वै ।**
**अददात्तु पुनस्ताभ्यस्तासां प्रार्थनया हरिः ।।७।।**

पाण्यामध्ये त्या पोहत असताना त्यांची वस्त्रे पळवून त्यांनी प्रार्थना केल्यावर भगवंतांनी त्यांना ती पुनः दिली.

**देहभावगताः सर्वास्तास्तन्मया अजे रताः ।**
**भवबंधविमुक्तास्तु स्थापयंति हरिं हृदि ।।८।।**

त्या सर्व गोपी देहभान नष्ट झाल्यामुळे तन्मय होऊन भगवंताच्या ठिकाणी रत झाल्या. त्या संसारपाशातून मुक्त होऊन भगवंतालाच हृदयामध्ये ठेवू लागल्या.

**क्रीडयोदहरत्सर्वान् कृष्णो व्रजसमुद्भवान् ।**
**कृष्णदर्शनसंगाभ्यां विनिर्मुक्तो व्रजोऽखिलः ।।९।।**

भगवान कृष्णाने व्रजामध्ये जन्मलेल्या सर्वांचाच क्रीडेने उध्दार केला. सर्व व्रजवासी लोक कृष्णदर्शनाच्या प्रेमामुळेच मुक्त झाले.

**भूषिताभिरलंकारैर्गोपीभिः परिवेष्टितः ।**
**भक्त्याकर्षत्ययः कृष्णः क्रीडां चकार हर्षितः ।।१०।।**

अलंकारांनी सुशोभित असलेल्या गोपींनी वेढलेला कृष्ण भक्तीच्या साहाय्याने सर्व

लोकांना आकर्षित करून आनंदाने क्रीडा करीत होता.

**गोपीषु चित्रवस्त्राश्च काश्चित्तु चित्रतिलकाः ।**
**अनेकवर्णदंतास्ता दृष्टा हृष्यति माधवः ।।११।।**

काही गोपी चित्रविचित्र वस्त्रे धारण केलेल्या होत्या, तर काही विचित्र तिलक धारण करणा-या होत्या. काहींचे दात अनेक रंगांचे होते. तशा त्या गोपींना पाहून भगवंतांना अतिशय आनंद होत असे.

**कमलाक्ष्यश्च मीनाक्ष्यो हरिणाक्ष्यस्तथैव हि ।**
**नीलवर्णाश्च मुग्धा हि गौरवर्णाश्च मोहकाः ।।१२।।**

काही गोपींचे डोळे कमलाप्रमाणे होते, काहीचे माशाप्रमाणे होते तर काहीचे हरणासारखे होते. त्यांतील काही सुंदरी नील रंगाच्या होत्या तर काही मोहक अशा गौर वर्णाच्या होत्या.

**सर्वास्तु सिंहकट्यो हि चारुस्तन्यः सुशोभिताः ।**
**मद्याक्ष्यः कंबुकंठ्यो वै पूर्णलावण्यवर्ध्दिताः ।।१३।।**

त्या सर्वच गोपी सिंहकटी होत्या. त्यांचे स्तन सुंदर होते, त्या मदिराक्षी होत्या, त्यांचे गळे शंखासारखे होते आणि त्या संपूर्ण लावण्याने भरलेल्या होत्या.

**एवं शृंगारसंयुक्ता यौवनेन विराजिताः ।**
**कृष्णः क्रीडति ताभिस्तु जनानानंदयन्खलु ।।१४।।**

अशा प्रकारे सर्व श्रृंगाराने युक्त असलेल्या, तारुण्याने भरलेल्या अशा त्या गोपींशी क्रीडा करून भगवान श्रीकृष्ण लोकांना आनंद देत असे.

**गोपीगोपप्रियो यस्तु कंसकालस्य नाशकः ।**
**वैकुंठपतिरेवं हि लीलाविग्रहदर्शकः ।।१५।।**

गोपी व गोप यांना अतिशय प्रिय असलेला, कंसरूपी कालाचा नाश करणारा, वैकुंठाचा स्वामी जो भगवान श्रीकृष्ण, त्याने अशाप्रकारे लीला प्रकट केल्या.

**कृष्णचरितमेवं चात्मन्यनुभाव्यते सदा ।**
**मुनिभिः सुतरां देहे तच्छुणु स्थिरचेतसा ।।१६।।**

अशा प्रकारे वर्णिलेले हे कृष्णचरित्र मुनिलोक नेहमी आपल्या देहामध्ये कसे अनुभवतात, ते मन एकाग्र करून ऐक.

**इंद्रियाणां कुलं मायागोकुलं वै प्रकीर्तितम् ।**
**तेषां तु नियमा गोपाः शमदमादिकाः खलु ।।१७।।**

इंद्रियांचा समुह म्हणजेच मायेने निर्माण केलेले गोकुळ आहे. तेथे नियम, शम, दम इत्यादी हेच खरोखर गोप आहेत.

**रममाणो महाशून्ये स विलासः प्रकीर्तितः ।**
**आनंदः स्वानुभूतिस्तु देही कृष्णो विदेहवान् ।।१८।।**

महाशून्यामध्ये रममाण होणे यालाच विलास असे म्हणतात. स्वानुभूती प्राप्त होणे, हाच आनंद आहे आणि विदेहस्थिती प्राप्त होणे म्हणजेच कृष्ण होणे, असे आहे.

**गोप्यस्त्वयोनयश्चैव सकला योगवृत्तयः ।**
चिध्देमालंकृताः सर्वा भक्तिरत्नैर्विभूषिताः **।।१९।।**

गोपी म्हणजे सगळ्या योगामधिल वृत्ती आहेत. त्या योनीविरहित म्हणजे सुखाची इच्छा नसलेल्या आहेत. चैतन्यरूपी सोन्याच्या दागिन्यांनी त्या नटलेल्या आहेत, त्या सर्वच गोपींनी भक्तीरूपी रत्ने धारण केलेली आहेत.

**गंधविलेपनं तत्र सोऽहंभावः प्रकिर्तितः ।**
**तासां वै तिलकाश्चात्रोपरमा ज्ञानमंजनम् ।।२०।।**

गंध लावणे म्हणजेच सोऽहंभाव आहे. संकल्प नष्ट करणे म्हणजेच कुंकुमतिलक आहे आणि ज्ञान प्राप्त करणे म्हणजे डोळ्यांत अंजन घालणे आहे.

**रतिसुखं समाधिस्तु परा प्रेमसमुद्भवा ।**
**ज्ञानवृध्दिस्तु तारुण्यं निरालंबो हि मंचकः ।।२१।।**

अतिशय प्रेमाने निर्माण झालेली समाधिअवस्था म्हणजे रतिसुख आहे. ज्ञानाची वाढ होणे म्हणजेच तारूण्य आहे आणि कोणत्याही आलंबनाशिवाय राहणे म्हणजे पलंग आहे.

**अनाहतस्वनस्त्वेव वेणुध्वनिर्हि कथ्यते ।**
**मनोनेत्रकला गोप्यो भक्ता विदेहिनः खलु ।।२२।।**

अनाहताचा नाद म्हणजेच वेणूचा ध्वनी आहे. मनोरूपी डोळ्यांच्या हालचाली म्हणजेच गोपी आहेत आणि विदेह अवस्था प्राप्त झालेले (योगी) हेच भक्त आहेत.

**तृणं तु कोमलं ह्यत्र श्रध्दा सात्त्विकवर्तनम् ।**
**भगवत्स्मरणं नित्यं तथा भूतानुकंपनम् ।।२३।।**

सात्त्विक वृत्तीने राहणे आणि श्रध्दा हेच कोवळे गवत आहे. तसेच नेहमी भगवत्स्मरण करणे आणि सर्व प्राण्यांवर दया करणे हेही कोवळे गवतच आहे.

**सदसन्मथितं तत्त्वं नवनीतं हि नूतनम् ।**
**देहः कदम्बवृक्षस्तु साक्षित्वं हि निरीक्षणम् ।।२४।।**

सत् आणि असत् ह्यांचे मंथन करून काढलेले तत्त्वज्ञान हेच ताजे लोणी आहे. हे शरीर हाच कदंबवृक्ष आहे. साक्षित्वाने पाहणे म्हणजे निरीक्षण करणे आहे.

**मनोवांच्छा हि वासासि वामनाडी यमानुजा ।**
**निःसंगत्वं हि नग्नत्वं वैराग्यं भवनाशकम् ।।२५।।**

मनामधल्या निरनिराळ्या इच्छा ही वस्त्रे आहेत. वामनाडी ही यमुना नदी आहे. निःसंग होणे म्हणजेच नग्न होणे आहे आणि वैराग्य म्हणजे संसाराचा निरास करणे आहे.

**ब्रह्मा विश्वाभिमानो हि गोव्रजस्तस्करः खलु ।**
**बोधादहंकृतेर्भ्रष्टः प्रभावेणात्मनस्तु वै ।।२६।।**

सर्व गाई चोरणारा ब्रह्मदेव म्हणजे स्थूलदेहाचा विश्व हा अभिमान आहे. त्या अभिमानामुळेच जीव ज्ञानापासून भ्रष्ट झालेला असतो. भगवंत त्या अभिमानाला नाहीसा करून आत्मज्ञान देतात.

**आत्मना रचितं सर्वं स्वसत्तायोगमायया ।**
**यथापूर्वं व्रजस्थं हि पश्यति निरहंकृतौ ।।२७।।**

अभिमान गेला असता व्रजामध्ये (सर्व) पूर्वीप्रमाणेच दिसते. म्हणजेच देहाभिमान जाऊन ईश्वरसत्तेचे मर्म त्याला (ब्रह्मदेवाला) कळते.

**इंद्रो हस्ताक्रिया त्वत्र मेघास्तमोभवा गुणाः ।**
**विवेको वर्ध्दनं ह्यत्र मोहो वै जलवर्षणम् ।।२८।।**

येथे इंद्र म्हणजे हातानी केलेल्या निरनिराळ्या क्रिया आहेत. ढग म्हणजे तमोगुण असून विवेक म्हणजे गोवर्धन पर्वत आहे आणि मोह म्हणजेच पावसाची वृष्टी आहे.

**कालसर्पो महामोहः कंसोऽविवेक एव हि ।**
**भक्तिस्तु देवकी देव्यार्तत्वं तु गर्भता तथा ।।२९।।**

महामोह म्हणजेच कालसर्प आहे. अविचार हा कंस आहे. देवकी ही भक्ती आहे, तिची आर्तता म्हणजेच गर्भप्राप्ती आहे.

**अनात्मता त्वविद्या वै पूतना नाम तामसी ।**
**अज्ञानदुग्धसंयुक्ता मायासौंदर्यरूपिणी ।।३०।।**

आत्म्याचे अज्ञान म्हणजेच अविद्या, ही तमोगुणी पूतना नावाची राक्षसी आहे. अज्ञानरूपी दुधाने ती युक्त आहे. माया हेच तिचे सौंदर्य आहे.

**आत्मज्ञानेन नश्येच्चैवान्यथासुखसाधनम् ।**
**अविद्यानाशनं त्वेव पूतनाया मृतिः खलु ।।३१।।**

खोटी सुखसमाधानाबद्दची कल्पना आत्मज्ञानामुळे नाहीशी होते. त्यामुळे अविद्येचा नाश होतो म्हणजे पूतनेचा मृत्यू होतो.

**यदुकुलं मदोन्मत्तं दृश्यरूपं तु मानवम् ।**
**तस्य नाशो व्यतिरेको दृश्यरूपविनाशकः ।।३२।।**

मनुष्याचे दृश्यस्वरूप म्हणजेच मदोन्मत्त यदुकुल आहे. दृश्यरूप नष्ट करून टाकणारा व्यतिरेक म्हणजेच यदुकुलाचा नाश आहे.

**एवमंतःस्थविष्णुस्त्वेवात्मज्ञानविहारकः ।**
**तथा बौध्दावतारस्तु बोद्धव्योऽग्रे ह्यनंतरम् ।।३३।।**

अशा प्रकारे हृदयामध्ये असलेला विष्णूच आत्मज्ञानरूपी भूमीवर विहार करीत असतो. यानंतर बौध्दावताराची माहिती समजून घ्यावी.

**।। इति श्रीसिध्दान्तसंहितायां सोहिराविरचितायां ज्ञानस्वरूप-श्रीकृष्णावतारकथनं नाम त्रयोदशोऽध्यायः संपूर्णः ।।**

# अध्याय चौदावा

## बौद्धकल्किज्ञानकलाअवतारयोग

**निर्विकल्पसमाधौ तु सर्वत्र शून्यदर्शनम् ।**
**शांतं हि बौद्धरूपं तु निरालंबं च निश्चलम् ।।१।।**

निर्विकल्प समाधिमध्ये सर्वत्र शून्य पाहणे हेच शांत, स्थिर व निरालंब असे बौद्धरूप आहे.

**निमग्नतन्मयं नित्यं निजानंदं निरंजनम् ।**
**निर्गुणं निर्मलं बीजं विस्तारं विश्वकारणम् ।।२।।**

या स्वरूपामध्ये योगी आत्मज्ञानामध्ये नेहमीच निमग्न झालेले असतात व ते निरंजन, निर्गुण, निर्मळ असतात. ते बीजरूप असून सर्व विश्वरूपी विस्ताराचे कारण असतात.

**अदृश्यपारमेवं हि दृश्यदृष्ट्या त्वगोचरम् ।**
**परिपूर्णं परब्रह्म सच्चिदानंदमद्वयम् ।।३।।**

त्याचा पार दिसणे अशक्य आहे. सामान्य दृष्टीला ते आकलन होणार नाही, ते द्वैताच्या पलीकडे असलेले सच्चिदानंदरूपी परब्रह्म आहे.

**अव्यक्तं वै स्वरूपं हि शून्यज्योतिःप्रकाशकम् ।**
**ज्ञप्तिमात्रं स्वयं ब्रह्म सर्वत्र ज्ञानविग्रहम् ।।४।।**

त्याचे स्वरूप अव्यक्त असून ते शून्य रूपानेच प्रकाशत असते. ज्ञप्ती हे त्याचे स्वरूप असून, ते ज्ञान हेच शरीर असलेले प्रत्यक्ष ब्रह्म आहे.

**जीवः प्रारब्धभोक्ता हि सुखदुःखयुतो भवेत् ।**
**ब्रह्मज्ञानस्थितप्रज्ञैरात्माऽलिप्तस्तु दृश्यते ।।५।।**

प्रारब्धाचे भोग भोगत असल्यामुळे जीवाला सुख आणि दुःख भोगावे लागते. ब्रह्मज्ञान प्राप्त झालेल्या स्थितप्रज्ञालाच अलिप्त अशा आत्म्याचा साक्षात्कार होतो.

**दृश्यत्यागः सुपूर्णस्तु पूर्णवैराग्यमूलकः ।**
**सर्वस्य हेतुभूतोऽपि बौध्दोऽयं गुप्त एव हि ।।६।।**

दृश्य सृष्टीचा संपूर्णपणे त्याग, पूर्ण वैराग्याशिवाय होत नसतो. म्हणून सर्वाला कारणीभूत असलेला हा शुद्ध बौध्दावतार गुप्तच आहे.

**आत्मन्यन्वयवृत्तिस्तु दृश्ये हि व्यतिरेकता ।**
**स्थिरता कारणस्यैव मन्यते बौद्धरूपता ।।७।।**

आत्म्याच्या ठिकाणी अन्वयवृत्ती असणे आणि दृश्याचे ठिकाणी व्यतिरेक बुध्दी असणे, कारणाच्या ठिकाणी स्थिर बुध्दी असणे, हेच बौद्धरूप आहे.

**नामरूपात्मकं सर्वमभ्रवध्दि तदिक्ष्यते ।**
**चिदाकाशं स्वतंत्रं हि मौनरूपं तु शाश्वतम् ।।८।।**

नामरूपात्मक असलेले सर्व जग ढगाप्रमाणे पाहिले जाते. चैतन्यरूपी आकाश हे नित्य, स्वतंत्र व मौन धारण केलेले असते.

**तरंगो जगदाभासः पंचभूतांशकर्दमः ।**
**भ्रांतिर्गुणत्रयस्तैव चिज्जले निर्मले खलु ।।९।।**

जगाचा भास हा पाचही महाभूतांचा चिखल असून तो पाण्यावरील लाटेसारखा आहे. चैतन्याच्या स्वच्छ अशा पाण्यामध्ये तिन्ही गुणांचा खरोखर भ्रमच होत असतो.

**सर्गस्थितिलयैः शून्यं ब्रह्मैव स्वप्रकाशम् ।**
**स्थिरचरादि दृश्यस्य बुद्धरूपं हि कारणम् ।।१०।।**

उत्पत्ती, स्थिती आणि लय या तिन्ही अवस्था नसलेले ब्रह्म हे स्वप्रकाशित आहे. स्थिर आणि चर दृश्य वस्तूचे कारण बुद्धरूपच आहे.

**कनके नगरूपाणि भूतानि शाश्वते तथा ।**
**भूतानां व्यतिरेकाद्वै शिवरूपं विशिष्यते ।।११।।**

सोन्यापासून जसे अलंकार बनतात, तशीच पाचही महाभूते नित्य अशा ब्रह्मापासून निर्माण झाली आहेत, म्हणून पाचही महाभूते ही व्यतिरेकाने ब्रह्मापासून वेगळी आहेत (हे जाणून घ्यावे).

**जीवशिवभ्रमो नास्ति तत्पदं परमात्मनः ।**
**सोऽहं भूतं सुगम्यं तु मनसस्तु निरंजनम् ।।१२।।**

ज्या ठिकाणी जीव व शिव असा भ्रम नाही तेच तत्पद परमात्मा आहे. सोऽहं भाव होणे, म्हणजेच सर्व भूतांचा ब्रह्मामध्ये विलय होऊन परमात्म्याच्या ठिकाणी मनाचा उपशम होणे हे होय.

**समुद्भूतं हि चिद्भानोर्विश्वं मृगांबुमोहकम् ।**
**ज्ञानानुभववैराग्यैरहमेव तदव्ययम् ।।१३।।**

चैतन्यरूपी सूर्यापासून मृगजलाप्रमाणे सुंदर दिसणारे मोहक विश्व निर्माण झाले. ज्ञान, अनुभव आणि वैराग्याचे साहाय्याने मूळ जे अव्यय परब्रह्म आहे ते माझे स्वरूप आहे (हे जाणावे).

**रज्जौ सर्पभ्रमो ह्येव तथा भ्रांतिस्तु शाश्वते ।**
**विश्वस्य सैव मिथ्या वै विवेकेनेक्ष्यतेऽचिरात् ।।१४।।**

दोरीवर सर्पाची भ्रांती जशी होते तशीच ब्रह्माच्या ठिकाणी (विश्वाची) भ्रांती होते. विश्वाचा हा खोटेपणा विवेकाच्या साहाय्याने लवकरच दिसून येतो.

**दृश्यते मोहनिद्रायां दृश्यस्वप्नमशाश्वतम् ।**
**जागृतिः स्वप्नहा नित्या तुर्या वै भ्रमनाशका ।।१५।।**

गाढ मोहनिर्देमध्ये दृश्यरूपी स्वप्न खोटे आहे हे दिसून येते. जागृति ही स्वप्नच आहे. केवळ चवथी अवस्था (तुर्या) ही सर्वच भ्रम नाहीसा करणारी आहे.

**अचलज्ञानमेवं त्वन्वयेन केवलं तु यत् ।**
**विक्षेपरहितं नित्यं तद्बुद्धरूपमेव हि ।।१६।।**

अशा प्रकारचे केवळ अन्वयाने युक्त असलेले, कोणताही विक्षेप नसलेले नित्य आणि स्थिर असे जे ज्ञान तेच बुध्दाचे रूप आहे.

**प्रसराकुंचने शक्तः कूर्मो वै स्वेच्छया सदा ।**
**तथा साधुस्वभावो हि सर्वेंद्रियसुनिग्रही ।।१७।।**

कासव आपल्या इच्छेनुसार नेहमी शरीराचे प्रसरण व आकुंचन करण्याला समर्थ असते. तसेच साधू स्वभावतःच सर्व इंद्रियांचा निग्रह करण्यात समर्थ असतात.

**अन्वयव्यतिरेकैक्यं पूर्णज्ञानं विशुध्दं हि तत् ।**
**निर्लिप्तं सर्वमात्रासु पद्मपत्रं जले यथा ।।१८।।**

अन्वय आणि व्यतिरेकाच्या साहाय्याने शुद्ध झालेले पूर्णज्ञान हे सर्व विषयापासून अलिप्त असते. कमलाचे पान पाण्यामध्ये राहूनही जसे पाण्यापासून अलिप्त असते त्याचप्रमाणे ते ज्ञानपण असते.

**स्थिरो निवृत्ततर्षस्तु नटवद्वर्तते भुवि ।**
**तस्य स्थितिरनित्या वै तथेच्छाऽपि च सर्वदा ।।१९।।**

ज्याची सर्व तृष्णा नष्ट झालेली आहे, असा साधू स्थिर असून जगामध्ये नटाप्रमाणें व्यवहार करीत असतो. त्याचे एका जागी असणे हे जसे अनिश्चित असते तशी त्याची इच्छाही अनिश्चित असते.

**दृश्यस्य व्यतिरेकाद्वै दृश्यातीतस्तु दृश्यते ।**
**रंभागर्भो यथा बाह्यावरणानां विनाशनात् ।।२०।।**

दृश्याचा व्यतिरेक केल्यानंतरच दृश्यापलीकडील वस्तू दिसते जसे बाहेरील आवरणे नष्ट केल्यावर केळीचा गर्भ दिसतो.

**यदि तत्त्वे सदानंदेऽविद्यावर्तो हि दृश्यते ।**
**प्रीतिः कार्या स्वधर्मे हि तथा संतसमागमे ।।२१।।**

जर नेहमीच आनंदरूप असलेल्या तत्त्वामध्ये अविद्येचा भ्रम दिसत असेल तर आपल्या धर्मांवर आणि संतांच्या समागमामध्ये भक्ती ठेवावी.

**विक्षेपः सर्ववृत्तीनां व्यावृत्तिः संसृतेस्तथा ।**
**तयोर्नाशस्तु बुध्दो वै निर्विकल्पोऽक्रियः खलु ।।२२।।**

सर्व वृत्तींचा विक्षेप (भ्रम) आणि संसारातून मुक्त होणे या दोघांचाही जिथे नाश होतो ते क्रियाशून्य असे निर्विकल्प बुध्दाचे स्वरूप आहे.

**सर्वकलंकनाशाय कल्किरूपमतः परम् ।**
**स्वानुभूतं हि चैतन्यं दृश्यप्रलयकारणम् ।।२३।।**

सर्व संकल्पांचा नाश करण्यासाठी त्यांच्या (बुध्दाच्या) नंतरचा कल्कि हा अवतार आहे. त्या अवतारामध्ये स्वतःचा अनुभव म्हणजेच जे चैतन्य आहे, ते सर्व दृश्य वस्तूंचा प्रलय करण्यास कारणीभूत ठरते.

**पुण्यपापभयं नास्ति बद्धता नास्ति यत्र तु ।**
**कुतो मुक्तिर्न वै जीवः शिवस्य का कथा ततः ।।२४।।**

या अवतारामध्ये पुण्य आणि पाप यांची भिती नाही. बद्धता मुळीच नाही, त्यामुळे मुक्तीचा प्रश्नच येत नाही. जीवच नाही मग शिवाची वार्ता तरी तेथे कोठून असणार?

**विस्मृतिर्नास्ति यत्रैव तत्र स्मृतेः कथा कुतः ।**
**कल्पनाया अभावे तु का वार्ता संशयस्य वै ।।२५।।**

तेथे विस्मृतीच नसल्यामुळे स्मृतीचा प्रश्नच येत नाही आणि कल्पनाच नसल्यामुळे संशयाची उत्पत्तीच नसते.

**ब्रह्मणा नश्यते माया भवभ्रमाः कुतस्तदा ।**
**वंध्याजामातुरेवं हि मधुपर्कः कुतस्तथा ।।२६।।**

ब्रह्मावर जर मायाच निर्माण झाली नाही तर संसाररूपी भ्रम तरी कसा निर्माण होईल? वंध्येच्या जावयाला मधुपर्क करण्याचे कारणच काय?

**नश्यते मूलसत्त्वं वै रजस्तत्र न संभवेत् ।**
**रजोऽभावे तमो नास्ति नास्ति तत्र विनाऽऽत्मना ।।२७।।**

मूलभूत असलेला सत्त्वगुण नसल्यामुळे रजोगुणाची उत्पत्ती नाही, रजोगुण नसल्यामुळे

तमोगुण नाही, त्यामुळे तेथे आत्म्याशिवाय (दुसरे) कोणतेच गुण नाहीत.

**व्याप्यव्यापकशून्यं वै ब्रह्म तत्सुस्थिरं खलु ।**
**खसंभवो न यत्रैव तत्र वायोर्भ्रमः कुतः ।।२८।।**

त्या ठिकाणी व्याप्य आणि व्यापक हा भावच नसलेले ब्रह्म सुस्थिर असते. आकाशच जर नसेल तर वायूचा भ्रम तरी कोठून होणार?

**नैष्कर्म्यधर्मभूतं तच्चलनं त्वप्रयोजकम् ।**
**यत्र वायुर्न वै तत्र तेजसः संभवः कुतः ।।२९।।**

निष्काम झाल्यामुळे जेथे कर्तव्यच राहिले नाही तेथे हालचाल असूच शकत नाही आणि जिथे वायूच नाही तेथे तेज तरी कसे निर्माण होईल?

**यत्र तेजो न वै तत्र वारिण उद्‌भवः कथम् ।**
**वार्यभावे न वै पृथ्वी तत्र चराचरं कथम् ।।३०।।**

जेथे तेज नाही तेथे पाणी तरी कसे निर्माण होईल? आणि पाणी जर नसेल तर पृथ्वी असणारच नाही. जर पृथ्वीच नाही तर चराचर तरी कसे असेल?

**यत्र चराचरं नास्ति भोक्तृत्वं तत्र नैव हि ।**
**यत्र भोक्ता न वै तत्र जागृतेः संभवः कुतः ।।३१।।**

जेथे चराचर नाही तेथे भोक्तृत्व तरी कोणाला असणार? जेथे भोक्ताच नाही तेथे जागृति असणे शक्य नाही.

**अकल्प्या जागृतिस्तत्र स्वप्नस्य विभ्रमः कथम् ।**
**स्वप्नाऽभावे तु सद्रष्टुर्मोहसुप्ते भ्रमः कुतः ।।३२।।**

ज्या ठिकाणी जागृति कल्पनेत सुध्दां नाही तेथे स्वप्न असणे कसे शक्य आहे? आणि स्वप्नच ज्या ठिकाणी नाही अशी द्रष्ट्याची अवस्था प्राप्त झाली असता मोहाचा किंवा निद्रेचा भ्रम कसा बरे होईल?

**यदि सुप्तरेभावः स्यात्तुर्यायाः किं प्रयोजनम् ।**
**त्रैगुण्यं त्रिपुटिर्नास्ति त्वात्मनो ज्ञानकारणात् ।।३३।।**

जर निद्राच नसेल तर तुर्यावस्थेचे काय प्रयोजन आहे? आत्मज्ञान झालेले असल्यामुळे त्रैगुण्य किंवा त्रिपुटी तेथे असण्याचे कारण नाही.

**एवं सर्वं तु वाच्यं वै नामरूपविभूषितम् ।**
**मिथ्यानुभवितं दृश्यं कल्किरूपं लयप्रदम् ।।३४।।**

अशा प्रकारचे नाम आणि रूप यांनी युक्त असलेले सर्व, जे मिथ्या अनुभवास येणा-या दृश्याचा लय करणारे आहे, ते कल्किरूप आहे.

**।। इति श्रीसिध्दान्तसंहितायां सोहिराविरचितायां बौद्धकल्किज्ञानकलाऽवतारयोगो नाम चतुर्दशोऽध्यायः संपूर्णः ।।**

# अध्याय पंधरावा

## शुद्धव्यतिरेकयोग

**शाश्वतमेकचैतन्यं नामरूपविवर्जितम् ।**
**चिन्मात्रं सर्वतन्मात्रमदृश्यमचलं परम् ।।१।।**

चैतन्य हेच एक शाश्वत तत्त्व असून त्याला नामरूप नाही. ते न दिसणारे, व अढळ आहे. ते चित्स्वरूप आहे आणि सर्व विषयांविरहित आहे.

**निर्वेध्यो नित्य आनंदो नित्यशुध्दः परमेश्वरः ।**
**नारायणो हरिः साक्षाद्भक्तिमुक्तिप्रदायकः ।।२।।**

सर्व उपाधिपासून मुक्त, नित्यानंदरूप, नेहमीच शुद्ध असलेला परमेश्वर, नारायणरूपी हरि, साक्षात् भक्ति आणि मुक्ति देणारा आहे.

**श्रीधरः श्रीहरः शान्तः शेषशायी दिगंबरः ।**
**साकल्पविद्यमानस्यांतःसाक्षी हि जनार्दनः ।।३।।**

जो श्रीधर, श्रीहर, शांत, शेषावर शयन करणारा, दिगंबर, जनार्दन, तो सर्व चराचराचा अंतःसाक्षी आहे.

**ज्ञानतज्ज्ञेयैस्त्वनिर्वाच्यो दृश्यातीतः परः शिवः ।**
**दिव्यः परमशांतो ह्यादिदेवोऽजो विभुः खलु ।।४।।**

दृश्यापलीकडील असणारा असा परमशिव, ज्ञान किंवा ज्ञेय यांच्या पलीकडील असून तो दिव्य व अत्यंत शांत आहे. तो आदिदेव असून अजन्मा (जन्म नसलेला) व व्यापक आहे.

**तत्पदत्वंपदैक्यो वै सच्चिदानंदविग्रहः ।**
**परब्रह्मेतिसंज्ञस्तु परमात्मा जगद्गुरुः ।।५।।**

तत्पद आणि त्वंपद या दोन्हीचीही एकता असलेला सच्चिदानंदरूपी, ज्याला परब्रह्म असे नाव आहे, तो परमात्मा सर्व जगाचा गुरू आहे.

**ज्ञानस्थित्या समाधानं यस्मिन्प्राप्नोति सर्वदा ।**
**ध्यानत्रिपुटिरैक्यस्तु योगांते ब्रह्म सर्वदा ।।६।।**

अशा प्रकारे ज्ञान प्राप्त केले असता समाधान प्राप्त होते. योगी लोक (ध्येय, ध्यान व ध्याता) या त्रिपुटीचे ऐक्य करून शेवटी कायमची ब्रह्मस्थिती प्राप्त करून घेतात.

**ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा कांक्षितेन न बद्धते ।**
**आत्मध्यानसमाविष्ट आत्मनि निरतः सदा ।।७।।**

प्रत्यक्ष ब्रह्म झालेला, प्रसन्नचित्त योगी कोणत्याही कामनेने बांधला जात नाही. तो नेहमी आत्मध्यानातच मग्न असतो.

**पश्यत्यात्मसमं मुक्तं सर्वदृश्यं चराचरम् ।**
**एकात्मकं जगत्सर्वं मिथ्याभूतं समं हि तत् ।।८।।**

सर्व चर आणि अचर दृश्य वस्तू त्याला आपल्याप्रमाणेच मुक्त झालेल्या दिसतात. मिथ्या

असलेले सर्व जग त्याला ते एकरूपच दिसते.

**एवं ज्ञानमयो योगी भुनक्ति संचितं ननु ।**
**सर्वक्रमण्युदासी हि विवेकेनात्मनो विना ।।९।।**

अशा प्रकारे ज्ञानरूप झालेला योगी पूर्वजन्मीचे संचित भोगत असतो. सर्व कर्मांमध्ये तो उदासीन असतो. आत्म्याशिवाय इतर विचारांमध्ये तो विवेकामुळे प्रवृत्त होत नाही.

**मूलछेदकवृक्षस्तु किसलयार्द्रतायुतः ।**
**स्वल्पदिनादिपर्यंतं क्रिया मुक्तस्य वै तथा ।।१०।।**

ज्याचे मूळ तोडलेले आहे, अशा वृक्षाला काही दिवस अंकुर व ओलावा असतो. त्याचप्रमाणे मुक्ताच्या क्रियाही काही काळपर्यंत चालू राहतात.

**क्षयति संचितं तोयं न पुनस्तस्य वर्ध्दनम् ।**
**भुंजन्नपि तदा भोगान्दृश्ये जीवो न मुह्यति ।।११।।**

साठविलेले पाणी कालान्तराने कमी कमी होत जाते. ते पुनः वाढत नाही. त्याचप्रमाणे भोग भोगत असतानाही दृश्य वस्तूंचा मोह त्याला पडत नाही.

**भित्त्वां लक्ष्यं शरो याति पुरो मुक्तास्तथा ननु ।**
**प्रारब्धभोगभाक्त्वेवं जीवत्यायुष्यवेगतः ।।१२।।**

धनुर्धराने सोडलेला बाण लक्ष्यवेध करून सुध्दा ज्याप्रमाणें काहीसा पुढे जातो, त्याप्रमाणे मुक्तसुध्दा आयुष्याच्या वेगामुळे प्रारब्ध भोगण्यासाठी काही काळ जगत असतो.

**क्षेत्रे धान्यस्य रक्षार्थ मूर्तिः कृता कृषीवलैः ।**
**आत्तधान्यात्परं तत्र सुस्थिता सा यथा बत ।।१३।।**

शेतामध्ये धान्याचे रक्षण करण्यासाठी शेतक-याने केलेले बुजगावणे धान्य काढून नेल्यावरही जसे तेथे तसेच राहते, तसेच मुक्ताचे जीवन आहे.

**कल्पनाभूतमज्ञानं कारणं नष्टमेव हि ।**
**देहाभिमानकार्यं तु कुतस्तद्भ्रममूलकम् ।।१४।।**

कल्पनेला कारण असलेले अज्ञानच नष्ट झाल्यानंतर त्याचे कार्य जो देहाभिमान, तो भ्रममूलक असल्याने कसा बरे शिल्लक राहील?

**देहकर्मस्वभावोऽपि कुलालचक्रवन्ननु ।**
**पूर्ववेगाद् भ्रमश्चक्रे मुक्ते तु देहकर्म हि ।।१५।।**

देहाच्या कर्माचा स्वभाव हा खरोखर कुंभाराच्या चाकासारखा असतो. पूर्वीच्या वेगाने फिरत असलेले चाक जसे (त्यावरील घट काढून घेतल्यानंतरही) फिरत राहते तसेच जीवन्मुक्ताचेही शारीरिक कर्म चालू रहात असते.

**युवती गर्भसंभूता विधवा जायते यदा ।**
**पतिव्रता ह्युदासिनी सर्वसंगे तथा स हि ।।१६।।**

गरोदर असलेली स्त्री जर एकाएकी विधवा झाली, तर ती पतिव्रता, सर्व संगाच्या बाबतीत जशी उदासीन असते तसाच तो जीवन्मुक्तही असतो.

**एवं मुक्तस्य कर्माणि देहसमाश्रितानि वै ।**
**प्रारब्धभोगभोक्तुश्चैवांतरुदासीनः सतः ।।१७।।**

अशा प्रकारे मुक्ताची सर्व कर्मे ही देहावर अवलंबून असतात. तो केवळ प्रारब्धाचे भोग भोगत असतो, परंतु मनामध्यें तो उदासीन असतो.

**हिंग्वभावे तु तत्पात्रं हिंगुगंधसमान्वितम् ।**
**तथा सतां मनो नित्यं देहधर्मस्वभावजम् ।।१८।।**

हिंग ठेवलेले भांडे त्यांतील हिंग काढला तरी जसे हिंगाच्या वासानं युक्तच असते तसेच सज्जनाचे मनही (कोणत्याही परिस्थितीत) स्थिर असते; त्यांच्या देहाच्या क्रिया या मात्र स्वभावानुसार होत असतात.

**कदल्यां फलितायां वै वंशे कंटकसंयुते ।**
**तयोर्नाशो यथा नाशस्तथा भवस्य ज्ञानिनः ।।१९।।**

केळ घड आल्यानंतर मरते, वेळू त्याला कांटे (फुले) आल्यानंतर मरतो, त्याचप्रमाणे ज्ञानी माणसाचा संसारही ज्ञान प्राप्त झाल्यानंतर नष्ट होतो.

**पुष्पनाशः फलप्राप्तौ गर्भनाश ऋतौ तथा ।**
**सेवायां तु सतां नाशोऽभिमानस्य सुनिश्चयः ।।२०।।**

फळ आले की फुलाचा नाश होतो. ऋतु प्राप्त झाला की गर्भाचा नाश होतो. सज्जनांची सेवा केली असता निश्चितपणे अभिमानाचा नाश होतो.

**पाखंडघ्नस्तु वेदान्तः सिध्दान्तस्तर्कहा खलु ।**
**ध्यानघ्नं योगिनां त्वेवं जीवेश्वरैक्यमेव हि ।।२१।।**

वेदान्ताने पाखंडाचा नाश होतो. सिध्दान्त तर्कवितर्काचा नाश करतो. त्याचप्रमाणे जीव आणि ईश्वर यांचे ऐक्य झाले असता योगी लोकांचे ध्यान नाहीसे होते. (त्यांची ध्यानाची गरज नाहीशी होते.)

**व्यतिरेकस्तु रूपघ्नोऽन्वयोह्यनामको यथा ।**
**द्रष्टुरभाव एवं हि दृश्यघ्नः सुतरां तथा ।।२२।।**

व्यतिरेकाने बाह्यरूप नष्ट केल्यानंतर अन्वयाला जसे नावच राहत नाही, तसेच पाहणाराच जर नसेल तर दृश्याचा समूळ नाश होतो.

**ज्ञानेन नश्यतेऽज्ञानमहंतां नाशयेत्तथा ।**
**ज्ञेयोऽक्षयस्तु सद्रुपो विज्ञानभवकारणः ।।२३।।**

ज्ञानामुळे अज्ञान नष्ट होते, तसेच ते अहंकाराचाही नाश करते. आत्मज्ञानाने भवकारणाचा निरास होतो आणि अक्षय असे ज्ञेय सद्रूप (सत्यादी गुणांनी युक्त ब्रह्म) शिल्लक राहते.

**ब्रह्म प्रपद्यमाना वै योगिनः कीदृशाः कथम् ।**
**किं वदंति किमिच्छंत्याचरंति किं चरंति ते ।।२४।।**

ब्रह्मत्व प्राप्त झाल्यानंतर योगी कशा प्रकारे राहतात, काय बोलतात, कशाची इच्छा करतात, कोणते आचरण ठेवतात आणि कोठे संचार करतात (हे समजून घ्यावे).

**श्रवणं संतचिन्हांनां वैराग्यं पुण्यदं हि तत् ।**
**आनंददं तु पापघ्नं भक्तिमुक्तिप्रदायकम् ।।२५।।**

साधूची लक्षणे ऐकणे हे विरक्ती देणारे, पुण्यकारक, आनंद देणारे, पाप नाहीसे करणारे आणि भक्ति व मुक्ती देणारे आहे.

**प्राणहिनं शरीरं वै वेदहीनं तु कर्म हि ।**
**इच्छाहीना मनोबुध्दिस्तथा सतां सदैव हि ।।२६।।**

प्राण नसलेले शरीर जसे असते किंवा वेदहीन कर्म जसे असावे तसेच सज्जनांचे मन व बुध्दी इच्छारहित असतात.

**पवनवियुतं व्योम रूपहीनं तु नाम वै ।**
**निर्विकल्पं तु संतानां तथा चित्तं सदात्मनि ।।२७।।**

वारा नसलेले जसे आकाश असावे, रूप नसलेले जसे नाव असावे तसेच निर्विकल्प अशा सज्जनांचे चित्त नेहमी आत्म्याच्या ठिकाणी असते.

**अतरंगः समुद्रो वै वनं विना हि माधवः ।**
**निर्धूमस्त्वग्निरेवं हि स्थिरो गुप्तः प्रकाशकः ।।२८।।**

जशा लाटा नसलेला समुद्र असावा, अरण्य नसलेला वसंत ॠतू असावा, धूर नसलेला अग्नी असावा तसा योगी प्रकाशमान असूनही स्थिर व गुप्त असतो.

**सूर्यो मृगांबुशून्यो वै विनास्वप्नेन जागृतिः ।**
**अहंतया विना जीवः सोऽहंब्रह्म तथा बुधः ।।२९।।**

सूर्य जसा मृगजळाशिवाय असतो किंवा जागृति जशी स्वप्नाशिवाय असते, तसाच शहाणा (योगी) माणूस सोऽहं (तो मी ब्रह्म आहे) हे जाणणारा, सर्व अभिमानापासून मुक्त असतो.

**वैराग्येण तु सज्ज्ञाता ज्ञानेन मुक्त एव हि ।**
**पुण्यपापविनिर्मुक्तः साधुर्दुःखसुखविवर्जितः ।।३०।।**

वैराग्याने युक्त असलेला ज्ञाता साधू ज्ञानामुळे मुक्त झालेला असतो. त्याचे पुण्य व पाप नाहीसे झालेले असते आणि त्याचे सुख व दुःख ही दोन्हीं नष्ट झालेलीं असतात.

**मनसा क्रमते शून्यं सबाह्यं त्वतरं तथा ।**
**परं दृष्ट्वा तु दृश्ये वै वृत्तिशून्यो व्यहंकृतिः ।।३१।।**

मनानेच तो बाहेर व आत अशी शून्याकडे वाटचाल करतो. अहंकार नसलेला, कोणतीही वृत्ती नसलेला, तो दृश्यामध्ये ब्रह्म पाहत असतो.

**अकथ्थकथनं तस्य दृश्यभावविवर्जितम् ।**
**शृणोति विश्रुतं सोऽपि स्पृशत्यस्पृश्यमेव हि ।।३२।।**

तो दृश्यातीत झालेला असल्यामुळे त्याचे बोलणे हेच मौन असते. त्याचे ऐकणे हे न ऐकणे असते, त्याचा स्पर्श हा अस्पर्शच असतो.

**नेत्रैर्विनेक्षते दृश्यं विना लेढि हि जिव्हया ।**
**जिघ्रत्यनासिकश्चैव नंदति संगवर्जितः ।।३३।**

तो डोळ्यांशिवाय दृश्य पाहतो, जिभेशिवाय रस घेतो, नाकाशिवाय वास घेतो व देहाच्या संगाशिवायच आनंद घेत असतो.

**अपाणिः क्रियते कर्मायोनिस्तु मन्मथः स वै ।**
**विनागुदेन विस्त्रष्टा त्वाश्चर्यं तच्छृणु सादरम् ।।३४।।**

तो हाताशिवाय कर्म करतो, तो लिंगाशिवाय मदन करतो, तो गुदाशिवाय विसर्जन करतो. हे सर्व आश्चर्य तू आदरपूर्वक ऐक.

**अव्ययं परमानंदं दुखाःतीताच्युतं पदम् ।**
**तद्युतो नित्यमुक्तो हि जीवन्मुक्तेः परः स वै ।।३५।।**

अच्युताचे (परमात्म्याचे) स्थान हे व्यय न पावणारे, आनंदमय, दुःखाच्या पलीकडे असलेले आहे. त्या ठिकाणी पोहोचलेला योगी हा नित्यमुक्त असतो. तो जीवन्मुक्ताच्याही पलीकडे गेलेला असतो.

**यावद्देही स वै नित्यं द्वैतत्वाज्ज्ञानसावधः ।**
**विरक्तो हि विवेकी तु श्रध्दाभक्तिसमन्वितः ।।३६।।**

जोपर्यंत शरीर आहे तोपर्यंत द्वैत आहे, म्हणून ज्ञानप्राप्त झाले तरी सावध राहिले पाहिजे. अशा विवेकी विरक्ताने श्रध्दा, भक्ती यांचा मुळीच त्याग करू नये.

**सागरे मिलिता गंगोद्‌गमं हि न जहाति वै ।**
**ब्रह्मभूतस्तथा जीवः श्रध्दां भक्तिं न वै त्यजेत् ।।३७।।**

गंगा सागराला मिळाली तरी उगमाचा त्याग करीत नाही. त्याप्रमाणे ब्रह्मज्ञान झाले तरी जीवाने (ज्ञान्याने) श्रध्दा व भक्ति यांचा त्याग करू नये.

**अरोगिणां ह्यपथ्येन भीतिस्तु शाश्वती खलु ।**
**तथा साधोस्तु भीतिर्हि मनोदुर्निग्रहेण वै ।।३८।।**

निरोगी माणसाला अपथ्याची भिती नेहमीच असते, त्याचप्रमाणे साधूलाही मनाच्या निग्रहाविषयींची भीती नेहमीच बाळगावी लागते.

**गर्भिणी युक्तमश्नाति कोऽपि गुह्यं हि रक्षति ।**
**तथा साधुः प्रयत्नेन विवेकं रक्षति स्वयम् ।।३९।।**

गर्भिणी स्त्री नेहमीच योग्य आहार घेते. कोणीही गोपनीय गोष्ट गुप्तच ठेवतो. त्याचप्रमाणे साधू स्वतः यत्नाने विवेकाचे रक्षण करतो.

**यथार्जवं नृपप्रीत्यै तथेशप्राप्तये खलु ।**
**अतः साधुः सदा शुद्धो वेदाज्ञयानुवर्तते ।।४०।।**

राजाला संतुष्ट करण्यासाठी गरीब लोक ज्याप्रमाणे राजाचे सांत्वन करतात, तसाच साधू ईश्वरप्राप्तीसाठी पवित्र राहून वेदाज्ञेचे आचरण करीत असतो.

**संगमोहो विवेकघ्नो ज्ञानं तु मोहनाशकम् ।**
**आत्मज्ञानं तु साधुर्हि रक्षत्यामरणंततः ।।४१।।**

शरीराच्या आसक्तीचा मोह विवेक नष्ट करतो. ज्ञान मोहाचा नाश करते म्हणून साधू आमरण ज्ञानाचे रक्षण करतात.

**नौकायानस्थितो भीतो यावद्‌गच्छति वै तटम् ।**
**साधुस्तथाऽमृतिं शुद्धो यमाद्यैः सर्वसाधनैः ।।४२।।**

नावेमधून प्रवास करणारा माणूस (नाव) तीराला लागेपर्यंत जसा (बुडण्याच्या भितीने) घाबरलेला असतो, तसा साधू यम, नियमादी सर्व साधनांसह मृत्यूपर्यंत नेहमीच पवित्र राहतो.

**श्रृतेस्तु वचसा साधुर्नित्यकर्मणि तत्परः ।**
**जीवन्मुक्तोऽपि नित्यं वै कुरुते त्वव्ययमस्मृतिम् ।।४३।।**

वेदाच्या वचनानुसार नित्यकर्मांचे आचरण करण्याविषयीं साधू नेहमीच तत्पर असतो. जीवन्मुक्तसुध्दा नेहमी परमेश्वराचे स्मरण करीत असतो.

**यावज्जीवः शरीरे तु तावद्भोगेन संयुतः ।**
**ज्ञानविस्मृतिदो भोगोंऽते स भक्तिसमन्वितः ।।४४।।**

जोपर्यंत शरीरात जीव आहे, तोपर्यंत भोग भोगावेच लागतात. भोग हे ज्ञानाचे विस्मरण करणारे असतात म्हणून भक्तिचा सहवास सोडू नये.

**का भक्तिः कोऽत्र वै देवः को भक्तः कथयामि तत् ।**
**द्वैतं च देवभक्तानामज्ञानजमिदं शृणु ।।४५।।**

भक्ति म्हणजे काय? देव कोण व भक्त कोण हे (मी) आता सांगतो. देव व भक्त यामधिल द्वैत हे अज्ञानामुळे झालेले आहे (हे ध्यानात ठेव).

**अप्रतिमस्त्वयं देवो देवानां सर्गकारकः ।**
**हृदिस्थो ध्यायते नित्यं निष्कामभक्तियोगतः ।।४६।।**

देवांचीही निर्मिती करणारा, स्वतःची प्रतिमा नसलेला असा हा देव हृदयामध्ये निवास करतो. निष्काम भक्ति करून भक्त त्याचे नेहमी ध्यान करीत असतात.

**तन्मयः स्मरणं विष्णोः कुर्यादानंदवाञ्छया ।**
**समाधिमग्नचेताः स जितेंद्रियः परंतप ।।४७।।**

आनंदाची इच्छा करणा-याने तन्मय होऊन विष्णूचे स्मरण केले पाहिजे. ज्याचे मन समाधिमध्यें मग्न असते, तोच श्रेष्ठ मनुष्य जितेंद्रिय असतो.

**व्यतिरेकेण दृश्यं वै नाशयेत्सर्वमेव हि ।**
**स्थितबुध्देस्तु बुध्दिश्चैतन्येन प्रकाशिता ।।४८।।**

व्यतिरेकाच्या साहाय्याने सर्व दृश्याचा नाश करावा. स्थितप्रज्ञाची बुध्दी नेहमीच चैतन्याने प्रकाशित झालेली असते.

**आत्मध्यानंविना सौख्यं न तस्मै विद्यते क्वचित् ।**
**श्रध्दाभावान्विता यैव भक्तिः साऽद्वैतसंभवा ।।४९।।**

परमात्म्याच्या ध्यानाहून भिन्न असे त्याचे सुख असतच नाही. श्रध्दा व भाव असलेली भक्ती ही अद्वैतातूनच निर्माण होते.

**अद्वेष्टा सर्वभूतान्वै वस्तूनि त्वनपेक्षिता ।**
**मिथ्यानुभविता दृश्यं सत्यमेकं हि पश्यति ।।५०।।**

सर्व प्राण्यांचा द्वेष न करणारा, वस्तूंची इच्छा न बाळगणारा, सर्व दृष्य खोटे आहे हे जाणणारा, तो केवळ एक सत्य ब्रह्मच पाहत असतो.

**अधैर्यं हन्ति निःशेषमविद्याऽऽमयसंभवम् ।**
**शाश्वतो निर्मलः शांतोऽव्ययस्तु भवति स्वयम् ।।५१।।**

अविद्यारूपी रोगाने निर्माण झालेल्या अधैर्याचा तो संपूर्णपणे नाश करतो व स्वतः नित्य, स्वच्छ, शांत असे ब्रह्मत्व प्राप्त करतो.

**अश्नंतु विहरन्पश्यन्शयानोऽपि सदैव हि ।**
**समाधानाचलो वेत्ता नात्मानं विस्मरेत्कदा ।।५२।।**

तो खाताना, विहार करताना, पाहताना किंवा झोपताना स्थिर समाधान असलेलाच असतो. ज्ञानी पुरुषाला केव्हाही आत्मविस्मरण होत नाही.

**एवं ज्ञानसमाविष्टो मनसा ध्यानतत्परः ।**
**सात्त्विकश्चैव निष्कामी भक्तोऽपवर्गसंयुतः ।।५३।।**

अशा प्रकारे ज्ञानाने युक्त असलेला, मनाने ध्यानतत्पर असणारा, सत्त्वगुणसंपन्न, निष्काम भक्त मोक्ष मिळवितो.

**अविद्यया समाविष्टः पातके हि रतः सदा ।**
**राजसस्तु सकामी वै भक्तिमार्गे पराङ्मुखः ।।५४।।**

अविद्येने युक्त असलेला, पातकामध्ये मग्न असलेला, कामनांमध्ये गुंग असणारा रजोगुणी माणूस भक्तिमार्गापासून पराङ्मुख असतो.

**न स्मरति हरिं नैव वदति हि सुभाषितम् ।**
**अध्यात्मं विषतुल्यं हि तस्मै सौख्यं तु संसृतेः ।।५५।।**

जो हरिस्मरण करीत नाही, गोड बोलणे ज्याला आवडत नाही, अध्यात्म ज्याला विषाप्रमाणे वाटते त्यालाच प्रपंचामध्ये सुख वाटत असते.

**निंदावादे रतो नित्यं हरिदिने रतिप्रियः ।**
**इच्छति पापकर्मैव स न मुञ्चति राजसः ।।५६।।**

तो नेहमी निंदेमध्येच मग्न असतो. एकादशी दिवशी तो रतीमध्यें आसक्त असतो, असा राजस माणूस (पाप) कर्माचीच इच्छा करतो. तो त्या कर्माचा त्याग करीत नाही.

**आसक्तो विषये दृश्येऽल्पबुध्दिःपिशुनः स वै।**
**दैन्यवांस्तु सदैवैषोऽज्ञानांधकारसंयुतः ।।५७।।**

तो राजस माणूस अल्पबुध्दी व दुष्ट असतो, तो दृश्य विषयामध्येच आसक्त असतो, तो नेहमीच दीन व अज्ञानाच्या अहंकारात मग्न असतो.

**शठो नष्टः कृतघ्नस्तु दीर्घसूत्री खलः खलु ।**
**परूषवाग्विषादी वै योग्यो बोधाय नैव हि ।।५८।।**

तो लबाड,नष्ट, कृतघ्न, दीर्घसूत्री, दुष्ट, कठोर बोलणारा, विषाद बाळगणारा, असा उपदेशाला मुळीच पात्र नसतो.

**स्तनपानवियोगात्तु बालो भवति दुःखितः ।**
**वियोगाद्विषयस्यैव तथा जीवोऽकसंयुतः ।।५९।।**

लहान मूल स्तनपानापासून दूर केले असता दुःखी होते, तसाच तो विषयांच्या विरहामुळे दुःखी होतो.

**मत्स्यो यथा जलं त्यक्तुं नैव शक्नोति धर्मतः ।**
**मूढो जीवस्तथा नित्यं विषयान्न जहाति वै ।।६०।।**

मासा ज्याप्रमाणे स्वभावतःच पाण्यापासून दूर राहू शकत नाही, त्याप्रमाणे मूर्खजीव विषय

टाकू शकत नाही.

**श्रुत्वा पतिव्रताधर्मं स्वैरिणी नैव तुष्यति ।**
**उपदिष्टस्तथा मूर्खस्तृष्णां जहाति नैव हि ।।६१।।**

पतिव्रतेचा धर्म ऐकून स्वैर स्त्रीला आनंद होत नाही. त्याचप्रमाणे मूर्ख माणूस उपदेश ऐकूनही आपली विषयकामना सोडत नाही.

**दातृणां स्तवनं श्रुत्वा कृपणो दुःखसंयुतः ।**
**तथा तु ज्ञानिनो वाक्यं मूढान्दुनोति सर्वदा ।।६२।।**

दात्याची स्तुती ऐकल्यावर कृपण माणसाला दुःखच होते. तसेच ज्ञानी माणसाच्या बोलण्याने मूर्ख माणसाला दुःख होत असते.

**अशूरो युद्धवार्तां हि श्रुत्वा बिभेति विश्वतः ।**
**तथा न श्रूयते वार्ताऽऽत्मज्ञानस्याज्ञानिना बत ।।६३।।**

भित्रा माणूस युध्दाची वार्ता ऐकून अगदी घाबरून जातो. त्याचप्रमाणे अज्ञानी माणूस आत्मज्ञानाचे बोलणेसुध्दा ऐकण्यास तयार नसतो.

**सुंदरीं रतिसक्तां तु दृष्ट्वा क्लीबः पराङ्मुखः ।**
**तथा वेदांतबोधाय भीत्वा मूढः पलायते ।।६४।।**

रतीची इच्छा करणा-या सुंदर स्त्रीला पाहून नपुंसक तिच्यापासून दूर होतो, तसाच मूर्ख माणूस वेदान्तज्ञानाला घाबरून दूर जातो.

**गर्जनं नवमेघानां वायसेभ्यो भयप्रदम् ।**
**तद्वत्त्वज्ञनराणां वै न बोधः स्वसुखाय हि ।।६५।।**

(वर्षाकाळातील) नवीन ढगांची गर्जना ऐकून कावळे घाबरतात. त्याचप्रमाणे मूर्ख माणसांना आत्मज्ञान सुख देऊ शकत नाही.

**अपानद्वारि दुर्गंधः सौगंधान्नं हि भक्षितुः ।**
**तथा मुढे तु बोधो वै न हिताय भविष्यति ।।६६।।**

सुगंधि अन्न खाणा-या माणसाचा अपान वायू दुर्गंधच असतो. तसाच मूर्खाला केलेला बोध त्याचे कल्याण करीत नाही.

**सन्निधौ चंदनानां हि यथा वेणुर्निरर्थकः ।**
**सतां समागमस्त्वत्र मूढाय किं करोति वै ।।६७।।**

चंदनाच्या सहवासाचा वेळूवर जसा परिणाम होत नाही, तसाच मूर्खांवर सज्जनांच्या सहवासाचा परिणाम कसा होईल?

**एवं मूढाय तु ज्ञानं दुर्लभं किं बहूक्तया ।**
**यतः स मतिमंदो हि देहबुध्द्या प्रवर्तकः ।।६८।।**

अशा प्रकारे मूर्खाला ज्ञान प्राप्त होणे अशक्य आहे. अधिक बोलून काय फायदा? कारण बुध्दीने मंद असणारा तो देहबुध्दीप्रमाणेच जाणारा असतो.

**।। इति श्रीसिध्दान्तसंहितायां सोहिराविरचितायां शुद्धव्यतिरेकयोगो नाम पंचदशोऽध्यायः संपूर्णः ।।**

# अध्याय सोळावा

## जन्मदुःखकथन

**पूर्वपुण्येन कश्चित्तु लभेत स्वात्मतत्त्वताम् ।**
**तेनापि रक्षितव्यो ह्यभ्यासेनानुभवः सदा ।।१।।**

पूर्वपुण्याईमुळे एखाद्याला आत्मज्ञानाची प्राप्ती झालेली असते, त्यानेही अभ्यास (योगाभ्यास) करून आपल्या या अनुभवाचे रक्षण केले पाहिजे.

**अविद्याया महामोहो योगमायाप्रकल्पितः ।**
**तस्मात्तत्त्वविदा नित्यं त्याज्याः कामादयः खलु ।।२।।**

योगमायेने अविद्यारूपी महामोह निर्माण केला आहे. म्हणूनच तत्त्व जाणणा-याने काम, क्रोध इत्यादींचा त्याग केला पाहिजे.

**संकल्पान्नाशयेत्सर्वान् कुर्याध्दि संतसेवनम् ।**
**साधूनामूपदेशेन त्वभ्यासतत्परो भवेत् ।।३।।**

त्याने सर्व संकल्पांचा त्याग करावा. संतांची सेवा करावी. साधूंच्या (गुरुच्या) उपदेशानुसार योगाभ्यास करीत राहावे.

**कुरुते निरहंकृत्या कर्म तस्य मनः परं ।**
**अलिप्तामीक्षते दृश्ये सत्तां तु परमेश्वरीम् ।।४।।**

अहंकाराशिवाय जो कर्म करतो, त्याचे मन अलिप्त अशा परमेश्वरी सत्तेलाच दृश्य वस्तूंमध्यें पाहतें.

**परगोरक्षकानां त्वहंता गोषु पयःसु न ।**
**तथा कर्मफले ह्येव निरहंता परमात्मता ।।५।।**

दुस-यांच्या गायी राखणारा गुराखी, त्या गाईबद्दल जी ममता बाळगतो, ती त्यांच्या दुधाबद्दल नसते. तसा तत्त्वज्ञ कर्मफलाच्या बाबतीत 'मी'पणा बाळगत नाही.

**सहायेन नदीं तर्तुं नद्यामायाति यो नरः ।**
**स निरहंकृतिस्तद्वत्संतस्तु संसृताविह ।।६।।**

दुस-याच्या साहाय्याने नदी पार करू इच्छिणा-या माणसाला जसा (पोहण्याचा) अहंकार नसतो, तसाच प्रपंचाचा अहंकार नसतो.

**भववानपि संतस्तु निरहंकृतिमानसः ।**
**वीचिं बिभेति नौकास्थस्तथा साधुरहंकृतिम् ।।७।।**

संसारामध्यें असूनही साधूचे मन अहंकार बाळगत नाही. नावेमध्यें बसलेला माणूस लाटांना घाबरतो, तसाच साधू अहंकाराला घाबरतो.

**वृक्षछायास्थिताः पांथा निर्ममा हि परस्परम् ।**
**तद्वत्साधुः कुटुंबे वै निर्ममो निरहंकृतिः ।।८।।**

झाडाच्या सावलीत बसलेले वाटसरू परस्परांबद्दल उदासीन असतात. त्यांच्याप्रमाणेच संत आपल्या कुटुंबाबद्दल ममता ठेवीत नाहीत व अहंकारपण बाळगत नाहीत.

**ददाति दक्षिणां विप्रानाचार्यस्तु निरिच्छया ।**
**तद्वत्पुत्राद्यनेकेषु साधोर्निष्कामता सदा ।।९।।**

पुरोहित इतर ब्राह्मणांना दक्षिणा वाटत असताना जसा निरिच्छ असतो, तसाच साधू आपला पुत्र इत्यादिकांविषयीं निरिच्छ असतो.

**धात्री तु बालसंगोप्नी तथा साधुः प्रपंचकः ।**
**निःसंगो निर्ममः शुद्धो निरहंकृतिरेव हि ।।१०।।**

मुलाचे संगोपन करणा-या दाईप्रमाणेच साधू प्रपंचामध्ये आसक्ती न बाळगणारा असतो. तो पवित्र व निरहंकारी असतो.

**अलंकारैः परेषां वै स्वभार्या भूषिता यथा ।**
**तस्या निरभिमानं हि चित्तं तथा विदेहिनः ।।११।।**

दुस-याचे दागीने घातलेली स्त्री जशी त्या दागीन्यांबद्दल अभिमान बाळगत नाही, तसे विदेही माणसाचे मन निरभिमान असते.

**एवं निःसंगजातं वै बध्नाति संसृतिर्न हि ।**
**अनित्यं जीवितं तस्मान्मुक्तिसाधनमाचरेत् ।।१२।।**

अशा रीतीने निःसंग झालेल्या माणसाला संसार बाधत नाही. (असे असले तरी) जीवन अनित्य असल्यामुळे त्याने मुक्तीच्या साधनांचे नेहमी आचरण ठेवावे.

**अंते हि मूढयोनीनां नृयोनिः प्राप्यते ननु ।**
**सायुज्यमुक्ति संप्राप्तुं नृयोनिर्ज्ञानदा मता ।।१३।।**

कित्येक मूढयोनीनंतर शेवटी मनुष्ययोनी प्राप्त होते. सायुज्यमुक्ती मिळविण्यासाठी नरयोनीच ज्ञान प्राप्त करून देणारी आहे.

**भक्तिमीशस्य कर्तुं वै ना योग्यो नेतरस्तथा ।**
**अतो विषयभोगार्थं न योग्यः पशुवन्नरः ।।१४।।**

ईश्वराची भक्ती करण्यासाठी (जशी माणसाला) योग्यता आहे तशी इतर प्राण्यांना नाही, म्हणून माणसाने पशूप्रमाणे विषय भोगणे उचित नाही.

**किं सुखा संसृतिर्मिथ्या मोहिनी दुःखदा खलु ।**
**तस्यां शांतिस्तथाऽनित्या तृष्णाशांतिर्मृगांबुनि ।।१५।।**

मिथ्या असलेला संसार सुख कसे देऊ शकेल? तो मोह व दुःख देणारा आहे. प्रपंचातील शांति अनित्य आहे. मृगजळ पिऊन तहान कशी शांत होईल?

**जरायुवेष्टितो भ्रूणः संपृक्तो निरयेण वै ।**
**जठरव्यथानुभूतः सोऽनुतापं प्रयाति हि ।।१६।।**

गर्भाशयाने वेष्टिलेला गर्भ जणू नरकातच असतो. पोटामध्ये अनेक व्यथांमुळे त्याला पश्चात्ताप होतो.

**पूर्वकर्मानुसारं वै गर्भे भवति दुःखभाक् ।**
**गर्भदुःखं महत्तन्न जानंति मूढबुद्धयः ।।१७।।**

पूर्वजन्मीच्या कर्मानुसार त्याला गर्भामध्ये दुःख भोगावे लागते. मूर्ख माणसांना हे गर्भातील

दुःख किती मोठे आहे, ते समजत नाही.

**यावद्गर्भे वसेत्तावत्सोऽहं जपति नित्यशः ।**
**योनिद्वाराद्बहिस्त्वायात्यरोदीत्कोऽहमेव हि ।।१८।।**

जोपर्यंत गर्भात असतो तोपर्यंत 'सोहं' असा जप करीत असतो. योनीच्या द्वारातून बाहेर आल्यानंतर मात्र 'कोहं' अशा स्वरात तो रडू लागतो.

**सर्वेषां प्रियबालोऽपि कर्मभांडः सदैव हि ।**
**अज्ञो दुःखाधिकारी वै हेतुस्तु निधनाय सः ।।१९।।**

सर्वांना आवडणारा तो शिशू कर्ममार्गाचे भांडवलच करीत असतो. मूर्ख असा तो बालक दुःखाचा अधिकारी असतो व मृत्यूचेच कारण असतो.

**विक्षेपावरणैः साकं शरीरं वर्ध्दते यथा ।**
**तथा देहाभिमानोऽपि वर्ध्दते हि दिने दिने ।।२०।।**

विक्षेप व आवरण (या अविद्येच्या शक्तींच्या) बरोबर जसे प्रतिदिनी त्याचे शरीर वाढते, तसाच त्याचा देहाभिमानही रोजच वाढत असतो.

**परं युवा मदांधो हि कामासक्तो रतिप्रियः ।**
**विस्मृत्य सत्कृतिं शुध्दां स्वैरो भ्राम्यति सर्वतः ।।२१।।**

त्याला तारुण्य प्राप्त झाल्यानंतर मदांध असा तो कामासक्त व रतिप्रिय बनतो. तो सर्व शुद्ध अशी सत्कर्मे विसरतो व इकडे तिकडे स्वैर भटकत राहतो.

**जातो मरणमायाति मृतो जननमेव हि ।**
**न्यायेन वृक्षबीजानां जन्मकर्म पुनः पुनः ।।२२।।**

जन्माला आलेली प्रत्येक (व्यक्ती) मृत्यू पावतेच आणि मेलेल्या प्रत्येकाला झाड व बी यांच्या न्यायाने, पुनः पुन्हाः जन्म मिळत असतो.

**शुभाशुभक्रियासक्तो राजसस्तु विहारकः ।**
**सत्कर्मणा हि बद्धस्तु सात्त्विकोऽपि न संशयः ।।२३।।**

रजोगुणी पुरुष शुभ आणि अशुभ क्रियांमध्ये आसक्ती असलेला व विलासाचे कौतुक असलेला असा असतो आणि सात्त्विक पुरुष हा सत्कर्मांनीच निश्चितपणे बांधलेला असतो.

**अनेकपाशबध्दा हि त्वविद्यामयसंभवाः ।**
**जीवा भवे भ्रमंतो हि त्वनेककल्पनारताः ।।२४।।**

अनेक प्रकारच्या पाशांनी बांधले गेलेले, अविद्येतून निर्माण झालेले, अनेक कल्पना करण्यात मग्न असलेले जीव संसारात फिरत असतात.

**सकामपूर्वसत्कर्मो जीवो हि धनवानिह ।**
**आत्मज्ञानाच्च्युतो मूढो धनमदेन सर्वथा ।।२५।।**

पूर्वजन्मी केलेल्या सकाम कर्मांमुळे जीव या जन्मामध्ये धनसंपन्न होतो. असा जीव आत्मज्ञानापासून दूर असतो व संपत्तीच्या मदाने नेहमी मोहित असतो.

**अकृतपूर्वपुण्यो वै निर्धन इह जन्मनि ।**
**मूढः स ज्ञानहीनो हि शरीरवृत्तिचिंतया ।।२६।।**

पूर्वजन्मात ज्याने पुण्य केले नाही तो मनुष्य या जन्मात दरिद्री असतो. तो ज्ञानहीन असून जीवनविषयक चिंतांच्या विचारांमध्येच नेहमी मग्न असतो, असा तो मनुष्य मूर्खच असतो.

**नानाव्याधिसमुत्पन्नं दुःखं जरासमुद्भवम् ।**
**नाशयत्यवधानं तद्भगवत्स्मरणं कुतः ।।२७।।**

अनेक प्रकारच्या व्याधींमुळे निर्माण झालेले तसेच म्हातारपणामुळे झालेले दुःख हे सर्व अवधान नाहीसे करते. त्या वेळी ईश्वराचे स्मरण कसे बरे होणार?

**यत्र यांतींद्रियाण्येव शिथिलतां तथा मनः ।**
**स्मृतिभ्रंशं तु प्राप्नोति कुतस्तत्रात्मसाधनम् ।।२८।।**

ज्या वेळीं इंद्रियांचीं शक्ती नष्ट होते आणि मनाचा स्मृतिभ्रंश होतो, त्या वेळी परमार्थाची साधना कशी बरे शक्य आहे?

**इंद्रियाणां हि दौर्बल्यमिच्छाभिर्वर्ध्दितं बत ।**
**वार्ध्दक्यमेव दुःखाढ्यं तत्र बोधे रतिः कुतः ।।२९।।**

म्हातारपणामुळे इंद्रियें दुर्बळ झालेली असतात आणि इच्छा मात्र वाढलेली असते. खरोखर म्हातारपण हे दुःखाने भरलेले आहे, त्यावेळी आत्मज्ञानाचे प्रेम कसे बरे असणार?

**इच्छाक्षुब्धा मनोवृत्तिः प्राक् संभोगानुवर्तिनी ।**
**इंद्रियप्रातिकूल्यात्साऽहरहर्दुःखभागिनी ।।३०।।**

पूर्वी भोगलेल्या सुखांच्या आठवणीने त्या सुखांची इच्छा होऊन मनाच्या वृत्ती खवळून उठतात. त्यामुळे आणि इंद्रिये साथ देत नसल्यामुळे ही अवस्था प्रतिदिनी दुःख देणारी आहे.

**वातपित्तकफश्वासा वार्ध्दक्ये पीडयंति वै ।**
**कुतस्तत्रात्मविज्ञानं शीघ्रं भक्तियुतो भव ।।३१।।**

वार्धक्यामध्यें वात, पित्त, कफ, दमा वगैरे माणसाला पीडा करीत असतात. त्या वेळी आत्मज्ञान कसे बरे होणार? म्हणून ताबडतोब भक्तिमार्गाला लाग.

**जन्मैवं दुःखमूलं हि तस्मान्मा गच्छ जन्मतां ।**
**पुर्वजन्म पुनर्मृत्युः संसारस्तापदः खलु ।।३२।।**

जन्म हेच दुःखाला कारण आहे, म्हणून जन्मच घेऊ नकोस. पुनः जन्म, पुनः मृत्यू असा हा संसार खरोखर दुःख देणारा आहे.

**।। इति श्रीसिध्दान्तसंहितायां सोहिराविरचितायां जन्मदुःखकथनं नाम षोडशोऽध्यायः संपूर्णः ।।**

# अध्याय सतरावा

## नैष्कर्म्यसिध्दियोग

**स्वाधिकारोचितं कर्म निष्कामः कुरुते नु सत् ।**
**यो धर्मात्मा ह्यपापस्तु सत्कर्मप्रिय एव सः ।।१।।**

साधुपुरुष नेहमी आपल्या अधिकाराला योग्य असे जे निष्काम कर्म आहे तेच आचरतो.

**धर्म हा ज्याचा आत्मा आहे असा तो सत्पुरुष** संपूर्ण पापरहित असून सत्कर्मांचीच आवड असणारा असा असतो.

**नित्ययोगस्थितेनेह सत्कर्म क्रियते हि यत् ।**
**ब्रह्मार्पणं हि निष्कामं तद्रूपफलदं शुभम् ।।२।।**

नेहमीच योगामध्यें राहून निष्काम रीतिने जे सत्कर्म करून ब्रह्मार्पण केले जाते तेच खरोखर उत्तम फळ देणारे असते.

**दृश्यकारणलिंगं वै शरीरं नाशयेद्यदा ।**
**चिदाकाशं विकाशेतात्मप्रकाशेन वै तदा ।।३।।**

ज्या वेळी दृश्याला कारणीभूत असलेल्या लिंगशरीराचा नाश केला जातो त्याच वेळी आत्मप्रकाशाने चैतन्याचे आकाश विकसित होते.

**अधर्मं तु परित्यज्य स्वधर्ममाचरेत्सदा ।**
**आशंसेत विशुद्धत्वं ज्ञात्वा वै परमव्ययम् ।।४।।**

अधर्माचा त्याग करून नेहमी स्वधर्माचे आचरण ठेवावे. स्वतःची शुद्धता प्राप्त करून घेऊन नित्य अशा परमात्म्याचे ज्ञान करून घ्यावे.

**न शून्ये विद्यते पापं तद्रूपमात्मनो वदेत् ।**
**मूढो देहाभिमानी त्वविवेक्यनुभवं विना ।।५।।**

शून्यामध्ये पाप असत नाही, तेच आपले खरे रूप आहे. देहाभिमानी माणूस अनुभव नसल्यामुळे अविवेकी आणि मूर्ख असतो.

**शब्दज्ञानप्रवीणस्तु पाखंडी ह्येव नास्तिकः ।**
**केवलं विषयासक्तो ज्ञानं प्रपद्यते न सः ।।६।।**

पाखंडी आणि नास्तिक लोक केवळ शब्दज्ञानामध्ये हुषार असतात, ते केवळ विषयामध्ये आसक्त असतात (अशाने) त्यांना ज्ञान प्राप्त होत नाही.

**अमरो जायते त्वत्र सुधापानं विना कथम् ।**
**शब्दज्ञानेन मुच्यते कथं स्वानुभवं विना ।।७।।**

अमृताचे सेवन केल्याशिवाय अमरत्व कसे बरे प्राप्त होईल? तसेच अनुभव आल्याशिवाय व शब्दज्ञानाचा त्याग केल्याशिवाय (मोक्ष कसा बरे मिळेल?)

**नैव व्योम्नि मनःस्थैर्यं नैव तुष्टिर्निराश्रिते ।**
**नैव योगस्त्वलक्ष्ये वै तस्मै शांतिः कथं गिरा ।।८।।**

ज्याचे आकाशामध्ये मन स्थिर होऊ शकत नाही, ज्याला निराश्रितात (परमात्म्यात) समाधान होत नाही, जे अलक्ष्य आहे तेथे ज्याला योगप्राप्ती होत नाही, अशाला शब्दज्ञानाने शांति प्राप्त होणे शक्य नाही.

**श्रोता द्रष्टा च संपत्तिं नृपाणां किं नृपो भवेत् ।**
**अभ्यासेन विना मूढः शब्देन मुच्यते कथम् ।।९।।**

केवळ संपत्ती पाहून आणि ऐकून कोणी सम्राट होऊ शकतो का? त्याचप्रमाणे मूर्ख

माणूस योगाभ्यास केल्याशिवाय केवळ शब्दज्ञानाने मोक्ष मिळवू शकेल काय?

**क्लीबेन कामशास्त्रं कथ्यते स तेन किं पुमान् ।**

**नाट्यति नटो यत्तत्किं सत्यं हि कथं भवेत् ।।१०।।**

नपुंसक माणसाने कामशास्त्र सांगितले म्हणून तो पुरुष होईल काय? नटाने सोंग कितीही (हुबेहूब) उठविले तरी ते खरे होईल का?

**विषनाम सुधा प्रोक्तं तथा व्यालस्य नाम वै ।**

**धन्वंतरीति तद्वत्तु शब्दज्ञानं फलप्रदम् ।।११।।**

विषाला अमृत असे नाव दिले किंवा सापाला धन्वंतरी असे नाव दिले, तर ते जसे खोटे, तसेच शब्दज्ञान हे सर्व व्यर्थ आहे.

**वृष्ट्या मृगजलस्यैव धान्यवृध्दिः कथं भवेत् ।**

**गुरुः कथं भवेद्धीनो वैराग्यज्ञानभक्तिभिः ।।१२।।**

मृगजलाच्या वृष्टीने धान्याची वाढ कशी बरी होईल? तसेच ज्याला वैराग्य, ज्ञान आणि भक्ती नाही असा पाखंडी, गुरु कसा होऊ शकेल?

**दुष्टोक्तिं विश्वसेन्नैव वेश्याया लालनं यथा ।**

**द्रव्यलंपटमित्रं हि तथा पाखंडिनं गुरुम् ।।१३।।**

दुष्ट लोकांच्या बोलण्यावर, वेश्येच्या प्रेमावर, द्रव्यलोभी मित्रावर, त्याचप्रमाणे अनुभव नसलेल्या (पाखंडी) गुरुवर विश्वास ठेवू नये.

**दर्शनं भाषणं चैव तथा पाखंडिनो मतम् ।**

**वेदबाह्यमतस्त्याज्यं सद्योऽधोगतिदं खलु ।।१४।।**

नास्तिक माणसाचे दर्शन घेऊ नये, त्याच्याशी भाषणही करू नये. वेदविरूद्ध आहे म्हणून त्याच्या मताचा त्याग करावा. (याविरुद्ध) गोष्टी केल्याने ताबडतोब अधोगती मिळते.

**अर्थासक्तमनोबुध्दिः पाखंडी कीर्तितत्परः ।**

**मायावी कपटी तस्योपदेशो ज्ञानदः कथम् ।।१५।।**

पाखंडी, कीर्ती मिळविण्यात मग्न असतो. त्याचे मन आणि बुध्दी धनाच्या ठिकाणी आसक्त झालेली असतात. तो मायावी आणि कपटी असतो. त्याच्या उपदेशामुळे ज्ञानप्राप्ती कशी बरे होईल?

**विना स्वस्तुतिमन्यस्य स्तुत्यै कुप्यति दंभवान् ।**

**स्तुत्यो वर्ण्यो हि संभव्योऽहमेव मन्यते सदा ।।१६।।**

दांभिक मनुष्य दुस-याची स्तुती केली तरी रागवतो, त्याची स्तुती मात्र त्याला आवडते. स्तुतिवर्णन व पूजा करण्यास जर कोणी पात्र असेल तर तो मीच आहे, असे तो मानतो.

**प्राक्संस्कारं विना ज्ञानं वर्तमाने कुतो भवेत् ।**

**निःसंगो योगजिज्ञसुस्तं विना ज्ञानदः कथम् ।।१७।।**

पूर्वीचे संस्कार असल्याशिवाय या जन्मी ज्ञान कसे होणार? योगाची जिज्ञासा असल्याशिवाय व निःसंग झाल्याशिवाय गुरुपद कसे मिळू शकेल?

**चंदनस्यान्यवृक्षा न द्वेष्याऽद्वेष्या विजातयः ।**
**ज्ञानिनोऽपि तथा ह्यन्या अज्ञानाः स्थूलदेहिनः ।।१८।।**

चंदनवृक्ष अन्य वृक्षांचा द्वेश करीत नाही; परंतु इतर (झाडांच्या) जाती मात्र चंदनाचा द्वेष करतात. त्याचप्रमाणे ज्ञानी मनुष्य इतर अज्ञानी जीवांचा द्वेष करीत नाही.

**शर्करायास्तु साम्यं वै करोति श्वेतसैंधवम् ।**
**ज्ञानिनस्तु समत्वं ह्यायांति पाखंडिनस्तथा ।।१९।।**

पांढरे मीठ हे साखरेसारखेच दिसते. तसेच पाखंडी लोकही ज्ञानी माणसासारखेच दिसतात.

**हंसतां दर्शयेत्काकः काचो वै वज्रतां यथा ।**
**तथा पढतमूर्खो वै साधुतां दर्शयेद्बहिः ।।२०।।**

कावळा आपण हंस असल्याचे दाखविण्याचा प्रयत्न करतो. काच ही काही वेळा वज्रासारखी दिसते. तसाच पढतमूर्ख आपण साधू असल्याचे बाहेरून दाखवीत असतो.

**द्वेष्यं रौप्यं हि वंगेन सुवर्णं पित्तलेन तु ।**
**साधुः पाखंडिना द्वेष्य उदारस्तु कदर्युणा ।।२१।।**

कथील रुप्याचा द्वेष करते, पितळ सोन्याचा द्वेष करते, कृपण माणूस उदार माणसाचा द्वेष करतो, तसा पाखंडी, साधूचा द्वेष करतो.

**एवमज्ञानिना ज्ञानी शब्दयुक्त्या न मन्यते ।**
**देहबुध्देरहंभावस्तावज्ज्ञानं कथं व्रजेत् ।।२२।।**

म्हणून अज्ञानी मनुष्य केवळ शब्दज्ञानाच्या साहाय्याने ज्ञानी होऊ शकत नाही. 'मी देह आहे' असा अहंकार जोपर्यंत आहे, तोपर्यंत ज्ञानप्राप्ती कशी बरे होईल?

**ज्ञानान्निष्कर्मता साधौ मूढे सकामकर्मता ।**
**फलासक्तस्तु मूढो वै निष्कर्मतां कथं व्रजेत् ।।२३।।**

साधूला ज्ञानप्राप्ती झालेली असल्यामुळे निष्कर्मता प्राप्त होते. मूर्ख माणूस सकाम कार्य करणारा असतो. फळाची आसक्ती असणा-या अशा माणसाला निष्कर्मता कशी बरे प्राप्त होईल?

**सतां कर्मेव निर्मूलं कपित्थं गजभक्षितम् ।**
**मूढकर्म कपित्थं हि गर्दभभक्षितं यथा ।।२४।।**

सज्जनांची कामे ही हत्तीने खाल्लेल्या कवठाप्रमाणे (बीज नष्ट झालेली) असतात. मूर्खाने केलेली कर्मे मात्र गाढवाने खाल्लेल्या कवठाप्रमाणे असतात.

**दोषघ्नं जाह्नवीतोयं हरेण जीर्यते विषम् ।**
**तथा संतान्न बध्नाति कर्म ज्ञानेन सर्वथा ।।२५।।**

गंगेचे पाणी सर्व दोष नाहीसे करते. शंकर विष पचवून टाकतो, त्याचप्रमाणे ज्ञानामुळे साधूंना कर्म बंधनात टाकू शकत नाही.

**नैष्कर्म्यमश्नुते साधुर्मूढः सकामकर्मणि ।**
**रतौ मुक्तिदं नैष्कर्म्यं सकामं जन्मदं खलु ।।२६।।**

साधुलोक निष्कर्मता साधत असतात. मात्र मूर्ख लोक सकाम कर्म करण्यांत मग्न असतात. निष्कामकर्म केले असता मोक्ष मिळवून देणारे आहे आणि सकाम कर्म पुनः

पुन्हा जन्म देणारे आहे.

**ब्रह्मबोधभवः पूर्णो निर्धूतः सर्वकिल्बिषैः ।**
**स भवभयहर्ता वै महात्मा दुर्लभो भुवि ।।२७।।**

ब्रह्मज्ञान झालेला (साधू) सर्व पापापासून मुक्त झालेला असतो. तो पूर्णतेला पोहोचलेला असतो, तो पूर्वजन्माची भिती नाहीशी करणारा असतो, असा महात्मा पृथ्वीवर खरा दुर्लभच आहे.

**चिदाकाशे न पुण्याऽघे संतश्चिन्मय एव हि ।**
**अतो बध्दः कथं संतो देहस्वभावकर्मभिः ।।२८।।**

साधुलोक चैतन्यमय झाल्यामुळे, त्यांच्या चिदाकाशामध्ये, पुण्य आणि पाप दोन्हीही नसतात, म्हणून ते देहाच्या स्वाभाविक कर्मांनी कसे बांधले जातील?

**व्यष्टिः समष्टिरूपो यज्जीवो ज्ञानसमाश्रितः ।**
**जातस्तदा कुतः कर्मबंधो मुक्तस्य संसृतेः ।।२९।।**

ज्या वेळी व्यष्टिरूप असलेला जीव, ज्ञानाच्या आश्रयाने समष्टिरूप बनतो, त्या वेळी तो संसारापासून मुक्त होतो, त्याला कर्मांचे बंधन कसे बरे असणार?

**।। इति श्रीसिध्दान्तसंहितायां सोहिराविरचितायां नैष्कर्म्यसिध्दियोगो नाम सप्तदशोऽध्यायः संपूर्णः ।।**

# अध्याय अठरावा

## पूर्णसमाधियोग

**ज्ञानयोगविशुध्दानां शुभाऽशुभफलं न वै ।**
**मिथ्याऽविद्याप्रभावो न पुनर्जन्मो न विद्यते ।।१।।**

ज्ञानयोगाने शुद्ध झालेल्यांना शुभ व अशुभ ही दोन्ही प्रकारची फळे असत नाहीत. त्यांच्यावर मूलतःच खोट्या असणा-या अविद्येचा प्रभाव नसल्यामुळे त्यांना पुनर्जन्म असत नाही.

**ज्ञानलब्धोऽपि कुर्याव्दै श्रुतिना प्रतिपादितम् ।**
**स्वधर्मविहितं कर्म न्याय्यं धर्म्यं तथा शुभम् ।।२।।**

ज्ञान प्राप्त झालेल्या पुरूषानेही वेदानी सांगितलेली कर्मे केलीच पाहिजेत. सद्धर्माने सांगितलेले कर्म हेच न्याय, पवित्र व धर्मयुक्त असते.

**शाश्वतो ब्रह्मरूपो वै जातो लीलात्मकं जगत् ।**
**पश्यति सर्वगं ब्रह्म सोऽधर्ममाचरेत्कथम् ।।३।।**

नित्य असलेल्या ब्रह्मापासून लीलारूपाने हे जग झालेले आहे. सर्वत्र ब्रह्म पाहणारा (असा कोणी) अधर्माचे आचरण कसा बरे करील?

**कार्यार्थं तु जगत्सर्वं शरीरकारणस्य हि ।**
**कार्यकारणसंयोगाद्देहे निःसंगता कथम् ।।४।।**

शरीर हे कारण आहे, जग हे कार्य आहे म्हणून जीवामध्ये कार्य व कारण यांचा संयोग असल्यामुळे शरीर असेतोपर्यंत निःसंगता कशी येईल?

**यः स्वधर्मं परित्यज्य मोहालस्येन केनचित् ।**
**शब्दज्ञानेन ब्रूते स कथं नैष्कर्म्यमश्नुते ।।५।।**

जो स्वतःचा धर्म टाकून केवळ शब्दज्ञानाने निष्कर्मता सांगतो त्याला कारण, त्याचा मोह तरी आहे किंवा आळस तरी आहे. त्याला निष्कर्मतेची प्राप्ती कशी होईल?

**यस्य नान्वर्थनामैव रूपतुल्यं न नाम हि ।**
**स्वधर्मत्यागिनः साधुरितिसंज्ञा विडंबना ।।६।।**

जो स्वधर्माचा त्याग करतो, ज्याच्या रूपाप्रमाणे त्याचे नाव नाही, त्याला साधू असे म्हणणे ही त्या नावाची विडंबना आहे.

**नरनाम जगन्नाथोऽशक्तनामेश्वरो यथा ।**
**धर्मभ्रष्टस्य नामात्र साधुस्तथा न शोभते ।।७।।**

एखाद्या माणसाचे नाव जगन्नाथ ठेवावे, अगदी अशक्त माणसाला ईश्वर असे नाव ठेवावे (हे जशे शोभून दिसत नाही) त्याचप्रमाणे धर्मभ्रष्ट माणसाला साधू हे नाव शोभून दिसत नाही.

**दृश्यभ्रमो न यत्रैव क्रियते ब्रह्मसत्तया ।**
**इति संजातबोधस्य साधुर्हि नामता खलु ।।८।।**

ब्रह्मज्ञान झाल्यामुळे ज्याला थोडासुध्दा दृश्याचा भ्रम होत नाही, अशा प्रकारचे ज्ञान झालेल्या माणसाला साधू हे नाव योग्य आहे.

**लोहस्पर्शेन हि ज्ञानं परिसस्य हि यथैव तु ।**
**अस्थित्या देहभावस्यात्मज्ञस्य हि परीक्षणम् ।।९।।**

लोखंडाचा स्पर्श केला असताना जशी परिसाची परीक्षा होते, त्याप्रमाणे देहभाव नष्ट होणे हीच आत्मज्ञानाची परीक्षा आहे.

**सूर्यो जगदशेषं तु स्वप्रभया प्रतापयेत् ।**
**प्रभावो न हि गुप्तो वै सतां सत्त्वसमृध्दिजः ।।१०।।**

सूर्य सर्व जग स्वतःच्या तेजाने तापवून टाकतो, त्याचप्रमाणे सज्जनांच्या सत्त्वाच्या वाढीमुळे निर्माण झालेला प्रभाव गुप्त राहत नाही.

**स्वधर्मे वर्तमानो हि सुतेजा धार्मिकः स वै ।**
**आर्तानामेव संतोषो दर्शनाद्यस्य जायते ।।११।।**

आपल्या धर्माप्रमाणे आचरण करणारा तो धर्मनिष्ठ साधू अतिशय तेजस्वी असतो. त्याच्या दर्शनामुळेच आर्त लोकांना संतोष होतो.

**यस्य हृदि स्थिरं ज्ञानं स्वप्रकाशमगोचरम् ।**
**कर्तव्यहेतुशून्यं त्वहंकारभेदनाशकं ।।१२।।**

त्याच्या हृदयामध्ये स्वयंप्रकाशी, कोणालाही सहज न मिळविता येणारे असे ज्ञान स्थिर झालेले असते त्यामुळे त्याला काही कर्तव्य करावयाचे शिल्लक असत नाही व ते ज्ञान

अहंकाररूपी भेदाचा नाश करणारे असते.

**चिद्‌भानोरुदयो यत्र भवखद्योतघातकः ।**
**तद्वदात्मप्रभावो हि दृश्यभासविघातकः ।।१३।।**

चैतन्यरूपी सूर्याचा उदय झाला असता संसाररूपी काजव्याचा नाश होतो. तसेच आत्मज्ञानाच्या सामर्थ्याने सर्व दृश्याचा आभास नाहीसा होतो.

**ऐक्यमाद्यंतयोर्मध्यं सर्वं ब्रह्ममयं तथा ।**
**ईक्षते पूर्णबोधेन तन्मयः सन्सदग्रणीः ।।१४।।**

आदि, अंत आणि मध्य हे सर्व तो एकरूप असे पाहतो. तसेच ते सर्व ब्रह्मरूपामध्ये पाहतो. सज्जनामध्ये श्रेष्ठ असलेला तो साधू पूर्णज्ञानाने युक्त होऊन ब्रह्मरूप झालेला असतो.

**यस्यांतःकरणं पूर्णनिःसंगं निग्रहं स्थिरम् ।**
**इंद्रियार्थे ह्युदासीनं प्रारब्धं देहसंभवम् ।।१५।।**

त्याचे अंतःकरण निग्रहाने स्थिर असून पूर्णपणे निःसंग असते. तसेच तो विषयांच्या बाबतीत उदासीन असून, प्रारब्ध देहापुरतेच आहे, असा त्याचा निश्चय असतो.

**सदैवात्मानुरुपो वै स्वतंत्रो निरहंकृतिः ।**
**निर्गुणमव्ययं शांतं भोक्ता सुखं सुनिर्मलम् ।।१६।।**

नेहमीच आत्मरूप धारण केलेला तो अहंकारशून्य व स्वतंत्र असतो. तो अतिशय शांत, स्वच्छ, निर्गुण असून नेहमी नित्यसुख भोगत असतो.

**नित्यानंदनिधानो यो निष्कामो देहरक्षणे ।**
**निराभासं निराकाशं सदानुभविता स हि ।।१७।।**

नित्य आनंदाचा ठेवा असलेला तो, देहाच्या रक्षणाच्या बाबतीत निरिच्छ असतो. जेथे आभासही नाही, आकाशही नाही, अशा अवस्थेचा तो नेहमी अनुभव घेत असतो.

**चेतनातीतचैतन्यं नीरतिस्थानमेव हि ।**
**यत्सर्वस्यावसानं तु रमंते तत्र योगिनः ।।१८।।**

चेतनेच्याही पलीकडील जे चैतन्य, प्रेमाच्या पलीकडील जे प्रेम, असे जे सर्वांचे विलय होण्याचे स्थान आहे, त्या ठिकाणी योगी रममाण होतात.

**अवस्थात्रयहीनो हि पिंडब्रह्मांडनाशकः ।**
**समाधौ सुखभुंजानो निःसंगो निर्ममः समः ।।१९।।**

तिन्ही अवस्था नसलेला, पिंड आणि ब्रह्मांड हाही भेद नष्ट झालेला, समाधिसुखाचा अनुभव घेणारा, तो योगी निःसंग, समत्वबुध्दी बाळगणारा आणि ममताशून्य असतो.

**पुराणः प्रणवातीतः पुरुषः परमः परः ।**
**पतीतपावनः शुद्धो यस्तं पश्यंति साधवः ।।२०।।**

अतिशय प्राचीन, ओंकाराच्याही पलीकडे, पतितांना पावन करणारा असा जो शुद्ध, श्रेष्ठ पुरुष त्यावरच साधुलोकांचे लक्ष लागलेले असते.

**सत्ताप्रकाशमानो हि कोटिसूर्यसमप्रभः ।**
**संस्तुतः श्रुतिभिर्यस्तमेव ध्यायंति साधवः ।।२१।।**

जो कोटीसूर्याप्रमाणे तेजस्वी आहे, ज्याची सत्ता प्रकाशरूप आहे, श्रुतींनी ज्याची स्तुती

केलीली आहे, त्याचेच साधू ध्यान करीत असतात.

**इत्येवं बोधसंयुक्तः स योगीति प्रशंसितः ।**
**नराणामीदृशः कश्चित्कश्चित्तस्य परीक्षकः ।।२२।।**

अशा प्रकारचे ज्ञान असलेला जो पुरुष त्यालाच योगी म्हणतात. मानवामध्यें एखादा कोणी असा विरळा असतो आणि त्याला ओळखणाराही एखादाच असतो.

**कश्चिद्वक्ता हि साधूंना कश्चिच्छांतो हि वक्तृषु ।**
**शांतानां कश्चिदेकस्तु जगत्सत्यहितप्रियः ।।२३।।**

साधूमध्ये एखादाच (श्रुतींचा) वक्ता असतो व वक्त्यांमध्येही एखादाच शांत असतो आणि शांतामध्येही एखादाच जगाचे खरे हित इच्छिणारा असतो.

**कश्चिद्‌भक्तो नृणां मध्ये भक्तेषु कश्चिदेव हि ।**
**विरक्तस्तेषु कश्चिध्दि निःसंगो भक्तितत्परः ।।२४।।**

माणसांमध्ये एखादाच भक्त, भक्तांमध्ये एखादाच विरक्त, विरक्तांमध्येंही सर्वसंग त्याग करून भक्तीमध्येच मग्न असणारा एखादाच असतो.

**परमदुर्लभस्त्वत्र परिसः प्रस्तरेषु हि ।**
**तथाखिलनृणां मध्ये साधुः सुनिर्मलः खलु ।।२५।।**

असंख्य दगडांमध्ये परिस हा अतिशय दुर्मिळ असतो त्याचप्रमाणे सर्व लोकांमध्यें पवित्र असा साधू मिळणे कठीण असते.

**वक्तव्ये तु हरेर्नाम श्रोतव्येऽध्यात्ममेव हि ।**
**तद्वत्साधुर्मनुष्याणां मध्येऽपि वर्तते क्वचित् ।।२६।।**

वक्तृत्वामध्ये हरिनाम दुर्मिळ असते. तसेच ऐकावयाच्या गोष्टीमध्ये अध्यात्म दुर्मिळ असते आणि माणसांमध्येही एखादाच साधू असतो.

**जन्मना जायते दुःखं मरणे तु महद्‌भयम् ।**
**अतो जन्म न गृह्याति विरक्तो निर्मलः स वै ।।२७।।**

जन्मामुळे दुःखच होते आणि मरणामध्ये फार मोठी भिती असते म्हणून पवित्र असा विरक्त माणूस जन्मच घेत नाही.

**जन्मना जायते बंधो मातृपित्रोस्तथा स्वसुः ।**
**भ्रातुश्चैव हि दाराणां पुत्रादीनां तथापरः ।।२८।।**

जन्मामुळे अनेक बंध तयार होतात. आई, वडील, बहीण, भाऊ, पत्नी, मुले आणि आणखी कितीतरी ते बंध आहेत.

**जनोऽसौ देहसंगेन दुःखाब्धौ निमज्जति ।**
**शृणु वै तत्प्रकारं स्वकृतकर्मानुसारतः ।।२९।।**

माणूस शरीराच्या संगामुळे दुःखाच्या समुद्रात बुडतो. आपापल्या कर्मानुसार हे कसे घडते, त्याचा प्रकार आता ऐक.

**दारिद्र्यं प्रथमं दुःखं द्वितीयं सामुदायिकम् ।**
**तृतीयमयशोभूतं चतुर्थं मृत्युहेतुकम् ।।३०।।**

दारिद्र्य हे पहिले दुःख आहे, दुसरे दुःख हे लोकेषणेचे असून तिसरे अपयशाचे आणि

चवथे मृत्यूमुळे होणारे आहे.

**जन्म दुःखदमेवं तत् तस्मिंश्छुद्धसुखं कुतः ।**
**प्राप्तर्थं तु सुखस्यैव भजस्व परमेश्वरम् ।।३१।।**

अशा प्रकारे जन्म हा दुःखच देणारा आहे, तेथे शुद्ध सुख कसे बरे मिळणार? म्हणून सुखाच्या प्राप्तीसाठी परमेश्वराची भक्ती कर.

**श्रध्दां विना न तु ज्ञानं वैराग्यं तद्विना कथम् ।**
**वैराग्येण विना नैव निःसंगत्वं हि जायते ।।३२।।**

श्रध्देशिवाय ज्ञान प्राप्त होत नाही, श्रध्दा स्थिर वैराग्याशिवाय कोठून येईल? आणि वैराग्याशिवाय निःसंगत्व कसे येईल?

**ब्रह्मचर्यं विना नास्ति स्थिरं वैराग्यमेव हि ।**
**वैराग्येण स्थिरं ज्ञानं तेन भक्तिः स्थिरा भवेत् ।।३३।।**

ब्रह्मचर्याशिवाय स्थिर वैराग्य येत नाही. वैराग्याने ज्ञान स्थिर होते आणि ज्ञानामुळे भक्ती स्थिर होते.

**प्राप्यते स्थिरभक्त्या वै शांतिः परमदुर्लभा ।**
**प्राप्यते किं विना शांत्या निरालंबं सुखं परम् ।।३४।।**

स्थिर भक्तीमुळेच अत्यंत दुर्लभ असलेली शांति मिळते. शांतिशिवाय श्रेष्ठ असे ब्रह्मप्राप्तीचे सुख मिळू शकेल काय?

**निरालंबे स्थिरं चित्तं न चेत्तदा स मुह्यति ।**
**दृश्यासक्तस्य मोहेन जन्ममृती पुनः पुनः ।।३५।।**

ब्रह्माच्या ठिकाणी मन स्थिर झाले नाही तर जीव मोह पावतो. दृश्यावर आसक्ती ठेवल्यास मोहामुळे पुनः पुन्हाः जन्म मृत्यू मिळत असतात.

**ज्ञानाग्निदग्धमेवात्र हेतुबीजं हि कर्म यत् ।**
**यदा भवेत्तदा शीघ्रं सहजा मुक्तिरूपता ।।३६।।**

जन्ममृत्यूचे कारण असलेले हेतुबीज (म्हणजे जे कर्म ) तेच ज्ञानरूपी अग्नीने जाळल्यानंतर स्वाभाविक असलेला मोक्ष लगेच मिळतो.

**ज्ञानकर्मफलत्यागोऽभ्यासेन साध्यते हि सः ।**
**अतः सदा यतस्व त्वं सद्भक्त्यभ्यासयोगतः ।।३७।।**

ज्ञान आणि कर्म यांच्या फलाचा त्याग अभ्यासानेच साध्य होतो. म्हणून तू नेहमी सद्भक्ती व योगाभ्यास करण्याचा प्रयत्न कर.

**सुस्नायात्प्रातरेवोपविशेत्तु स्वासने शुचिः ।**
**ध्यायेन्निर्गुणमेवैकं यावत्स्वानुभवोंऽतरे ।।३८।।**

सकाळी स्नान करून आपल्या पवित्र आसनावर बसावे आणि केवळ निर्गुण ब्रह्माचे आपल्या मनामध्ये (रोज) अनुभव येईपर्यंत ध्यान करावे.

**दृष्ट्या ह्येकाग्रया ध्यायेद् दृश्यवर्जितया हृदि ।**
**सर्वसाक्षिणमेवैकं स्वात्मरूपं निरंकुशम् ।।३९।।**

दृश्यावरील लक्ष बाजूला सारून दृष्टी एकाग्र करून, हृदयांमध्ये सर्वसाक्षी, निरंकुश अशा

आत्मरूपाचे ध्यान करावे.

**क आदिः कोंऽत एवं हि कावस्य पितरौ तथा ।**
**का जातिरस्य किं रूपं किं गृहं स परीक्षते ।।४०।।**

तो जो साक्षी आहे, त्याची सुरुवात कोठे झाली, त्याचा शेवट कोठे झाला, त्याचे माता, पिता कोण, त्याची जाती कोणती, त्याचे रूप कसे आहे, तसेच त्याचे घर कोणते याचे परीक्षण करावे.

**को वर्णस्तत्र कः संगः परापरेऽस्य के तथा ।**
**को योगस्तत्र का प्राप्तिरिति विचिंत्यते ननु ।।४१।।**

(पुढे) त्याचा रंग कोणता, त्याचा संग कोणाशी आहे, त्याच्या मागेपुढे कोण आहेत, त्याचा योग कोणता, त्याची प्राप्ती कशी होते याचा विचार करावा.

**लक्षेण लक्षितं तस्मिंल्लक्षं वै रमते यदा ।**
**व्यतिरेको भवस्यैवान्वयः परमात्मनः खलु ।।४२।।**

तेथे चित्त रमले की सर्व साध्य सिद्ध झाले. प्रपंचाचा व्यतिरेक म्हणजेच परमात्म्याचा अन्वय होय.

**तत आद्यंतहीनं तत्सिध्दं विशुद्धमेव हि ।**
**जातिशून्यं तथा रूपं पूर्णमंतःस्थमीक्षते ।।४३।।**

आदि व अंत नसलेले, सिद्ध व अतिशय पवित्र असलेले, कोणतीही जात, रूप नसलेले ते पूर्णरूप त्याने (आपल्या) हृदयामध्ये पाहावे.

**अवर्णं खप्रभं त्वेव निःसंगं निरुपाधिकम् ।**
**भावाऽभावविहीनमव्ययमीक्षते स हि ।।४४।।**

(कोणताही) रंग नसलेले, आकाशाची प्रभा असलेले, संग नसलेले, उपाधिविरहित, भाव व अभाव यांच्या पलीकडे असलेले ते अविनाशी ब्रह्म त्याने पाहावे.

**तन्मातृणां हि माता वै पितृणां तु तथा पिता ।**
**अजातिः सर्वजातीनां सर्वभासप्रकाशकम् ।।४५।।**

ते (ब्रह्म) सर्व मातांची माता आहे, ते सर्व पित्यांचा पिता आहे, सर्व जातीपासून ते अजातीय आहे व सर्व भास प्रकाशित करणारे, असे ते आहे.

**कोशस्तु सर्वकोशानां सर्वेषां यशसां यशः ।**
**अवेषः सर्ववेषानां तपःकर्ता तपस्विनाम् ।।४६।।**

(ब्रह्म हे) सर्व कोशांचा कोश आहे. सर्व यशांचे ते यश आहे. सर्व वेषधा-यांमध्ये ते वेषरहित आहे. सर्व तपस्व्यांमध्ये ते श्रेष्ठ आहे.

**सर्वातीतं परं ब्रह्म परात्मानं हि चिंतयन् ।**
**द्विदलयोर्भ्रुवोर्मध्ये प्राणायामपरायणः ।।४७।।**

ब्रह्म हे सर्वांच्या पलीकडील आहे. त्या परमात्म्याचे, प्राणायाम करणारे योगीलोक, भ्रूमध्याचे ठिकाणी द्विदलचक्रामध्ये (आज्ञाचक्रामध्ये) ध्यान करतात.

**इडा तु वामनाडिः स्यात्पिंगला दक्षिणा तथा ।**
**सुषुम्ना मध्यनाडी त्रिवेणी तत्संगजा खलु ।।४८।।**

इडा ही डावी नाडी आहे, पिंगला उजवी नाडी आहे आणि सुषुम्ना ही मध्यनाडी आहे. या तिन्हींचा संगम हीच त्रिवेणी आहे.

**त्रिवेणीयं महातीर्थं दीर्घपापविनाशनम् ।**
**संतापशमनं शांतं समाधियोगसाधनम् ।।४९।।**

ही त्रिवेणी महातीर्थ आहे, ते मोठ्या पापांचा नाश करणारे आहे. ते तीर्थ, शांत, ताप नाहीसे करणारे व समाधियोग सिद्धकरून देणारे आहे.

**प्राणापानसमानैस्तु व्योमगं सूक्ष्ममानसम् ।**
**कृत्वा त्रिकूटमुल्लंघ्य विकारान्वर्जयेत्ततः ।।५०।।**

प्राण, अपान व समान यांच्या साहाय्याने मन सूक्ष्म करून त्याला आकाशात (ब्रह्मरंध्रात) नेऊन त्रिकूटाचे उल्लंघन करावे. त्यामुळे सर्व विकार नाहीसे होतात.

**श्रीहटं पीतवर्णं हि जलतत्त्वेन संगतम् ।**
**तत्रोपरम्य स्वारक्तमावरणस्य नाशकम् ।।५१।।**

यानंतर श्रीहाटमध्ये लक्ष केंद्रित करावे. हे श्रीहाट पिवळ्या रंगाचे जलतत्त्वाचे आहे. (योग धारणेमुळे) तेथे लालरंगाचा भास होतो; ते आवरणाचा नाश करणारे आहे.

**निर्मूलं दृश्यभासं हि सबाह्यांतरशून्यतः ।**
**तस्योपरि हि गोल्हाटं सुदृष्टत्वमबाधितम् ।।५२।।**

ज्या ठिकाणी प्रवेश झाला असता, बाहेरील व आतील दृश्याचा भास संपूर्णपणे नाहीसा होतो असे (श्रीहाटा) नंतर गोल्हाट हे स्थान आहे. या ठिकाणी प्रवेश केला असता ध्यान अबाधित राहते.

**तेजोमयं समं सर्वव्यापकं पीतमेव हि ।**
**तत्र शून्यविनाशो वै ततो ब्रह्म सनातनम् ।।५३।।**

ते (गोल्हाट) तेजरूपी व सर्वव्यापक असून पिवळ्या रंगाचे आहे. तेथे शून्याचा नाश होतो व नंतर ब्रह्मप्राप्ती होते.

**भवभ्रमस्य भासो न ह्यज्ञानकारणस्तथा ।**
**तत्परमौटपीठं हि वायुमंडलसंज्ञितम् ।।५४।।**

(गोल्हाटा) नंतर औटपीठ आहे. त्या ठिकाणी संसाराचा, अज्ञानामुळे होणारा भ्रम नाहीसा होतो. त्यालाच वायुमंडळ असे नाव आहे.

**वायुमूले मनः कर्यादेकाग्रमर्धमातृकम् ।**
**आत्मध्यानपरं संस्थं तत्पदेन समाश्रितम् ।।५५।।**

त्या वायुमंडळावर चित्त एकाग्र करावे. त्या स्थानामध्ये ( ओंकाराची) अर्धमात्रा म्हणजे तत्पदाचे (आत्म्याचे) ध्यान करावे.

**सर्वज्ञं साक्षिभूतं हि ब्रह्म तदहमस्मि वै ।**
**निरीक्षंते सदा संता अवस्थात्रयवर्जिताः ।।५६।।**

तेथे तिन्ही अवस्थांच्या पलीकडे गेलेले साधू नेहमीच सर्वज्ञ, साक्षिरूप ब्रह्म 'ते मी आहे' असे पाहत असतात.

**निरंजनोऽप्यरूपोऽस्मि निश्चलोऽहं निरामयः ।**
**निर्गुणो निर्विकारोऽनुभव आत्मस्थितिः परा।।५७।।**

मी निरंजन आहे, मी अरूप, निश्चल, निरामय आहे, मी निर्गुण, निर्विकार आहे, असा अनुभव येणे हीच श्रेष्ठ आत्मस्थिती आहे.

**अजोऽहं शाश्वतोऽहं त्वेवाव्ययोऽहं सनातनः ।**
**आनंदोऽहं निमग्नोऽहं निर्द्वंद्वोऽहं निराश्रयः ।।५८।।**

मी अज, नित्य, अव्यय, सनातन, आनंदरूप, सर्वव्यापी द्वंद्वातीत व आश्रयरहित आहे...

**अहं जनार्दनो नित्य ओंकारोऽहं तथैव हि ।**
**साक्ष्यहं सर्वभूतानां व्यापकोऽहं परात्परः ।।५९।।**

मी (लोकांच्या लिंगदेहाचे मर्दन करणारा) जनार्दन आहे, नित्य ओंकार आहे, मी सर्वभूतांचा साक्षी, व्यापक व परात्पर आहे...

**अनादिरादिरंतोऽहमहं मध्यश्चिदात्मकः ।**
**सर्वज्ञानमयोऽहं हि परमहंस एव हि ।।६०।।**

मी अनादि, आदि, अंत व मध्य आहे, मी चैतन्यमय सर्वज्ञानरूपी परमहंस आहे...

**अहमलक्ष्यमद्वैतं ज्ञप्तिमात्रं हि केवलम् ।**
**नादबिंदुकलातीतं देवानां दैवतं तथा ।।६१।।**

मी अलक्ष्य, अद्वैत, ज्ञानरूप, नादबिंदुकलांच्या पलीकडे असलेले देवांचेही दैवत आहे, याचा अनुभव घ्यावा.

**एवं पूर्णा ह्यवस्था वै सर्वावस्थाऽघनाशिनी ।**
**परमामृतसंतृप्ता तया त्वमक्षयो भव ।।६२।।**

अशी ही सर्व अवस्थांच्या पलीकडील पूर्णावस्था सर्व पापांचा नाश करणारी आहे. ही अमृताने पूर्ण असलेली अवस्था प्राप्त करून तू अमर हो.

**सहस्त्रदलपद्मं तु मानसभृंगसंयुतम् ।**
**उन्मनी सात्ववस्थानैवेत्ति वै श्रुतिसंमतम् ।।६३।।**

सहस्त्रदलकमलामध्ये मनोरूपी भुंगा प्रवेश करतो, त्याला उन्मनी म्हणतात. या स्थितीला अवस्था म्हणणे योग्य नाही, असे वेद सांगतात.

**उन्मनी ब्रह्मरूपा वै निजधामप्रकाशिनी ।**
**निःसंगा हि गुणातीता त्वात्मसंस्थानमंदिरे ।।६४।।**

उन्मनी ही ब्रह्मरूप असून स्वतःचे स्थान प्रकाशित करणारी, आत्ममंदिरात वास्तव करणारी, निःसंग व त्रिगुणांच्या पलीकडे असलेली आहे.

**अक्षयं हि निराकारं चर्मदृष्ट्या न दृश्यते ।**
**येन वै दिव्यमानं हि तत्त्वमसि त्वसंगतः ।।६५।।**

ते अक्षय व निराकार ब्रह्म चर्मदृष्टीने दिसत नाही. देहाची संगती सोडली तर 'ते तू आहेस' असे दिव्य ध्यान तुला करता येईल.

**स्वयमेव स्वतंत्रोऽयं चिन्मयो भवतारकः ।**
**धर्मसंस्थापनार्थाय संभवति युगे युगे ।।६६।।**

हाच स्वयम स्वतंत्र चैतन्यरूपी, संसारापासून रक्षण करणारा परमेश्वर, धर्माची स्थापना करण्यासाठी प्रत्येक युगात अवतार घेत असतो.

**तत्परो भक्तकार्यार्थं चिंतामणिस्तु चिंतने ।**

**अकल्प्यः कल्पवृक्षोऽयं पूर्णब्रह्म परात्परः ।।६७।।**

तो भक्तकार्यासाठी तत्पर आहे. त्याचे चिंतन केले तर तो चिंतामणी आहे. कल्पनेच्या पलीकडे असा तो कल्पवृक्ष आहे. तोच सर्वश्रेष्ठ पूर्णब्रह्म आहे.

**त्रैलोक्यस्य प्रभुत्वे त्वाश्चर्यं वंध्यात्मजे यथा ।**

**अन्वये निर्विकारे तु कुतो द्वैतस्य विभ्रमः ।।६८।।**

त्याला त्रैलोक्याचा प्रभू म्हणणे हे एक आश्चर्यच आहे. जसे वांझेचा मुलगा म्हणजे एक आश्चर्यच नव्हे का? निर्विकारामध्ये (ब्रह्मामध्ये) अन्वय झाला असता द्वैत कसे बरे असेल?

**इत्येवं पूर्णबोधोऽयं प्राप्यते पूर्वसत्कृतात् ।**

**जीवितस्य विनाशाय त्वात्मलाभसुखप्रदः ।।६९।।**

अशा प्रकारचे हे पूर्णज्ञान पूर्वपुण्याईमुळेच प्राप्त होते. हे ज्ञान झाले असता पुर्वजन्माचा नाश होतो व आत्मप्राप्तीचे सुख मिळते.

**सुखदुःखभयं नास्ति शुभाऽशुभे तथा न हि ।**

**न जीवशिवयोर्भेदो भेदशून्ये परात्परे ।।७०।।**

भेदरहित (परात्पर) ब्रह्माच्या ठिकाणी सुख व दुःखाची भीती, शुभ किंवा अशुभ नसते. तसेच जीव, शिव हाही भेद तेथे असत नाही.

**उदयास्ते न यत्रैव तमसस्तु विनाशनम् ।**

**सर्गस्थितिलयानां यत्कारणं पूर्णबोधकम् ।।७१।।**

त्या ठिकाणी उदय व अस्त असत नाहीत, अंधाराचा पूर्ण नाश असतो, असे पूर्णज्ञानब्रह्म उत्पत्ती, स्थिती व लय यांचे कारण आहे.

**त्रिपुटिशून्यमेवं वै द्वयोः साम्यं तु तत्र हि ।**

**सिद्धसाधनयोर्ध्यातृध्येययोर्गुरुशिष्ययोः ।।७२।।**

ते ब्रह्म त्रिपुटीरहित आहे. त्या ठिकाणी सिद्ध व साधन, ध्याता व ध्येय, गुरु व शिष्य या दोहोंमध्ये एकत्व असते.

**सिंधुगंगे यथा तुल्ये जीवेशौ तु तथा समौ ।**

**सदाऽसौ नित्यमुक्तो हि जीवन्मुक्तो निरामयः ।।७३।।**

समुद्र व गंगा जसे एकरूप होतात, तसेच त्या वेळी जीव व शिव एकरूप होतात आणि तो जीवन्मुक्त सर्व विकारांपासून मुक्त होऊन नित्यमुक्त होतो.

**बोधेन परिपूर्णो हि प्रसन्नपरमेश्वरः ।**

**स पुमानेव ह्यन्यस्त्वजातबोधः पशुः खलु ।।७४।।**

तोच पुरुष ज्ञानाने परिपुर्ण झाला, ज्याला परमेश्वर प्रसन्न झाला, बाकी सर्व अज्ञानी हे पशूसमानच आहेत.

**नराणां परमो धर्मो हृत्स्थो ज्ञायेत सर्वदा ।**
**प्रपद्येत हि तद्रूपं भूयेत तन्मयं तथा ।।७५।।**

हृदयातील परमेश्वराला ओळखणे हाच माणसासाठी श्रेष्ठ धर्म आहे. त्यामुळे (ईश्वराशी) तद्रूपता व तादात्म्य प्राप्त होते.

**प्राप्य मानुषजन्मैव ब्रह्मरूपं न याति यः ।**
**अजागलस्तनस्यैव तस्य जन्म निरर्थकम् ।।७६।।**

मनुष्यजन्म प्राप्त होऊन, जो ब्रह्मरूप प्राप्त करीत नाही, अशा माणसाचा जन्म शेळीच्या गळ्यामध्ये असलेल्या स्तनाप्रमाणेच निरर्थक आहे.

**ब्रह्मभूतः पुमान्यः स कृतार्थ इह जन्मनि ।**
**प्राग्जन्मसुकृतैः पूर्णैर्ब्रह्मज्ञानं तु जायते ।।७७।।**

जो पुरुष ब्रह्मरूप झाला त्यानेच आपल्या जन्माचे सार्थक केले. पूर्वजन्माच्या पूण्याईमुळेच ब्रह्माचे पूर्णज्ञान होते.

**जन्मन्यनेकजन्मानां मृत्यूनां हि मृतौ तथा ।**
**विनाशयेध्दि दुःखानि जन्मादिर्न पुनः पुनः ।।७८।।**

अनेक जन्म घेत असता,एकाच जन्मात, मृत्यूलाच मारले असता दुःखांचा नाश होतो व पुनः पुन्हा जन्म, मृत्यू होत नाहीत.

**योगयत्नेन नश्यंते नानायत्नाः पृथग्विधाः ।**
**प्राप्यते येन पूर्णं हि ब्रह्मपदं निरामयं ।।७९।।**

योगाच्या साधनेने अनेक प्रकारच्या यत्नांची आवश्यकता पूर्णपणे नष्ट होते आणि योग्याला निरामय, पूर्ण ब्रह्मपद प्राप्त होते.

**एवं व्यष्टिसमष्ट्योश्च ऐक्यं सायुज्यमुक्तिदम् ।**
**ज्ञप्तिमात्रानुभूतं तु परं वै स्वप्रकाशकम् ।।८०।।**

अशा प्रकारे व्यष्टि व समष्टि यांची एकता करणारे सायुज्यमुक्ती देणारे, ज्ञानानेच अनुभवाला येणारे, स्वयंप्रकाशी, असे हे ब्रह्म आहे.

**यस्मिंस्तु नैव विद्यंते दृश्यभावा जगन्मयाः ।**
**तन्निरामयसत्यं तु सद्गुरोः पदमाप्नवम् ।।८१।।**

(त्या योग्याला) ज्या ठिकाणी विश्वरूपी दृश्यभाव मुळीच असत नाहीत, ते निर्विकार सत्य म्हणजेच सद्गुरुचे स्थान प्राप्त होते.

**सदैव सुभगा तुर्या युवत्यगोचरा कला ।**
**आयाद्भर्तारमात्मानं समाधिरतितत्परा ।।८२।।**

(अशा वेळी) जी अखंड सौभागिनी तरुणी, अशी अगोचर कला म्हणजेच समाधिरूपी तुर्यावस्था, ती अतिशय उत्सुकतेने आपला पती, जो आत्मा, त्याला भेटण्यासाठी येते.

**व्याकरणेऽनभिज्ञस्य शास्त्रमजानतश्च मे ।**
**संजाता स्फूर्तिरेवैषा सहसा गीःप्रकाशका ।।८३।।**

(सोहिरोबा म्हणतात), मला व्याकरण समजत नाही व शास्त्रांचा अभ्यासही मी केलेला नाही. असे असताना ही (संहितारूपी) वाणी माझ्या ठिकाणी अचानक स्फूर्तिरूपाने

प्रकट झाली आहे.

**सोहिरारचितं शास्त्रं चैतन्योक्तं तु मुक्तिदम् ।**

**सिध्दान्तसंहितानाम त्वात्मज्ञानफलप्रदम् ।।८४।।**

सोहिरोबाकडून हे शास्त्र प्रत्यक्ष चैतन्यानेच बोलविलेले आहे त्या शास्त्राचे नाव 'सिद्धान्तसंहिता' असून ते आत्मज्ञानरूपी फल व मुक्ती देणारे आहे.

**।। इति श्रीसिध्दान्तसंहितायां सोहिराविरचितायां पूर्णसमाधियोगो नामाष्टादशोऽध्यायः संपूर्णः ।।**

---

# संत सोहिरोबांचे काही अभंग

## १. हरिभजनावीण काळ घालवूं नको

हरिभजनावीण काळ घालवूं नको रे ।।ध्रु.।।

संतसंगतिनें उमज, ध्यानिं आणुनि पुरता समज । अनुभवावीण उगीच मान, हालवू नको रे ।।१।।

दोरीच्या सापा भिऊनि भवा, भेटी नाही जीवा शिवा । अंतरिंचा ज्ञानदिवा मालवू नको रे ।।२।।

विवेकाची ठरेल ओल, ऐसे बोलावे कीं बोल । आपुल्या मतें उगाच चिखल, कालवूं नको रे ।।३।।

सोहिरा म्हणे ज्ञानज्योति, तेथें कैंचि दिवसराति । तयाविणें नेत्रपातिं, हालवूं नको रे ।।४।।

## २. तुजविण रे भगवान

तुजविण रे भगवान, कोठेंचि मन हें न जडो ।।ध्रु.।।

मिथ्या ऐसें दिसोनि सकळिक, विषयसुख नावडो । प्रारब्धास्तव जें जे समयीं, घडेल तें सुखिं घडो ।।१।।

योगलक्षण निजधैर्यबें, जीव मोहांत न सांपडो । आयुष्य सरल्या मग, केव्हा देह पडेल तेथें पडो ।।२।।

प्रपंचरहाटीं वर्तत असतां, कोणिकडे न आडो । वैराग्यअग्निनें प्रचंड होऊनि, अखंडित कडकडो ।।३।।

म्हणे सोहिरा विपरीतबुध्दी, कुसंग हा विघडो । निमिष साधुनी केवल ब्रह्मिंचें, मोक्षद्वार उघडो ।।४।।

## ३. पतितपावन दीनदयाघन

पतितपावन दीनदयाघन करुणाकर देवा । श्रवण मनन निदिध्यासें निरंतर घडो तुझी सेवा ।।ध्रु.।।

परम प्रकाशक तेजोमय हें गुप्त तुझें स्वरुप । परतुनि दृष्टि पाहणें पाहतां निर्गुण हें अरूप ।
परमार्थ परिपूर्ण साधनीं भरलें हें अमुप । परात्पर तूं अंतरसाक्षी हृदयभुवनदीप ।।१।।

तीन्ही संधि साधुनि घेणें सुख हें एकांतीं । तीन्हीं गुण हे निरसुनि शून्यीं उगवलि हे ज्योती ।
तीक्ष्ण ज्ञानें पुरतें पाहतां कुळ नाहीं याती । तितुकी प्रतीति बाणलिया मग दिवस नाहीं राती ।।२।।

तलगत तलगत सकळहि जीव हे चित्सिंधू-आंत । तरंग जैसे उमटत भासत नासतही बहुत ।
तरणोपाय सांगति साधू मत हें सिध्दान्त । तरले येणें मार्गें बहुत देहिं देहातीत ।।३।।

पान्हा पिऊनी प्रेमकळेचा हरिलें संकल्पा । पाहतां पार परेनें भवभय दोरीच्या सापा ।
पारंगत हे करूनि सकळहि अहं सोहं कापा । पारख करितां तटस्थ जाहल्या नेत्रांच्या मलपा ।।४।।

वरिली शांति आंगिं जाहला पूर्ण अनुभव । वरदबळें सद्‌गुरुप्रसादें अक्षय वैभव ।
वमिलें सकळहि मायिक आतां नाहीं भवभय । वदली वाणी मौनपणीं हें रूप नाहिं नांव ।।५।।

नम्र होऊनी वृत्ति लागली अलक्ष हे लग्न । नटत नटत हे लोक सकळही होऊनिया भग्न ।
नख नलगे जेथ देहबुध्दिचें विकासले गगन । नमुनि सोहिरा म्हणेचि अवघा अलख निरंजन ।।६।।

## ४. वंदियला भगवंत

वंदियला भगवंत । तो म्यां वंदियला भगवंत ।।ध्रु.।।
भवसिंधु तारक निजसुखकारक । सकळां आदी अंत ।।१।।
सज्जनरंजन अखिल निरंजन । भक्तजना कृपावंत ।।२।।
वेद झाले मुके शेष न स्तवूं सके । ज्याचें रूप अनंत ।।३।।
नव्हे नरनारी गैबी सूत्रधारी । हालवि जो जिवजंत ।।४।।
म्हणे सोहिरा अनुभविं पाहणें । चित्सुखवनवसंत ।।५।।

## ५. जगजीवनजी दीनोध्दार

जगजीवनजी दीनोध्दार ।ध्रु.।।
आत्मानात्मविवेकसुमतिसुख दावीं सारासार । लटिकें देह हें गेह करूनि जीव भोगितसे दुःख फार ।।१।।
मुक्त करुनियां गुप्त स्वरुपिं दे दर्शन उक्त प्रकार । विश्वंभर करुणाकर लवकर भवसिंधू करिं पार ।।२।।
योगयुक्ति दे शून्य मंडळीं मन हें जाऊं एकवार । भक्त काज-कल्पद्रुम सद्गुरु दाता परम उदार ।।३।।
म्हणे सोहिरा कामक्रोध मदमत्सर दानव मारुनि उतरीं भार। युगायुगीं तूं धरिसी नाना रूपीं लिळावतार ।।४।।

## ६. आम्ही नहों हो पांचांतले

आम्ही नहों हो पांचांतले, नहों पंचविसांतले ।
एवढ्यालाहि वळखोनिया, वेगळे आम्ही आंतले ।।ध्रु.।।
सत्त्व, रज, तम आम्ही, नहों त्रिगुणांतले । केवढाही प्रपंच केला तरी नहों आम्ही त्यांतले ।।१।।
आम्ही नहों हो मंत्रांतले, नहों हो तंत्रांतले । बहुत बोलुनि काय, आम्ही नहों मायेच्या यंत्रांतले ।।२।।
आम्ही नहों हो लक्षांतले, नहों हो पक्षांतले । सोहिरा म्हणे अनिर्वाच्य, आम्ही केवळ अलक्ष्यांतले ।।३।।

## ७. दुनियांके हरहुनर देख

दुनियांके हरहुनर देख
सुरत सब नबी रतनपर जडीत जवा बनवा ।।ध्रु.।।
उलट पलख पर दर्शन लेकर आधाचंद्र पीवा । अहं धरम कोही गरम नरम यहि सबका दरद मुवा ।।१।।
नादबिंदूके ऊपर दोहती अनाद गैब गौवा । ऊर्ध्वशून्यमें दिलकूं गारत अमृत क्षीर पिवा ।।२।।
कहत सोहिरा नैनोमें देख्या तीन्हो लोकको हवा । जल स्थल पवन गगन छोडकर लगनमें मगन हुवा ।।३।।

## ८. दिल मेरा आराम पाया

दिल मेरा आराम पाया
भगवान सुरत सब जमीन अस्मानमें नजरमें आया ।।ध्रु.।।
मृगजल माया उनो बनाया । झूटीं काया क्या जानों मैं कब कब मर जाया ।।१।।
इबरत लाया पवन कमाया । दशनादोंकी छिंगी बजाकर अलॅख जगाया ।।२।।
कहत सोहिरा खुदा मिलाया । ऊन्नें फरमाया निर्गुण गाया निरालंब की लगन लगाया ।।३।।

**।। ॐ नमो शिवा ।। शिवा = कल्याणमयी देवी ।।**

**शाम्भवी मुद्रा व विहंगम मार्ग या समधीचे महत्वाचे संदर्भ**

महामुद्रा नभोमुद्रा उड्डीयान जलधरम् । मूलबंधो महाबंधी महावेधश्च खेचरी ।
विपरीत करा योनिर्वज्राणी शक्तिधारि़णी । ताडागी माण्डवी मुद्राशाम्भवी पंचधारिणी ।
अश्विनी, पाशिनी काकी मातग्डीच भुजंगिनी । पंचविशती संख्याका मुद्रा प्रोवता महर्षिभिः। ।

**।–Ìß·þÌâ†ÌâOÌ²ÌÌâ ÌÌ Ì।।**

१) महामुद्रा २) नभोमुद्रा ३) उड्डीयानबंध ४) जलन्धरबंध ५) मूलबंध ६) महाबंध ७) महावेध ८) खेचरी
९) विपरीतकरणी १०) योनिमुद्रा ११) वज्राणी १२) शक्तिधारि़णी १३) ताडागी १४) माण्डवी १५) शाम्भवी
१६) पार्थिवधारिणी १७) नबोधारिणी १८) वैश्यवानारीधारिणी १९) वायवीधारिणी २०) नभोधारिणी
२१) अश्विनी २२) पाशिनी २३) काकी २४) मातग्डी २५) भुजंगिनी.

The Gestures, or MUDRAs

The Giver-of-Happiness Gesture (SHAMBHAVI MUDRA): For this the MIND should be firmly established in the Center of Command (AJNA CHAKRA) and the eyesight kept level, fixed on some beautiful imaginary object at a distance of at most a yard (2 cubits) and at least one span of the hand. And whether walking, moving, standing, sitting, sleeping, waking or working, the invisible (ALAKSHYA) should be made the object of sight (LAKSHYA). No outside help is necessary for this, it suffices for the outward vision to be changed into the inward vision or introspection (antar-LAKSHYA). This inward vision, by which the meaning of the spoken word is seen to be in accordance with its subtle substratum (madhyama), is called the SHAMBHAVI MUDRA, or "gesture of the Giver-of-Happiness" (Shambhu, i.e. Shiva). It is said to have been practiced by Shiva himself. The Upanishad says: "When the MIND dissolves into its inherent bliss this is the gesture of the Giver-of-Happiness. This is also called the Moving-in-the-Void gesture." (Mandala Brahmana Up. 2,18.)

Of the twenty-five Gestures, the Moving-in-the-Void and the Thunderbolt, together with the secondary gestures, the Beating (tadava), the Wearing-of-Garment (paridhana), the Union (yukti) the Moving-Around (parichalana) and the Moving Energy (shakti chalana), should never be attempted without the guidance of a qualified teacher or guru.

For mental concentration in particular, the following gestures are used:

1) The "Invisible gesture" (AGOCHARI) consists in keeping still with the MIND concentrated on the tip of the nose.
2) The "Wandering-on-the-Earth" (BHUCHARI) consists in fixing the MIND on the empty space about four finger breadths from the tip of the nose.
3) The Black-Bee (CHACHARI), sometimes identified with the Moving-in-the-Void gesture, by which the MIND is concentrated on the Center of Command. In Breathing exercises, besides these gestures, the Intoxicated gesture (UNMANI MUDRA) and the Absolute chalice (Kevala Kumbhaka) are used.(YOGAVIDHYA)

तिही त्रिपुटीचे वाडेरे । सवालक्ष चरावया जायरे । ते दैत्यापाठी हुंबरत लागे रे । कान्हो ।।१।।

भक्ताघरीं दुभे सानुरागेरे । तिचे नाम शांभवी आहेरे । तिची रुपरेखा कायरे । कान्हो ।।२।।

येकी चौमुखी गाय पाहेरे । तिचा विस्तार बहू आहेरे । तिच्या नाभिकमळीं जन्म वासु सांगेरे। कान्हो ।।३।।

तिसी आदिपुरुषु बापमायेरे । बापरखुमादेविवरु विठ्ठलु पाहीरे । ते भक्ता ओळली आहेरे । कान्हो ।।४।।

ते दोहतां भरणा पाहेरे । चारी धारा वर्षत आहेरे । कान्हो ।।५।।

**ज्ञानेश्वर गोरखपूर गाथा २०३ ।।**

ॐ नमो शिवा आदि । कावडि घेतली खांदी । मिळाली संतमांदी । त्याचे रज रेणु वंदी ।।धृ।।

शिवनाम शीतळ मुखीं । सेविं पां कापडीयारे । दडदडदडदडदड दुडुदुडुदुडुदुडु । पळ सुटला कळिकाळा बापुडीयारे ।।१।।

गुरुलिंग जंगम । त्यानें दाविला आगम । आधिव्याधि झाली सम । तेणें पावलों विश्राम रे ।।२।।

जवळी असतां जगजीवन । कां धांडोळिसी वन । एकाग्र करी मन । तेणें होईल समाधान रे ।।३।।

देहभाव जेथं विरे। ते साधन दिधलें पुरे । बापरखुमादेविवरे । विठ्ठलु रे विठ्ठलु रे विठ्ठलु रे ।।४।।

**ज्ञानेश्वर,गोरखपूर गाथा ७२९।।**

ॐ नमोजी शिवा । नमो तुज महादेवा । करुनी उपकार जीवा । अवतार धरीला ।।१।।

सोपा मंत्र रामनाम । तेणें झालें सर्व काम । साधनांचा श्रम । गोवा उगविला ।।२।।

बैसोनियां दृढासनीं । नाम जपे निशीदिनीं । तयासी अवनीं । सोपी दिसे ।।३।।

बरवें साघन उत्तम । अवघा निवारिला श्रम । गातां तुमचें नाम । वंद्य तिहीं लोकीं ।।४।।

जड जीवा उध्दरिले । कलिमाजीं सोपें केलें । रामनाम जप वहिलें । थोर साधन हें ।।५।।

अवतार धरुनी साचा। उध्दार केला जड जीवांचा । एका जनार्दनीं नामाचा । वाढविला महिमा ।।६।।

**एकनाथ,गोरखपूर गाथा ९८८।।**

एक एव शिवः साक्षात् सर्वानुग्रहकारकः । गुरुजंगमलिंगात्मा वर्तते भुक्तिमुक्तिदः।। **सि.शि.९-५९**।।

भक्तिसाठीच शिवाने गुरुरुप धारण केल्याने शिवाप्रमाणेच गुरु,लिंग व जंगम यांची समदृष्टिने भक्ति करावी.

वेदशास्त्रपुराणानि सामान्यगणिका इव । एकैव शाम्भवी विद्या गुप्ता कुलवधूरिव ।।९।।

वेद, शास्त्र, पुराणे ही एखाद्या गणिकेप्रमाणे सामान्य आहेत; जुजबी आहेत;

फक्त एकमात्र अशी ही शाम्भवी मुद्राच एखाद्या कुलवधूप्रमाणे गुप्त वास करते.

अन्तर्लक्षबहिर्दृष्टिर्निमेषोन्मेषवर्जिता । एषा हि शाम्भवी मुद्रा सर्वशास्त्रेषु गोपिता ।।१०।। ।। **अमनस्कयोग** ।।

ही शाम्भवी मुद्रा अन्तर्लक्ष्य तशीच बहिर्दृष्टि राखणारी आणि निमेष व उन्मेष यांविरहित अशी आहे म्हणजे शाम्भवी मुद्रेमध्ये बहिर्दृष्टि झाल्यावरही चित्त अन्तर्लक्ष्य राहते आणि दृष्टीमध्ये निमेष व उन्मेष ठरतच नाहीत.

ही मुद्रा सर्व शास्त्रामध्ये गुप्त वास करणारी अशी आहे.

गुरोरालोकमात्रेण स्पर्शात्संभाषणादपि । सद्यः संज्ञा भवेज्जन्तोर्दीक्षा सा शांभवी मता ।। **वायवीय संहिता** ।।

गुरु की दृष्टि,स्पर्श,अथवा वाक्य द्वारा जो तुरन्त एक प्रकार का ज्ञान या अनुभव उत्पन्न होवे,उसे शांभवी (वेध) दीक्षा कहते हैं।

दर्शनात् स्पर्शनाच्छब्दात् कृपया शिष्यदेहके । जनयेद्यः समावेशं शांभवं स हि देशिकः ।। **योगवाशिष्ठ,** नि.प्र.पू.१२८,६१।।

जो कृपापूर्वक दर्शन,स्पर्श,किंवा शब्द (मंत्र का उपदेश) द्वारा शिष्य-देह में मंगलमय अनुभूति कर सके, वही गुरु है।

मुद्रेय खलु शाम्भवी भवति सा लब्धा प्रसादाद् गुरोः । शून्याशून्यविलक्षणं स्फूरति तत्तत्वपरं शाम्भवम्

।। **हठयोगप्रदीपिका** ४-३७।।

शाम्भवी यो विजानाति स च ब्रह्म न चान्यथा ।। **घेरंड संहिता** ३-६२ ।।

वाड्.मात्राद्वाथदृक्पातात् यः करोति च तत्क्षणात् । प्रस्फुटं शाम्भवं वेद्यं स्वसंवेद्यं परं पदम् ।। **सिध्द सिध्दांत पध्दति** ५-६४।।
सद्गुरु संभाषणाद्वारा , शक्तिपातद्वारा शांभवी दीक्षा देऊन स्व-संवेद्य अशा परमपदाचें ज्ञान करुन देतो.
मद्-मोदे तुरानन्दो (तुरीयानन्दो) जीवात्मपरमात्मनोः ।।६-२९
।। उभयोरैक्यं संवित्तिर्मुद्रेति परिकीर्तिता ।।६-३०।।
मुद धातु मोदार्थक आहे. रा धातु आनंददायक आहे. जी जीवात्मा व परमात्मा यांच्या एकतेचे ज्ञान प्रकट करते
तिला मुद्रा असें म्हणतात. ।। **सिध्द सिध्दांत पध्दति** ।।
बुध्दीचें बोध्दव्य । मनाचें मंतव्य । चित्ताचें चेतव्य । मुरालें जेथ ।।६-२२६।।
ऐसा शांभवीमुद्रा प्रसाद । प्राप्त झाला जया विशद। तोचि भगवंतासि प्रसिध्द । प्रिय झाला ।। ६-२२७ **सिध्दान्त संहिता**।।
शांभवी असे तुझेया वामांगी । जे विमला तन्वंगीं । तुजसी अभिन्न भावें भोगी । शिवानंदु हे ।। **विवेक सिंधु** ११-७२।।
शुध्द, पवित्र आणि कोमलांगी (सुंदर) अशी ती शांभवी ( म्हणजे शिवशक्ति ) ही तुमच्या डाव्या बाजूस आहे. तुमच्याबरोबर एकरुपता साधून, तन्मय होऊन शिवानंदाचें सुख भक्तिभावानें उपभोगीत आहे.
मग तिहीं तें शांभव । अद्वयानंदवैभव । संपादिलें सप्रभव । श्रीगहिनीनाथा ।। **ज्ञानेश्वरी.** १८-१७५६।।
मग त्या गोरक्षनाथांनीं तें शंकरापासून परंपरेनें प्राप्त झालेले अद्वैतानंदाचें ऐश्वर्य, सामर्थ्यासह श्रीगहिनीनाथांना दिलें.
मार्गाश्च पंच वै साध्या योगिना फलसाधने । तेन स द्वैतनाशाश्च प्राप्नोति पदमव्ययम् ।।९-२०।।
प्रथमो विहंगाख्यश्च द्वितीयो मीनसंज्ञकः । तथा पिपीलिकाख्यश्च चतुर्थः कपिसंज्ञकः ।।९-२१।। **सि.संहिता**।।
पहिला विहंगम दुसरा मीन तिसरा पिपीलीका चवथा कपिमार्ग (आणि पांचवा शेषमार्ग) आहे.
तैसें देख पां विहंगममतें । अधिष्ठूनि ज्ञानातें । सांख्य सद्य मोक्षातें आकळिती ।। **ज्ञानेश्वरी** अ.३-४३।।
पहा, तसें विहंगममार्गानें (पक्षाच्या मार्गाप्रमाणें) ज्ञानमार्गाचा आश्रय करुन ज्ञानी तत्क्षणींच मोक्ष आपल्या स्वाधीन करुन घेतात.
वेदशास्त्रपुराणानि सामान्यगणिका इव । या पुनःशांभवी विद्या गुप्ता कुलवधूरिव।।१-७।।
वेदशास्त्रपुराणे ही सामान्य गणिकेप्रमाणे आहेत.शांभवी विद्या मात्र कुलीन स्त्रीप्रमाणे गुप्त व रक्षणीय आहे.
इडा भागीरथी गंगा पिंगला यमुना नदी । तयोर्मध्यगता नाडी सुषुम्णाख्या सरस्वती ।।१-११।।
इडाको गंगा और पिंगला को यमुना तथा इन दोनोंके मध्यमें जानेवाली नाडी सुषुम्णाको सरस्वती कहते हैं ।
त्रिवेणीसंगमो यत्र तीर्थराजः स उच्यते । तत्र स्नानं प्रकुर्वीत सर्वपापैः प्रमुच्यते ।। १-१२।।।। **ज्ञानसंकलिनी-तन्त्र**।।
इस त्रिवेणीका जहाँ संगम है, उसे तिर्थराज कहते हैं । इसमें स्नान करके सारे पापोंसे मुक्त हो जाते हैं ।
तदेव हृदयं नाम सर्वशास्त्रादिसम्मतम् । अन्यथा हृदि किंचास्ति प्रोक्तं यत् स्थूलबुध्दिभिः ।। **योगस्वरोदय**।।
यही अर्थात् आज्ञाचक्र ही सर्वशास्त्र-सम्मत हृदय है । स्थूल-बुध्दिवाले ही अन्य स्थूल स्थानको हृदय कहते हैं ।
कीदृशी खेचरी मुद्रा विद्या च शांभवी पुनः । कीदृश्यध्यात्मविद्या च तन्मे ब्रूहि महेश्वर ।। १-१३।।
श्रीपार्वती म्हणाली हे महेश्वरा ! खेचरीमुद्रा, शांभवी विद्या व अध्यात्मविद्या यांचे स्वरुप आपण मला सांगावे.
मनः स्थिरं यस्य विनावलंबनम् । वायुः स्थिरो यस्य विना निरोधनम् ।।
दृष्टिः स्थिरा यस्य विनावलोकनम् । सा एव मुद्रा विचरंती खेचरी ।।१-१४।।
श्रीशिव म्हणाले विनासायास, विनाधार किंवा विनाश्रय मन स्थिर व एकाग्र होणे, निरोधाशिवाय वायू स्थिर होणे व दृश्यपदार्थाशिवाय किंवा कोठेही दृष्टि न लावता दृष्टि स्थिर होणे या अवस्थेला चालतीबोलती खेचरीमुद्रा म्हणतात.
बालस्य मूर्खस्य यथैव चेतः । स्वप्नेन हीनोचपि करोति निद्राम् ।
ततो गतः पथो निरावलंबः । सा एव विद्या विचरंति शांभवी ।।१-१५।।
बालक व मूर्ख (अज्ञानी) यांचे चित्त स्वप्नरहित ( निःस्वप्न) निद्रेचा अनुभव घेते. अशा अवस्थेतून आलंबन किंवा आधाररहित जो मार्ग जातो तीच चालतीबोलती शांभवी विद्या समजावी. ।। **ज्ञानसंकलिनी-तन्त्र**।।

सांडूनि मीठपणाचा लोभु । मिठें सिंधुत्वाचा घेतला लाभु । तेवी अहं देऊनि मी शंभु । शांभवी झालों ।। १-६३ **अमृतानुभव**।।

शिवाकान्त शम्भो शशाङ्कार्धमौले ।। ४ **वेदसारशिवस्तोत्रम्**।।

शक्तिरुपिणी पार्वतीचा पति असणा-या,पृथ्वीवरील जीवांचे कल्याण करणा-या, मस्तकी अर्धचंद्र धारण करणा-या शम्भो

शिवाकान्त शान्त स्मरारे पुरारे।। ९ **वेदसारशिवस्तोत्रम्**।।

पार्वतीपती, शान्तस्वरुप असणा-या मदनाला भस्मसात त्रिपुरासुराचा वध करणा-या महादेवा

ओम जयन्ती मण्गला काली भद्रकाली कपालिनी । दुर्गा क्षमा शिवा धात्री स्वाहा स्वधा नमोऽस्तु ते ।१। **अथार्गलास्तोत्रम्** ।

मार्कण्डेयजी कहते हैं- सबका शिव अर्थात कल्याण करनेवाली जगदम्बाको ' शिवा ' कहते हैं।

शाकम्भरी शिवा शान्ता शारदा शरणागतिः । शातोदरी शुभाचारा शुम्भासुरविमर्दिनी ।। **श्रीमद्देवीभागवत** १४५ ।।

सोऽहमर्कोऽस्म्यहं ज्योतिरात्मा ज्योतिरहं शिवः । आत्मज्योतिरहं शुक्लः सर्वज्योती रसोऽस्म्यहम् ।।

आगच्छ वरदे देवि गायत्रि ब्रह्मरुपिणि । जपानुष्ठानसिध्द्यर्थं प्रविश्य हृदयं मम ।।

उत्तिष्ठ देवि गन्तव्यं पुनरागमनाय च । अर्घेषु देवि गन्तव्यं प्रविश्य हृदयं मम ।।

जयति शाम्भवी, जयति शिवा जय ।। श्रीदेवी-अष्टोत्तर-सहस्त्रनाम ।।

नमो देव्यै महादेव्यै शिवायै सततं नमः । नमः प्रकृत्ये भद्रायै नियताः प्रणताः स्म ताम् ।। **दुर्गासप्तशत्याम्** ५-९ ।।

देवीको नमस्कार है,महादेवी शिवाको सर्वदा नमस्कार है। प्रकृति एवं भद्राको प्रणाम है।

हमलोग नियमपूर्वक जगदम्बाको नमस्कार करते है।।

सर्वमण्गलमाण्गल्ये शिवे सर्वार्थसाधिके । शरण्ये त्र्यम्बके गौरि नारायणि नमोऽस्तु ते ।। **दुर्गासप्तशत्याम्** ११-१० ।।

नारायणी! तुम सब प्रकारका मंगल प्रदान करनेवाली मंगलमयी हो। कल्याणदायिनी शिवा हो। सब पुरुषार्थोंको सिध्द करनेवाली, शरणगतावत्सला, तीन नेत्रोंवाली एवं गौरी हो। तुम्हें नमस्कार है।।

शिवा = कल्याणमयी देवी, मुक्ति शाम्भवी

शं = कल्याण करने वाली । पोषण के साथ परिवर्तन का भी चक्र इस सृष्टि में चलता है।

उसे कल्याणकारी दिशा में गतिशील रखने वाली शिवशक्ति। धर्मरुप वृषभ इसका वाहन है।

तीसरा नेत्र कषाय-कल्मषों को नष्ट करने वाली प्रज्ञा का प्रतीक है।

वासना,तृष्णा,अहंता तीन आसुरी पुरियों का उच्छेदन करने वाला त्रिशूल आयुध है।

मस्तक पर चन्द्रमा-शान्तिएवं विकासशील चिन्तन का प्रतिक है।

## शाम्भवी यंत्रम्

शक्ति

| | |
|---|---|
| शांभवी | शिव |
| मंत्राक्षर | बीजाक्षर |
| तुः | शं |
| आध्यात्मिक शक्ति | लौकिक शक्ति |
| मुक्ता | शिवा |

फलश्रुति

| | |
|---|---|
| मुक्ति का अधिकार | अनिष्ट का निवारण |

**गायत्री मंत्र**

ॐ भुर्भुवस्सुवः । तत्सवितुर्वरेण्यं । भर्गो देवस्य धीमहि । धियो यो नः प्रचोदयात् ।।

ब्रह्मानन्दं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिम्। द्वन्द्वातीतं गगनसदृशं तत्वमस्यादिलक्ष्यम् ।।
एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतम् । भावातीतं त्रिगुण रहितं सद्गुरुं तं नमामि ।।
गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः । गुरु साक्षात् परं ब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ।।

न गुरोरधिकं तत्वं न गुरोरधिकं तपः । तस्मात् परतरं नास्ति तस्मै श्रीगुरवे नमः ।।
ध्यानमूलं गुरोर्मूर्तिः पूजामूलं गुरोः पदम् । मंत्र मूलं गुरोर्वाक्यं मुक्तिमूलं गुरोः कृपाः।।

**शिवसंप्रदाय**

अद्वयानंद परंपरा, उज्जयनी शाखा, विहंगम राजमार्ग, शांभवी मुद्रा,सहजराजयोग

**। भस्मधारणमंत्रः ।**

अनादि शाश्वतं शांतं चैतन्यं चित्स्वरुपकम् । चिदंगं वृषभाकारं चिद्भस्म लिंगधारणम् ।।श्रीशिवपूजाविधीः

**शिवयोगी श्री सद्गुरु कल्मेश्वर महाराज व श्री सद्गुरु निरंजन महाराज यांनी शांभवी मुद्रेसंबंधी रचिलेले - अभंग**

खूना हिडीयो निन्नोळू निना । बिंब होळेयूवदू ब्रह्मस्थाना ।।पल्ल।।
ऐरडू नयनद नट्टनडूवे । सुशूम्नेय द्वारदोळू प्रकाश तोरीदी यनगे ।।१।।
सत्तू चित्तू नित्य अल्ली आनंदवागी । ईरुवदो शांभवी मुद्रीय वरणा ।।२।।
अरवू मरवू ईल्लदंते । अग्नी चक्रक आडोनीना । काणो कल्मेश्वरना ।।३।। ।। **गुरुगीतामृत** ।।
संताची संगत करा । दिव्यज्ञाने भरला सारा ।। काम क्रोधाचा काढा कचरा । विश्वी ब्रह्मच भरला आहे सारा ।।१।।
ज्ञान दृष्टिने करावा विचार । जाईल हरपूनी अज्ञान सारं । लागेल भक्तांना मोक्षाचा थारा ।।२।।
करावा विचार त्रिकुटावरी। सुषुम्णेच्या महाद्वारी । आत्मा गोल्हाटी भरला आहे सारा ।।३।।
शांभवी मुद्रेने करावा विचार । म्हणे निरंजन खूण दसवे द्वार। या पासूनी उद्धरले हरिहर ।।४।।


## ।। आरती सद्गुरुंची ।।

आरती त्रिनयना। शंभू कैलासाचा राणा।।धृ।।
पंचमुखी परमेश्वर । कैलासी राहे निरंतर ।१। उज्जैनी सिध्देश्वर। आरती ओवाळी चरणावर।२।
भूकैलास शिरगुर। तेथे राहे श्रीकल्मेश्वर।३। निरंजन सांगे जोडोनी कर। आरती करी वारोंवार।४।

आरती सद्गुरुनाथा । स्वामी निरंजन समर्था । आरती सद्गुरुनाथा । स्वामी निरंजन समर्था ।।धृ।।
सदाचार सार साचा । मंत्र दिधला जीवनाचा । सर्व धर्माचा समन्वय । मार्ग दाविला अद्वय ।।१।।
विवेक वैराग्याचा दीप । लावुनी चरणासमीप । उज्जयनी शाखा, विहंगम । शांभवी दीक्षा सुगम ।।२।।
दूर केले हो आवरण । त्रिवेणी संगमी स्नान । स्वयंप्रकाशे भगवान । निखळ आनंदी रममाण ।।३।।
सद्गुरुकृपा होता । अवघी हरपली चिंता । विनयानंद विनवी आता । चरणी ठेवूनिया माथा ।।४। दि.२७-१२-१९९८

**।। ॐ नमो शिवा ।।**

सहस्त्रदलपंकजे सकलशीतरश्मिप्रभम् । वराभयकरांबुजं विमलगन्धपुष्पाम्बुजम्।
प्रसन्नवदनेक्षणं सकलदेवतारुपिणम् । स्मरेत् शिरसि हंसगं तदभिधानपूर्वं गुरुम्।।गुरु गीता।।
ॐ पूर्णमदः पूर्णामिदं पूर्णात् पूर्णमुदच्यते । पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ।।
ॐ शान्तिः ! शान्तिः !! शान्तिः !!!
(बृहदारण्यक उपनिषद् अध्याय पांच, प्रथम ब्राह्मण, प्रथम कण्डिका पूर्वार्ध)



श्री सद्‌गुरु निरंजन महाराज व भजनी मंडळ, ढवळी ता. मिरज यांचे समवेत

## अनुग्रहानंतर प्राप्त स्थितीचे वर्णन

झाला ब्रह्मबोध । लागली समाधि ।।धृ।।
सुषुम्नेच्या छिद्री । स्थिरावलो ब्रह्मरंध्री । भेदोनिया नाद बिंदू ।।१।।
मना वाचे न कळे । ऐसें देखिलें निराळें । रुपाविण हे अगाध ।।२।।
सोहिरा म्हणे काय वानूं । हारपले देहभान । सद्‌गुरु भेटला हा सिध्द ।।३।।

## त्या देवाचें तूं दर्शन घे

त्या देवाचें तूं दर्शन घे संसार मोहातुंनि त्वरित निघे ।।ध्रु.।।
आदि मध्य ना अंत जयाला नेति नेति म्हणती वेद तयाला ।
ज्यापासुनि ओंकारहि झाला ब्रह्मा विष्णू हर हे तिघे ।।१।।
अगम्य अगोचर सत्ता ज्याची सहज लीला हे त्याची ।
जारज स्वेदज अंडज उद्‌भिज ज्यापासुनि हे सहज निघे ।।२।।
दृश्य सकळही निवडुनि पाहतां निरालंबिं राहतां ।
प्राणापान ऊर्ध्वही वाहतां आनंदभुवनीं मन हे रिघे ।।३।।
म्हणे सोहिरा शून्याकार रूप नाहीं आकार ।
परब्रह्मचि निर्विकार अंतरिं बाहेर अवघें ।।४।।

## अभ्यासीं मन लाव

अभ्यासीं मन लाव प्राण्या मोक्षपदाप्रति पाव रे ।। ध्रु.।।
दोरचि परि हा भुजंग भासत प्रपंच तद्वत माव । नित्य अनित्य विलोकुनि अंतरिं दृढ धरीं सद्‌भाव रे ।।१।।
शमदम साधुनि घालिं निरंतर संतसमागम नाव । उपरम उजरा सोहं झेलित भवनदितरणोपाव रे ।।२।।
इडा पिंगळा आकळुनि घेईं सुषुम्नेमाजी धांव । निमग्न होऊनि ब्रह्मानंदीं परमसुख हें पाव रे ।।३।।
उपनिषदांचा अर्थ भरित निर्गुणसमुच्च गांव । म्हणे सोहिरा स्वयंप्रकाशक आत्मकळेचा प्रभाव रे ।।४।।

## निर्वाणीचा अभंग

दिसणे हे सरले । अवघे प्राक्तन हे मुरलें।।धृ।।
आलों नाहीं गेलों नाही । मध्यें दिसणें हे भ्रांति । जागृत होतां स्वप्नचि हरपे । कर्पुरन्यायें जग हे हरलें ।।१।।
दिसणें हाचि जन्म योगियां । न दिसणें हा मृत्यु म्हणा । गैबिप्रसादें गैबचि झालें । आप आपणामध्यें लपलें ।।२।।
मच्छंदर गोरक्ष जालंदर हे । न्याया आले स्वस्वरुपीं । जातां जातां गगनग्राम तें । समूळ कोठे ना गमलें ।।३।।
म्हणे सोहिरा सतरा चवदा । मधुमासाच्या नवम दिनीं । स्वगुणस्वरुपीं निर्गुण ठेलें । अनुभव हरले स्वरुप कळे ।।४।।

www.vch-india.com
**Vinayanand Charitable Home India 416203**
'Kaivalya', 924/30, Vishalnagar, **HUPARI.** Dist. Kolhapur (MS) India- 416203
Phone :- 0230-3203365 Mob. 9325005525 Email:-vchindia@yahoo.com

Published by : Shri Krishna Dasharath Dhanvade (Vinayananad) At. Po. Hupari Dist. Kolhapur - 416203
Typist : Sou. Usha & Shri. Dayananda Mahadev Dhanvade At. Po. Mangur. Dist. Belgaum.08338-268061
Copies : 500 ● Price : "Swadhyay" ● Printed by : Ajantha Mudranalya Ph. : 0230-2434946, 9423041146